दैनिक **संध्या**

निःपक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

७० वर्षे — निर्भीड पत्रकारीतेची

सोमवार, दि. २० एप्रिल २०२६

www.dainikesandhya.com | www.youtube.com/@sandhyalivenews

संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : ११५ | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ७ रूपये

# विरोधक मुख्य निवडणूक आयुक्तांना हटवण्याच्या तयारीत

## पुन्हा नोटीस देणार, मार्चमध्ये एकदा फेटाळण्यात आली आहे; आता २०० खासदारांचा पाठिंबा मिळवणार

**नवी दिल्ली (दै. संध्या)**

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांना पदावरून हटवण्यासाठी विरोधक पुन्हा एकदा प्रयत्न करत आहेत. सूत्रांनुसार, विरोधी पक्षांचे अनेक नेते आपापसात चर्चा करत आहेत.

सुमारे पाच ज्येष्ठ नेते एका नवीन नोटिशीचा मसुदा तयार करण्यावर काम करत आहेत, जेणेकरून त्यांना हटवण्याची प्रक्रिया सुरू करता येईल. यापूर्वी मार्चमध्ये विरोधकांनी ज्ञानेश कुमार यांना हटवण्यासाठी संसदेत नोटीस दिली होती.

मात्र, लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला आणि राज्यसभा सभापती सी.पी. राधाकृष्णन यांनी या नोटिसा फेटाळून लावल्या. ज्ञानेश कुमार यांच्यावर लावण्यात आलेले आरोप त्यांना पदावरून हटवण्यासाठी आवश्यक असलेल्या उच्च संवैधानिक मानदंडांची पूर्तता करत नाहीत, असे त्यांनी म्हटले. विरोधकांनी



200 स्वाक्षऱ्या मिळवण्याचे लक्ष्य ठेवले

नवीन नोटिशीमध्ये विरोधक किमान 200 खासदारांचा पाठिंबा मिळवण्याचा प्रयत्न करत आहेत. याचे मोठे कारण म्हणजे नुकतेच लोकसभेत नामंजूर झालेले महिला आरक्षण सुधारणा विधेयक. शुक्रवारी लोकसभेत संविधानातील 131 वे सुधारणा विधेयक मतदानानंतर नामंजूर झाले. विधेयकाच्या विरोधात 230 खासदारांनी मतदान केले होते. लोकसभेत मुख्य निवडणूक आयुक्तांना हटवण्याच्या प्रस्तावासाठी किमान 100 खासदारांच्या सह्या आवश्यक असतात. राज्यसभेत यासाठी किमान 50 खासदारांच्या सह्या आवश्यक असतात. मुख्य निवडणूक आयुक्तांना त्याच पद्धतीने पदावरून दूर केले जाऊ शकते, ज्या पद्धतीने सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांना दूर केले जाते. इतर निवडणूक आयुक्तांना पदावरून दूर करण्यासाठी मुख्य निवडणूक आयुक्तांची शिफारस आवश्यक असते. न्यायाधीश (चौकशी) अधिनियम 1968 नुसार, जर दोन्ही सभागृहांमध्ये एकाच दिवशी नोटीस दिली गेली, तर चौकशी समिती तेव्हाच स्थापन होईल जेव्हा दोन्ही सभागृहांमध्ये प्रस्ताव स्वीकारला जाईल. यानंतर लोकसभा अध्यक्ष आणि राज्यसभा सभापती मिळून एक संयुक्त चौकशी समिती स्थापन करतील.

### देशभरात रस्ते सुरक्षा निर्देश जारी

सर्वोच्च न्यायालयाने रस्ते सुरक्षा वाढवण्यासाठी देशभरात अनेक मार्गदर्शक तत्त्वे जारी केली आहेत. या निर्देशांमध्ये एक्सप्रेसवेसारख्या रस्त्यांवर अवजड वाहनांच्या पार्किंगवर बंदीचाही समावेश आहे. प्रशासकीय सुस्ती किंवा पायाभूत सुविधांच्या कमतरतेमुळे एक्सप्रेसवे धोक्याचे मार्ग बनू नयेत, असे न्यायालयाने म्हटले आहे. न्यायमूर्ती जे.के. माहेश्वरी आणि न्यायमूर्ती ए.एस. चांदुरकर यांच्या खंडपीठाने रस्ते आणि परिवहन मंत्रालय, भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण आणि राज्ये-केंद्रशासित प्रदेशांना रस्ते सुरक्षित बनवण्याचे निर्देश दिले. खंडपीठाने सांगितले की, राष्ट्रीय महामार्ग भारताच्या एकूण रस्त्यांच्या लांबीच्या केवळ 2% आहेत, परंतु रस्ते अपघातांमध्ये होणाऱ्या एकूण मृत्यूंमध्ये त्यांचा वाटा सुमारे 30% आहे.

# अखेर वनवास संपला!

*सलग पराभवांच्या अंधारानंतर रिंकू सिंगने पेटवला केकेआरच्या विजयाचा दिवा; शेवटच्या ५ षटकात गेमच फिरवला*

**मुंबई (दै. संध्या)**



आयपीएल 2026 च्या हंगामात सलग अपयशाचा सामना करणाऱ्या कोलकाता नाईट रायडर्सने अखेर विजयाचे खाते उघडले आहे. अटीतटीच्या झालेल्या या सामन्यात रिंकू सिंग आणि अनुकूल रॉय या जोडीने अशक्य वाटणारा विजय खेचून आणत राजस्थान रॉयल्सचा चार गडी राखून पराभव केला. केकेआरचा या हंगामातील हा पहिलाच विजय ठरला आहे. वैभव सूर्यवंशी आणि यशस्वी जैस्वाल यांनी राजस्थान रॉयल्ससाठी डावाची सुरुवात केली. त्यांनी 8.4 षटकांत पहिल्या विकेटसाठी 81 धावा जोडल्या. संघाची पहिली विकेट वैभवच्या रूपाने पडली. 6 चौकार आणि 2 षटकारांसह 28 चेंडूंमध्ये 46 धावा करून तो वेल्लियनच्या गोलंदाजीवर बाद झाला. त्याच्या पाठोपाठ ध्रुव जुरेल बाद झाला, त्याने 5 धावा केल्या. त्यानंतर यशस्वी जैस्वालही बाद झाला. त्याने 29 चेंडूंमध्ये 4 चौकार आणि 2 षटकारांसह 39 धावा केल्या. त्यानंतर संघाला रियार परागच्या (12) रूपाने चौथा धक्का बसला. शेवटी शिमरॉन हेटमर्नने 15 धावा केल्या आणि रवींद्र जडेजाने 9 धावांचे योगदान दिले. कार्तिक त्यागी आणि वरुण चक्रवर्तीने कोलकाता नाईट रायडर्ससाठी सर्वाधिक 3-3 बळी घेतले. धावांचा पाठलाग करताना कोलकाताची सुरुवात अत्यंत खराब झाली. सलामीवीर टीम सायफर्ट आणि कर्णधार अजिंक्य रहाणे भोपळा न फोडता स्वस्तात माघारी परतले. त्यानंतर अंगक्रिश रघुवंशी (10) आणि कॅमेरून ग्रीन (27) यांनी डाव सावरण्याचा प्रयत्न केला, मात्र रवि बिश्नोई आणि रवींद्र जडेजाने त्यांना फार काळ टिकू दिले नाही. रॉवमन पॉवेलने 23 धावांची भर घातली, पण तो देखील मोक्याच्या क्षणी बाद झाला.

क्युआर स्कॅन करून दै. संध्याच्या युट्युब चॅनलला सबस्क्राईब करा

SUBSCRIBE

www.sandhyaepaper.com

**ढिंग-टांग**




# एकनाथ शिंदेंच्या सभेच्या बॅनरवरुन महेश शिंदेंचा फोटो गायब

### पक्षविरोधी भूमिका घेतल्याने कार्यकर्ते नाराज असल्याची चर्चा

**सातारा(दै. संध्या)**



उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या साताऱ्यात होणाऱ्या जाहीर सभेपूर्वीच राजकीय वातावरण तापले आहे. शहरभर लावण्यात आलेल्या बॅनर्समध्ये शिवसेनेचे आमदार महेश शिंदे यांचा फोटो गायब असल्याचं दिसून आलं. जिल्हा परिषद अध्यक्षपदाच्या निवडीवेळी पक्षविरोधी भूमिका घेतल्याने कार्यकर्ते नाराज असल्याची चर्चा आहे. त्यामुळेच महेश शिंदे यांचा फोटो गायब असल्याचं सांगितलं जात आहे. एकनाथ शिंदे यांची ज्या ठिकाणी सभा होणार आहे त्या ठिकाणी आणि शहरात मोठ्या प्रमाणावर बॅनरबाजी करण्यात आली आहे. त्यावर अनेक ठिकाणी महेश शिंदे यांचे फोटो नसल्याचे दिसून आले. यामागे पक्षविरोधी भूमिका घेतल्याचा राग असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. जिल्हा परिषद अध्यक्षपदाच्या निवडीवेळी झालेल्या घडामोडींनंतर महेश शिंदे यांनी भाजपसोबत हातमिळवणी केल्याचा आरोप करण्यात येत आहे. त्यांच्या पत्नी प्रिया शिंदे यांना अध्यक्षपदी बसवण्यासाठी शिवसेनेच्या भूमिकेपासून वेगळा निर्णय घेतल्यामुळे कार्यकर्ते नाराज असल्याचे सांगितले जात आहे. दरम्यान, जिल्हा प्रमुख रणजीत भोसले यांनी महेश शिंदे यांचा बॅनरवर फोटो नसणे हे काही कार्यकर्त्यांकडून चुकून झाल्याचे सांगितले आहे. आता सोमवारी होणाऱ्या एकनाथ शिंदे यांच्या सभेला महेश शिंदे उपस्थित राहणार का, ते व्यासपीठावर दिसणार का, याकडे संपूर्ण सातारा जिल्ह्याचे लक्ष लागले आहे. या घडामोडींमुळे शिंदे गटातील अंतर्गत राजकारण पुन्हा एकदा चर्चेत आले आहे. सातारा जिल्हा परिषद निवडणुकीत शिवसेना-राष्ट्रवादी युतीला बहुमत असतानाही भाजपने सदस्य फोडून सत्ता मिळवली. या प्रक्रियेत शिवसेनेचे काही सदस्य भाजपच्या बाजूने गेल्याने मोठा राजकीय वाद निर्माण झाला होता.

# व्हॉट्सअ‍ॅपवर भ्रष्टाचाराचे आरोप, दोन नेते आपापसात भिडले

**पिंपरी चिंचवड (दै. संध्या)**



पिंपरी चिंचवडमध्ये व्हॉट्सअ‍ॅपवर भ्रष्टाचाराचे आरोप झाले आणि यावरुन भाजपच्या नाराज निष्ठवंतावर जीवघेणा हल्ला झाला आहे. हल्ला करणारे भाजपचे सभागृह नेता प्रशांत शितोळे यांचे समर्थक आहेत, असा आरोप जखमी दिलीप तनपुरे यांनी केला आहे. मात्र प्रशांत शितोळे यांनी हे आरोप फेटाळले आहेत. मुळात तनपुरे हे माझे जुने सहकारी आहेत. त्यांना कोणीतरी फितवत आहेत. खरं तर सांगवीतील अनेक व्यक्ती माझ्यासोबत असतात, त्यामुळं हल्ला करणारे माझे समर्थक आहेत. असं म्हणणं, चुकीचे आरोप करणं योग्य नाही. झालेला वाद हा गाडीला गाडी घासली, यावरुन झाल्याची मला माहिती मिळाली आहे. तसेच पुलाचं सुशोभीकरण प्रशासन काळात झाल्याचा दावा शितोळे यांनी केला. भाजप हा शिस्तप्रिय पक्ष मानला जातो. मात्र या पक्षात नुकतेच आलेले नेते आणि नाराज निष्ठवंत एकेमकांमध्ये खरंच असे भिडत असतील तर पक्षाने याला गांभीर्यानं घेण्याची गरज आहे. भाजप असे प्रकार खपवून घेत नसल्यानं, पक्ष त्याअनुषंगाने नक्कीच कठोर पावलं उचलेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. दिलीप तनपुरे हे तसे भाजपचे निष्ठावंत कार्यकर्ते होते. मात्र पालिका निवडणुकीत भाजपने ऐनवेळी प्रशांत शितोळे यांचा पक्षप्रवेश करुन घेतला अन त्यांना तिकीट दिल्यावर तनपुरेंनी अपक्ष निवडणूक लढवली होती. त्यामुळं तनपुरेंच्या बंडखोरीची किनार या घटनेला असू शकते. मात्र आत्ता या हल्ल्यामागं भ्रष्टाचाराच्या आरोपांचं निमित्त ठरलं. पालिकेने सांगवी-बोपोडीला जोडणारा पूल 30 कोटींच्या खर्चात उभारला होता, मात्र अलीकडेच या पुलाच्या सुशोभीकरणासाठी तब्बल 22 कोटी खर्ची घातले गेले. 30 कोटींच्या पुलाच्या सुशोभीकरणासाठी 22 कोटींची उधळपट्टी? असा प्रश्न उपस्थित करत, यात मोठा भ्रष्टाचार झाला आणि तो भाजपने केला, अशी जोरदार चर्चा शहरभर रंगली.

या भ्रष्टाचारात आपण पडायला नको म्हणून ज्यांच्या हस्ते लोकार्पण होणार होतं, ते भाजपचे आमदार शंकर जगतापांनी घरी असून ही येणं टाळलं. त्यानंतर बरीच चर्चा आणि तर्कवितर्क लढवले गेले. हाच धागा धरुन सुशोभीकरणाचा हा अट्टाहास आणि घाट कोणी घातला? असा प्रश्न सांगवी परिसरातील 'काँग्रेच्युलेशन' या व्हॉट्सअ‍ॅप ग्रुपवर तनपुरेंनी उपस्थित केला. हा भ्रष्टाचार करणाऱ्यांनी खुलासा करावा, अशी मागणी केली. साहजिकच त्यांचा रोख हा कोणाकडे होता? याचे पडसाद उमटतील का? त्या अनुषंगाने तशी धमकी सुद्धा व्हाट्सअँप देण्यात आली होती. "तुम्ही विरोध करा, पण आम्ही विरोध केला तर सहन करा," असा मजकूर त्या पोस्टमध्ये होता. हे पाहता अपेक्षेनुसार पुढच्या काही तासांमध्ये याचे पडसाद उमटले. सांगवीत तनपुरे दुचाकीवरून निघाले होते, तेंव्हा दुचाकीवरून आलेल्या तिघांनी त्यांना अडवले आणि लोखंडी रॉड-चाकूने त्यांच्यावर हल्ला केला.

तनपुरे यात थोडक्यात बचावले असून खाजगी रुग्णालयात त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. हा हल्ला करणारे शितोळेचे हस्तक आहेत, असा आरोप करत त्यांना अटक करावी. तसेच भाजपने त्यांच्या सभागृह नेते पदाचा राजीनामा घ्यावा, अशी ही मागणी केली. मात्र प्रशांत शितोळे यांनी हे आरोप फेटाळले आहेत. मुळात तनपुरे हे माझे जुने सहकारी आहेत. त्यांना कोणीतरी फितवत आहेत. खरं तर सांगवीतील अनेक व्यक्ती माझ्यासोबत असतात, त्यामुळं हल्ला करणारे माझे समर्थक आहेत. असं म्हणणं चुकीचे आरोप करणं योग्य नाही. झालेला वाद हा गाडीला गाडी घासली, यावरुन झाल्याची मला माहिती मिळाली आहे. तसेच पुलाचं सुशोभीकरण प्रशासन काळात झाल्याचा दावा शितोळे यांनी केला. दुसरीकडे याप्रकरणी सांगवी पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा ही दाखल झालाय.

> सांगवी पोलिसांनी या प्रकरणी अभिषेक शेगडे आणि अंकीतकुमार उर्फ कल्लू मोर्या या दोघांना अटक केली. तर ओम गणपत ताकवणे, ओम आणि नैतिक हे तीन संशयित फरार असून त्यांचा शोध पोलीस घेत आहेत. मात्र शितोळे यांचं नाव अद्याप गुन्ह्यात घेतलेलं नाही. त्यामुळं पोलिसांवर राजकीय दबाव आहे का? असा प्रश्न विचारला जातोय. तिसरीकडे तनपुरे हे कोणाच्या सांगण्यावरून करतायेत, याचा शोध ही पोलिसांनी घ्यावा. अशी मागणी शितोळे करतायेत.

**ब्रेकिंग न्यूज**

### दोन अल्पवयीन चुलत भाऊ बेपत्ता

लातूर (दै. संध्या) : चाकूर तालुक्यात घडलेल्या हृदयद्रावक घटनेने संपूर्ण परिसरात खळबळ उडाली आहे. स्वामी कुटुंबातील दोन चुलत भाऊ रविवारी सकाळी सात वाजण्याच्या सुमारास घरातून बेपत्ता झाले. यापैकी सहा वर्षीय देवांशचा मृतदेह सापडला आहे. तर 11 वर्षीय साईचरण हा अद्याप बेपत्ता आहे. या प्रकरणी पोलिसांनी तपास सुरू केला आहे. दोन्ही मुलं गायब झाल्यानंतर त्यांचा सर्वत्र शोध घेण्यात येत होता. कुटुंबीयांनी तातडीने चाकूर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. गावात आणि परिसरात शोधमोहीम सुरू असतानाच काही तासांनी धक्कादायक घटना उघडकीस आली. सहा वर्षीय देवांश मंगेश स्वामी हा घरापासून अवघ्या सुमारे 60 फुटांवर मृत अवस्थेत आढळून आला. ही माहिती मिळताच कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून परिसरात शोककळा पसरली. 11 वर्षीय साईचरण दिनेश स्वामी हा मुलगा अद्याप बेपत्ता असून त्याचा शोध सुरू आहे. ही मुले नेमकी कशामुळे बेपत्ता झाली, सहा वर्षीय मुलाचा मृत्यू अपघाती आहे की घातपात, तसेच दुसरा मुलगा नेमका कुठे आहे, या सर्व बाबींविषयी अनेक प्रश्न अद्याप अनुत्तरित आहेत.

**दै. संध्या अँकर** — लैंगिक शोषण प्रकरण : ८ पीडितांपैकी पहिली मुलगी समोर

# नागपूरहून प्रवास करून नोंदवला जबाब

**अमरावती (दै. संध्या)**



अमरावती हादरवून सोडणाऱ्या अल्पवयीन मुलींच्या लैंगिक शोषण प्रकरणात अखेर एक मोठी कायदेशीर अडचण दूर झाली आहे. सामाजिक भीती आणि कलंकाची पर्वा न करता, नागपूरच्या एका १५ वर्षीय धाडसी मुलीने पुढे येत विशेष तपास पथकासमोर आपला जबाब नोंदवला आहे. या प्रकरणात ओळख पटलेल्या ८ पीडितांपैकी पोलिसांच्या आवाहनाला प्रतिसाद देऊन समोर येणारी ही पहिलीच पीडिता ठरली असून, यामुळे आरोपींविरोधात पुराव्यांची साखळी अधिक भक्कम झाली आहे.

या प्रकरणातील मुख्य आरोपी अयान अहमद याने काही अल्पवयीन मुलींचे लैंगिक शोषण करून त्याचे व्हिडिओ काढले होते. या प्रकरणातील इतर सात पीडित मुलींची ओळख पटली असली, तरी बदनामीच्या भीतीने त्या अद्याप समोर आलेल्या नाहीत.

मात्र, नागपूरच्या या पीडितेने पुढाकार घेतल्यामुळे पोलिसांसमोर असलेली सर्वात मोठी कायदेशीर अडचण दूर झाली आहे. आता पीडितेच्या थेट जबाबामुळे या प्रकरणातील आरोपींना कठोरातील कठोर शिक्षा होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, या पीडितेने शनिवारी नागपूर ते अमरावती (परतवाडा) असा तब्बल २५० किलोमीटरचा प्रवास करून पोलिसांच्या चौकशीला सहकार्य केले. यवतमाळच्या पोलिस निरीक्षक यशोधरा मुनेश्वर यांच्या नेतृत्वाखालील महिला पथकाने तिचा जबाब नोंदवून घेतला.

या प्रकरणातील मुख्य आरोपी अयान अहमद याने काही अल्पवयीन मुलींचे लैंगिक शोषण करून त्याचे चित्रीकरण केले होते. इतर ७ पीडित मुलींची ओळख पटली असली तरी, समाजात बदनामी होईल या भीतीने त्या अद्याप समोर आलेल्या नाहीत.

इतर मुलींना सोशल मीडियाच्या माध्यमातून जाळ्यात ओढले गेले असताना, ही नागपूरची पीडिता मात्र एका 'उर्स' दरम्यान आरोपीच्या 'ऑफलाईन' संपर्कात आली होती. या पीडितेने दाखवलेल्या धैर्यामुळे आता इतर मुलींनाही पुढे येण्यासाठी बळ मिळण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

पोलिसांनी सुरुवातीला हा गुन्हा स्वतःहून (suo motu) दाखल केला होता, जो केवळ गोपनीय सूत्रांच्या माहितीवर आधारित होता. मात्र, आता पीडितेचा प्रत्यक्ष जबाब मिळाल्यामुळे पोलिस एफआयआरमध्ये पॉक्सो (POCSO) आणि माहिती तंत्रज्ञान कायद्याच्या (IT Act) अधिक कडक कलमांचा समावेश करणार आहेत.

### पोलिसांसमोर होते मोठे आव्हान

१३ एप्रिल रोजी दाखल झालेला हा गुन्हा तांत्रिक पुराव्यांवर उभा होता. अयानच्या चौकशीत आठ पीडितांची नावे निष्पन्न झाली होती, मात्र एकही पीडिता अधिकृत तक्रार द्यायला तयार नसल्यामुळे कायदेशीर पेच निर्माण झाला होता. नागपूरच्या या मुलीने पुढाकार घेतल्याने आता अयान आणि त्याच्या टोळीला कडक शिक्षा होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. अमरावती ग्रामीणचे पोलिस अधीक्षक विशाल आनंद यांनी दिलेल्या माहितीनुसार, पीडिता मुलगी मानसिकदृष्ट्या स्थिर आणि निरोगी असून तिचा जबाब तपासासाठी अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे.

# स्वयंपाकघरातील गॅस गळतीने आग, नंतर स्फोट, नागपुरात एकाचा मृत्यू

**नागपूर (दै. संध्या)**



नागपूर जिल्ह्यातील कामठी येथील गांधीनगर भाजी मंडी परिसरात रविवारी सकाळी गॅस सिलेंडरचा भीषण स्फोट झाला. या दुर्घटनेत अतुल उर्फ बंटी पानतावणे या 40 वर्षीय तरुणाचा मृत्यू झाला असून सुमारे 10 जण जखमी झाले आहेत. जुनी कामठी पोलीस यांनी दिलेल्या माहितीनुसार, पानतावणे कुटुंबीय सकाळी घरात असताना स्वयंपाकघरात गॅस गळतीमुळे प्रथम आग लागली आणि त्यानंतर अचानक सिलेंडरचा स्फोट झाला.

प्राथमिक माहितीनुसार, अतुल पानतावणे यांच्या पत्नी चहा बनवण्यासाठी स्वयंपाकघरात गेल्या असता गॅस गळतीमुळे आग लागली. काही क्षणातच सिलेंडरचा जोरदार स्फोट झाला आणि आग घरभर पसरली. स्फोटानंतर लागलेली आग काही वेळातच संपूर्ण घरात पसरली. घरातील जीवनावश्यक वस्तू, सोन्याचे दागिने, टीव्ही, फ्रिज, कपडे यांसह सर्व साहित्य जळून खाक झाले. या आगीत सुमारे 5 लाख रुपयांचे नुकसान झाल्याचा अंदाज आहे. आग लागल्यानंतर पत्नी व मुले तात्काळ घराबाहेर पडण्यात यशस्वी झाली. मात्र, अतुल पानतावणे हे बेडरूममध्ये अडकून पडल्याने गुदमरून त्यांचा मृत्यू झाला. आग विझवण्याच्या प्रयत्नात विनय पानतावणे, नितीन पानतावणे तसेच शेजारी संध्या ढवळे यांच्यासह इतर काही जण किरकोळ जखमी झाले. सर्व जखमींवर स्थानिक रुग्णालयात उपचार करण्यात आले. घटनेची माहिती मिळताच अग्निशामक दलाने घटनास्थळी धाव घेत पाण्याचा मारा करून आग आटोक्यात आणली. मात्र तोपर्यंत मोठे नुकसान झाले होते. घटनेची नोंद जुनी कामठी पोलीस ठाण्यात करण्यात आली असून वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रशांत जुमडे आणि सहाय्यक पोलीस निरीक्षक मनीष हिवरकर यांनी घटनास्थळी पाहणी केली. मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी कामठी उपजिल्हा रुग्णालयात पाठवण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

# संपादकीय

## कमी पावसाचा अंदाज, संकट नव्हे संधी

हवामानशास्त्राच्या भाषेत, सरासरीच्या ९० ते ९५ टक्के दरम्यान पडणारा पाऊस "बिलो नॉर्मल" म्हणून ओळखला जातो. देशाची दीर्घकालीन सरासरी पर्जन्यमान सुमारे ८७ सेंमी आहे, आणि यंदा त्याच्या सुमारे ९२ टक्के पाऊस पडण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. ९६ ते १०४ टक्के पाऊस "नॉर्मल" मानला जातो, तर ९० टक्क्यांखालील पाऊस "डेफिशियंट" म्हणून गणला जातो. पावसाच्या वितरणाचा विचार केला तर देशातील अनेक भागांत सरासरीपेक्षा कमी पाऊस पडण्याची शक्यता आहे. ईशान्य भारत, उत्तर-पश्चिम भारत आणि दक्षिणेतील काही भागांमध्ये मात्र सरासरी किंवा त्यापेक्षा अधिक पावसाची शक्यता आहे. महाराष्ट्राच्या संदर्भात पाहता, बहुतांश भागात कमी पावसाचा अंदाज आहे; मात्र पूर्व विदर्भासारख्या काही भागांत सरासरीपेक्षा किंचित जास्त पावसाची शक्यता आहे. या स्थितीमागे "एल निनो" हा महत्त्वाचा घटक आहे. विषुववृत्तीय प्रशांत महासागरातील तापमान वाढल्याने निर्माण होणारी ही स्थिती मान्सूनवर परिणाम करते. यंदा मान्सूनच्या उत्तरार्धात हिंदी महासागरातील आयओडी सकारात्मक होण्याची शक्यता असून, त्यामुळे पावसात काही प्रमाणात सुधारणा होऊ शकते. ही दिलासादायक बाब आहे. सलग काही वर्षे चांगला पाऊस झाल्यानंतर, या वर्षी मात्र पावसाचे प्रमाण सरासरीपेक्षा कमी असल्याचे मान्सूनच्या पहिल्या पूर्वानुमानावरून दिसून येत आहे. यामुळे कृषी, ऊर्जा, आरोग्य, पाणीपुरवठा इत्यादी क्षेत्रांवर ताण निर्माण होऊ शकतो. 'एल निनो' वर्षांमध्ये तापमानही साधारणपणे अधिक असते; त्यामुळे नियोजनाची व्याप्ती केवळ पावसाळ्यापुरतीच मर्यादित न राहता, सर्वच उद्देशांसाठी आणि पुढील काळाचा विचार करूनही करणे आवश्यक ठरेल. अशा प्रकारच्या संभाव्य पाणीटंचाईच्या परिस्थितीचा सामना करण्याचा राज्याला यापूर्वीच चांगला अनुभव आहे; त्यामुळे या परिस्थितीचे निवारण करण्यात राज्य नक्कीच यशस्वी ठरेल. कृषी क्षेत्रात बदलत्या परिस्थितीनुसार पिकांची निवड महत्त्वाची ठरेल. दीर्घकालीन पिकांऐवजी कमी कालावधीत येणाऱ्या पिकांचा विचार करावा. कृषी विभागाच्या मार्गदर्शनाचा लाभ घ्यावा. त्याचबरोबर जलसंधारणाला विशेष प्राधान्य देणे अत्यावश्यक आहे. "पाणी अडवा, पाणी जिरवा" ही संकल्पना यंदा अधिक प्रभावीपणे राबवण्याची गरज आहे. शेततळी, जलसाठे आणि स्थानिक जलस्रोत यांचे योग्य नियोजन केल्यास, पावसातील खंडाच्या काळात साठवलेल्या पाण्याचा मोठा फायदा होऊ शकतो. हवामान विभागाकडून मिळणाऱ्या सूचनांकडे सतत लक्ष ठेवणेही तितकेच महत्त्वाचे आहे. निश्चितच, कमी पावसाच्या शक्यतेमुळे शेतकरी आणि इतर क्षेत्रांसमोर आव्हाने निर्माण होऊ शकतात. परंतु या अंदाजाचा उपयोग योग्य नियोजनासाठी करता येऊ शकतो. ऊर्जा, कृषी आणि जल व्यवस्थापन क्षेत्रांना यामुळे पूर्वतयारीची संधी मिळते. शेतकऱ्यांसाठी दीर्घकालीन अंदाजांपेक्षा १५ दिवस, एक महिना किंवा अल्पकालीन (२-३ दिवसांचे) अंदाज अधिक उपयुक्त ठरतात. त्यांचा योग्य वापर करणे गरजेचे आहे. अर्थात, देशपातळीवरील अंदाज अधिक अचूक असतात; राज्य किंवा स्थानिक पातळीवर काही प्रमाणात त्रुटी राहू शकतात. त्यामुळे पुढील टप्प्यात येणाऱ्या सुधारित अंदाजांमधून अधिक स्पष्टता मिळेल. म्हणूनच, पहिल्या अंदाजावरून नकारात्मक निष्कर्ष काढण्याची गरज नाही. ग्लोबल वॉर्मिंगसारख्या व्यापक घटकांचा प्रभाव लक्षात घेता, बदलत्या हवामानाशी जुळवून घेणे ही काळाची गरज आहे. योग्य नियोजन, सामूहिक प्रयत्न आणि सकारात्मक दृष्टीकोन यांच्या जोरावर कमी पावसाच्या पूर्वानुमानालाही आपण यशस्वीपणे सामोरे जाऊ शकतो. २००२ आणि २००९ सारख्या वर्षांत एल निनोमुळे पावसावर विपरीत परिणाम झाला होता. तरीही प्रत्येक वेळी परिणाम नकारात्मकच होतो असे नाही. १९९७ साली एल निनो असतानाही चांगला पाऊस झाला होता.

## आगामी साप्ताहिकी

२० एप्रिल २०२६ सोमवार
विनायक चतुर्थी
तिसरी तीज
वर्षीतपसामापन (जैन)
भगवतीस्वामी येवलेकर जयंती – टाकळी (नाशिक)
भैरवनाथ यात्रा – मलठण व शिंपे (दौड)

२१ एप्रिल २०२६ मंगळवार
श्री आद्य शंकरचार्य जयंती
भारतीय वैशाख मासारंभ
गोविंद महाराज पुण्यतिथी – अमरावती

२२ एप्रिल २०२६ बुधवार
श्री रामानुजाचार्य जयंती
श्रीतृसिंह नवरात्रारंभ

२३ एप्रिल २०२६ गुरुवार
गंगासप्तमी
जागतिक पुस्तक दिन
गुरुपुष्यामृतयोग रात्रौ ८.५७ पासून सकाळी ६.१७ पर्यंत
गंगापूजन तुकारामस्वामी प्रकट दिन – मोहपा (नागपूर)

२४ ऑगस्ट २०२६ शुक्रवार
दुगाष्टमी
शंकर महाराज पुण्यतिथी – धनकवडी (पुणे)
हंसराजस्वामी पुण्यतिथी – परांडा (धाराशिव)

२५ एप्रिल २०२६ शनिवार
सीता नवमी
पुरुषोत्तम महाराज पुण्यतिथी – काटोल
रामनाथस्वामी यात्रा – वाढोणा (अमरावती)

२६ एप्रिल २०२६ रविवार
कालभैरव यात्रा– निमगांव (बुलढाणा)
माता वासवी कन्यका प्रकट दिन
माता निमिषम्बादेवी प्रकट दिन

## दै. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. १२४

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 4 | | 7 | | | | | 5 | |
| | 8 | | 2 | 3 | | 6 | | |
| 6 | | 1 | | 8 | | | | 2 |
| 2 | 7 | 6 | 9 | | 8 | | | 4 |
| 8 | | | | | | | | 6 |
| 3 | | | 7 | | 6 | 1 | 8 | 9 |
| 7 | | | | 9 | | 4 | | 5 |
| | | 8 | | 4 | 3 | | 6 | |
| | 4 | | | | | 3 | | 8 |

### : सूडोकु :

**खेळाचे नियम :** प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३-३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

**सूडोकु क्र. १२३ चे उत्तर**

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 8 | 4 | 7 | 2 | 9 | 3 | 5 | 1 | 6 |
| 3 | 1 | 2 | 7 | 5 | 6 | 9 | 8 | 4 |
| 5 | 9 | 6 | 4 | 1 | 8 | 7 | 3 | 2 |
| 7 | 6 | 5 | 1 | 3 | 9 | 4 | 2 | 8 |
| 4 | 2 | 9 | 8 | 6 | 7 | 1 | 5 | 3 |
| 1 | 8 | 3 | 5 | 4 | 2 | 6 | 9 | 7 |
| 2 | 7 | 4 | 9 | 8 | 5 | 3 | 6 | 1 |
| 9 | 3 | 8 | 6 | 7 | 1 | 2 | 4 | 5 |
| 6 | 5 | 1 | 3 | 2 | 4 | 8 | 7 | 9 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १६५७ – न्यूयॉर्कमधील ज्यू व्यक्तिंना धर्मस्वातंत्र्य देण्यात आले.
- १७७० – जेम्स कूकच्या तांड्याला सर्वप्रथम ऑस्ट्रेलियाचा किनारा दिसला.
- १७९२ – फ्रांसने ऑस्ट्रियाविरुद्ध युद्ध पुकारले.
- १८३६ – अमेरिकेत विस्कॉन्सिन प्रांताची निर्मिती.
- १८६१ – अमेरिकन गृह युद्ध – उत्तरेच्या सेनापती रॉबर्ट ई. लीने राजीनामा देउन व्हर्जिनीयाचे सेनापतीपद घेतले.

### राष्ट्रीय

- २००४ – लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्याच्या मतदानाच्या दिवशी हिंसाचारात वीस ठार.
- २००७ – बॉलीवूड अभिनेता अभिषेक बच्चन आणि अभिनेत्री ऐश्वर्या राय यांचे थाटात शुभमंगल झाले.

### जन्म

- १६३३ – गो–कोम्ये, जपानी सम्राट याचा जन्म.
- १८०८ – नेपोलियन तिसरा, फ्रांसचा सम्राट याचा जन्म.
- १८८९ – एडॉल्फ हिटलर जर्मन हुकुमशहा याचा जन्म.
- १९३९ – ग्रो हार्लेम ब्रुंडलँड नॉर्वेचा पंतप्रधान यांचा जन्म.
- १९४९ – मासिमो दालेमा इटलीचा पंतप्रधान यांचा जन्म.

### निधन

- १३१४ – पोप क्लेमेंट चौथा यांचे निधन.
- १५२१ – झेंगडे, चीनी सम्राट यांचे निधन.
- १९४७ – क्रिस्चियन दहावा, डेन्मार्कचा राजा यांचे निधन.
- १९५१ – ईव्हानो बोनोमी इटलीचा पंतप्रधान यांचे निधन.
- २००८ – डॉ. सरोजिनी बाबर, मराठीतील ख्यातनाम लोकसाहित्यीक व शिक्षणतज्ज्ञ यांचे निधन.

## उपदेशकथा

### थांबला तो संपला

तीन मित्र पायी प्रवासाला निघाले होते. डोंगर–दऱ्यांमधून ते खूप चालले होते. उन्हामुळे अंगाची लाही लाही होत होती. त्यांच्याजवळचे पाणी संपले होते. पाणी कुठून आणावे ते त्यांना कळेना. सभोवताली त्यांनी खूप शोध घेतला. ते डोंगरावर चढले आणि वरून खाली पाहून पाण्याच्या साठ्याचा शोध घेऊ लागले. इतक्यात त्यांना एक झरा दिसला. त्यातला एक प्रवासी पाणी पाहून ओरडला, 'अरे, खाली कोणी आहे का, आम्हाला जरा पाणी आणून द्याल? आम्हाला खूप तहान लागली आहे.' दुसरा म्हणाला, 'हा झरा इतक्या खाली का आहे? आता कोण तिथे जाणार? आताच जीव मेटाकुटीला आला आहे. त्यातून तिथपर्यंत जायचे म्हणजे?' या दोघांच्या बोलण्याकडे थोडेदेखील लक्ष न देता तिसरा झऱ्याजवळ गेला आणि पोटभर पाणी पिऊन आलाही. तोपर्यंत हे दोघे नुसताच विचार करत बसले होते; तिसरा प्रवासी म्हणाला, 'तुम्ही बसा, मी जातो आता पुढच्या प्रवासाला, कारण जो थांबला तो संपला...' असे म्हणून तो त्या दोघांना सोडून निघालाही.

कथा उपदेश : जीवनाची उमेदवारी म्हणजे शिक्षण.

## पंचांग

| | |
|---|---|
| पंचांग | योग:सौभाग्य १६:१०:४५ |
| २० एप्रिल २०२६ | करण:गर ०७:२७:४६ |
| सोमवार | करण:वणिज १७:४९:४४ |
| विक्रम संवत्– २०८२ | करण:विष्टि २८:१५:०६+ |
| वैशाख शके | सूर्य:मेष |
| संवत्– १९४८ | चन्द्र:वृषभ |
| संवत्सर – पराभवनाम | हिजरी सन् – १४४६ |
| अयन– दक्षिणायण | मुस्लिम मास – जिल्काद |
| मास– वैशाख | तारीख – २ |
| ऋतु – सौर वसंत | विशेष |
| शुक्ल पक्ष | विनायक चतुर्थी |
| तिथि:तृतीया ०७:२७:४६ | तिसरी तीज |
| तिथि:चतुर्थी | वर्षीतपसामापन (जैन) |
| २८:१५:०६+ | भगवतीस्वामी येवलेकर |
| नक्षत्र:रोहिणी | जयंती – टाकळी |
| २६:०८:०८+ | (नाशिक) |

## : SMS :

Tujse dosti karne
ka hisab na aya,
mere kisi bhi sawal
ka jawab na aya,
hum to jagte rahe
tere hi khayalo me,
aur tujhe so
kar bhi hamara
khawab na aya.

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | ३७.६ | २७.१ |
| अहमदनगर | ३५.५ | २५.७ |
| अकोला | ३९.७ | २७.९ |
| अमरावती | ३९.९ | २६.६ |
| बीड | ४३ | ३०.५ |
| भंडारा | ४४.१ | २९.१ |
| बुलढाणा | ३८.८ | २०.७ |
| चंद्रपूर | ४२.४ | ३१.८ |
| चेन्नई | ४२.७ | ३२.१ |
| नवी दिल्ली | ३८.७ | २४.६ |
| धुळे | ३६.२ | २४.८ |
| गोंदिया | ४३.५ | २८.८ |
| जळगाव | ३८.५ | २७.८ |
| कोल्हापूर | ३७.९ | २४.१ |
| लातूर | ३७.२ | २७.७ |
| मुंबई | ४०.३ | ३१.५ |
| नागपूर | ४१.९ | २८.३ |
| नांदेड | ४१.२ | २८.१ |
| नंदूरबार | ३५.८ | २३.७ |
| नाशिक | ३६.२ | २४.२ |
| पुणे | ३५.७ | २४.१ |
| पंढरपूर | ४०.२ | २८.२ |
| सातारा | ३७.४ | २३.९ |
| सांगली | ३९ | २६.१ |
| सोलापूर | ४० | २९.१ |
| वर्धा | ४१.९ | २६.९ |

## आजचे राशिभविष्य

**मेष :** शुभ रंग:केसरी, शुभ दिशा: उत्तर सकारात्मक वातावरण निर्माण होईल त्याचा फायदा घ्या. केलेल्या कामाचे समाधान मिळेल.

**तुळ :** शुभ रंग : जांभळा, शुभ दिशा: पूर्व आपले धैर्य आपल्या कुटुंबात व समाजात मान सन्मान मिळवून देणार आहे.

**वृषभ :** शुभ रंग: पिवळा, शुभ दिशा: उत्तर काम सेवा या भावनेने करा. आर्थिक परिस्थिती मजबूत राहील. जवळच्या व्यक्तिमुळे घरात तणाव निर्माण होईल.

**वृश्चिक :** शुभ रंग: हिरवा, शुभ दिशा:पूर्व आज चांगल्या संधी आपणास मिळणार नाही. आर्थिक स्थिती चांगली राहील. प्रगतीमुळे आपण प्रसन्न रहाल.

**मिथुन :** शुभ रंग: पांढरा: शुभ दिशा: पश्चिम आपल्या विचारांची दखल घेतली जाईल. अचानक लाभ होण्याचे योग आहेत.

**धनु :** शुभ रंग: लाल, शुभ दिशा: उत्तर दिवस धावपळीचा राहील परंतु आर्थिक फायदा भरपूर होईल. योग्य समुहाशी संबध जुळण्याचा योग आहे.

**कर्क :** शुभ रंग: गुलाबी, शुभ दिशा: उत्तर आर्थिक स्थिती उत्तम राहील. आपली विश्वासनियता वाढेल. व्यापार वाढीकरिता योग्य प्रयत्न करा.

**मकर :** शुभ रंग: केसरी, शुभ दिशा: पश्चिम मनमिळावू स्वभावाचा आज आपल्याला फायदा होणार आहे.


**सिंह :** शुभ रंग: हिरवा, शुभ दिशा:पूर्व भौतिक साधने मिळण्याचे योग आहेत. मान सन्मान वाढणार आहे. पैसा अधिक खर्च होईल.

**कुंभ :** शुभ रंग: पिवळा, शुभ दिशा: पश्चिम निर्णय घेतांना मर्यादा पाळा. कामकाजात अडचणी आल्यामुळे मन दु:खी राहील.

**कन्या :** शुभ रंग: लाल, शुभ दिशा: उत्तर भौतिक सुख साधनाकरिता आपला पैसा खर्च होईल. दुसऱ्यांचा सल्ला आपल्याकरिता फायदेशीर राहील.

**मीन :** शुभ रंग: निळा, शुभ दिशा: पूर्व भावनेने निर्णय घेऊ नका नुकसान होण्याची शक्यता आहे. कामाचे चिज होणार नाही. स्वत: आपल्या कामात उत्साह दाखवा.

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. १२४



### आडवे शब्द

१. दया
३. मांडी
५. अदबीने
१०. वस्तू, जिन्नस
११. काथ्यकूट, तीच–ती चर्चा
१२. तात्पर्य
१३. थापा मारणारा
१५. सुवर्ण
१७. दुधाचे पक्वान्न
१९. सूर्यमालेचा घटक
२०. एक ज्वालाग्राही पदार्थ
२१. भाताचा एक चवदार प्रकार
२२. पुरेसे, पुष्कळ
२४. सर्व
२६. कुटील बेत, कारस्थान
२७. भ्रम, जादू
२८. घर
२९. पश्चात्ताप
३२. परतंत्र
३३. आकर्षण, लोभ
३४. जमीन
३५. ढग
३७. विष
४०. आई
४१. सूर्य
४२. चांगले नशीब
४३. जाणुनबुजून, हेतूत:
४५. पवित्र
४७. देवदासची प्रेयसी
४८. अभिनेता
४९. भय
५१. नशीब
५२. पती
५४. अधीन
५५. सगळ्यात महाग रत्न
५६. औषधी मात्रा उगाळण्याचा दगड
५७. सरबताचे आंबट फळ
५९. गाढव आणि ससा
६१. जास्त वजनाचे
६३. मोठ्या आकराचे
६५. जोखड
६६. मासा
६८. श्रीमंत
७०. उद्यान
७२. कावळा
७३. थोर
७५. वृक्ष
७६. पुष्कळ
७७. पोट
७८. अशक्य, टोकाचा
७९. राजाची आई
८१. केसांचा कृत्रिम रंग
८२. राजाची गाडी
८३. जंगल
८४. कसोटी

### उभे शब्द

१. गोंगट
२. धाक
३. स्वीकार
४. सोन्याचे शुद्धतेचे प्रमाण
५. अजून
६. पृथ्वी
७. पुराचा फटका बसलेले
८. गोष्ट
९. वेळ दाखवणारे यंत्र
१४. अंत, मर्यादा
१६. नवीन
१८. कुमक
२२. भिववणारे
२३. सेतू
२५. आर्जवे, अजीजी
२६. वस्त्र
२७. चोप
२८. निर्हेतुक, लीलया
३०. प्रखरता, तीष्णता
३१. चमत्कारिक
३२. पावलांचा आवाज
३६. मातीचे पात्र बनवणारा
३८. सहस्रावधी
३९. पुच्छ
४०. शेवटचा मणका
४४. सिंह
४५. शंकराचे प्रतीक
४६. एखाद्या भरवशावर राहणे
४७. बंध
५०. युद्धभूमी
५३. उसाचा काकवीपेक्षा दाट रस
५४. रंग
५५. डासामुळे होणारा आजार
५८. तळ, खालचा भाग
६०. काव्य
६२. बारा
६३. टोक
६४. बांधून ठेवणारी गोष्ट
६७. बकरा
६९. अवास्तव, खूप जास्त
७०. परका, बाहेरून आलेला
७१. ---- महावीर– जैनांचे तीर्थंकर
७२. कथेपेक्षा दीर्घ वाङ्मय प्रकार
७३. सहाय्य
७४. पराभव
७५. मनातील भावना, मनोव्यापार
७८. स्वाभाविक आवड, प्रवृत्ती
८०. किंचित

### जम्बो शब्दकोडे क्र. १२३ चे उत्तर

आडवे उत्तर ६.अंगरक्षक ९.जेथे जातो तेथे तू माझा सांगाती ११.पितामह १४.वाईट १६.चाकवत १८.ममी १९.चक्रम २१.सदाशिव २२.दळ २३.पातक २८.पाणी २९.लंकेची पार्वती ३२.चकमक ३३.साद ३४.दारमदार ३५.टक्के ३६.रत ३८.फी ४०.वाढ ४२.डच्चू ४३.समर ४४.पाटा ४५.दणका ४६.गारठा ४७.आवर ४८.वाली ४९.रंक ५०.फत्ते ५१.प्रज्ञा ५२.उसंत ५३.आंध्र ५४.गोड ५५.ऐरावत ५७.ऊस ५९.तपकीर ६१.ईर ६३.रास ६४.जननी ६५.यज्ञ ६६.मालदार ६८.रोग ६९.सतत ७०.भुई ७१.आमदार

उभे उत्तर : १.तजेला २.आजारी ३.नातेवाईक ४.फितूर ५.आझाद ६.अंगारक ७.गती ८.क्षमता १०.नेहमी ११.पितळ १२.ममता १३.चक्रपाणी १५.सदा सर्वदा १६.चावट १७.वदन २०.मत २४.कलंदर २५.प्राचीन २६.वाकडा २७.ढकलाढकली २८.पाकीट ३०.तीरकामठा ३१.उदास ३७.तडकाफडकी ३९.मटार उसळ ४१.उदक ४३.सरबराई ४४.पाव ४७.आज्ञा ४८.वात ४९.रंध्र ५१.प्रत ५३.आंबा ५४.गोप ५६.वरमाई ५८.खासदार ५९.तन ६०.रयत ६२.अंदाज ६४.जग ६७.जोम

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे–४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०–२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे...



## राहुल साठे यांच्या दमदार सादरीकरणाने रंगला संयुक्त जयंती महोत्सव

पुणे (दैनिक संध्या) : छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त बोपोडी येथे आयोजित संयुक्त जयंती महोत्सवात भीमगीतांनी वातावरण भारावून गेले. विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक महोत्सव समिती, पुणे तसेच रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आ.) यांच्या वतीने हा कार्यक्रम उत्साहात पार पडला. छत्रपती शिवाजी महाराज उद्यान, बोपोडी येथे पार पडलेल्या या कार्यक्रमात आंबेडकरी चळवळीतील लोकप्रिय गायक आयकॉन स्टार राहुल साठे आणि त्यांच्या टीमने सादर केलेल्या दमदार भीमगीतांनी प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले. त्यांच्या जोशपूर्ण सादरीकरणाला उपस्थितांकडून उत्स्फूर्त दाद मिळाली. कार्यक्रमाला सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासनाचे प्रमुख डॉ. विजय खरे, समितीचे अध्यक्ष, उपमहापौर परशुराम वाडेकर, रिपब्लिकन पक्षाचे अविनाश कदम, माजी उपमहापौर सुनीता वाडेकर, संदीप धांडोरे आदी मान्यवर उपस्थित होते. “प्रथम तुज वंदना”, “पिंपळाच्या पानावर पाहिले चित्र गौतमाचे”, “सोनियांची उगवली सकाळ”, “माझ्या भीमरायावानी सांगा पुढारी होईल का”, “किती शोभला असता भीम नोटांवर”, “माझ्या भीमाची पुण्याई”, “जिवाला जीवाच दान”, “भीमाची लेखणी”, “नांदण नांदण नंदन” आणि “माझ्या भीमाच्या नावाचं” या गीतांनी संपूर्ण परिसरात उत्साहाची लहर निर्माण केली. याशिवाय “भले भले पुढारी करतात भीमाला सलाम” या गीतासह विविध सादरीकरणांना प्रेक्षकांकडून जोरदार प्रतिसाद मिळाला. ओमप्रकाश सोनवणे आणि अभिजीत भवर यांनीही आपल्या सादरीकरणातून कार्यक्रमात रंगत आणली.

## जिल्ह्यात 9 हजाराहून अधिक मुलींना लाभ- मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील

पुणे (दैनिक संध्या) : राज्यातील मुलींच्या जन्माला प्रोत्साहन मिळावे म्हणून सुरु करण्यात आलेल्या लेक लाडकी योजनेअंतर्गत जिल्ह्यात १ एप्रिल २०२३ नंतर जन्म झालेल्या ९ हजार ४८२ मुलींना मागील तीन वर्षात ४ कोटी ७४ लाख १० हजार रुपये लाभ देण्यात आली असल्याची माहिती जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांनी दिली आहे. तसेच या योजनेचा पात्र लाभार्थ्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहनही त्यांनी केले आहे. पहिला हप्ता प्रति लाभार्थी रु ५ हजार रुपयाप्रमाणे सन २०२३-२४ मध्ये १ हजार ४० मुलींना ७० लाख रुपये, सन २०२४-२५ मध्ये ५ हजार ७२० मुलींना २ कोटी ८६ लाख रुपये आणि सन २०२५-२६ मध्ये २ हजार ३६२ मुलींना १ कोटी १८ लाख १० हजार रुपयांचा लाभ देण्यात आलेला आहे. मुलीच्या जन्मास प्रोत्साहन देवून मुलींचा जन्मदर वाढवणे,मुलींच्या शिक्षणास चालना देणे, मुलीचा मृत्यूदर कमी करणे, बालविवाह रोखणे, कुपोषण कमी करणे. शाळाबाह्य मुलींचे प्रमाण शुन्यावर आणण्यासाठी प्रोत्साहित करण्याच्या उद्देशाने लेक लाडकी योजना सुरु करण्यात आली आहे. योजनेच्या अटी शर्ती पुढील प्रमाणे: लाभार्थ्यांचे कुटुंब महाराष्ट्र राज्याचे रहिवासी असावे. लाभार्थीचे बँकेत खाते असावे. कुंटुंबांचे वार्षिक उत्पन १ लक्ष पेक्षा जास्त नसावे. ही योजना पिवळया व केशरी शिधापत्रिकाधारक कुंटुंबामध्ये १ एप्रिल २०२३ रोजी व त्यानंतर जन्माला येणाऱ्या एक अथवा दोन बालिकांसाठी लागू आहे. एक मुलगा व मुलगी असल्यास मुलीला लागू आहे. मुलीच्या जन्मानंतर रक्क्म ५ हजार रुपये, इयत्ता पहिलीत ६ हजार रुपये, इयत्ता सातवीत ७ हजार, इयत्ता अकरावीत ८ हजार, मुलीचे वय १८ वर्षे पूर्ण झाल्यानंतर ७५ हजार रुपये असे मिळून १ लाख १ हजार रुपयाचा लाभ देण्यात येतो. जिल्हा परिषदेचे अध्यक्ष वीरधवल जगदाळे, उपाध्यक्ष दिलीप वळसे पाटील, बालकल्याण सभापती अंकिता पाटील यांनी जिल्ह्यातील स्त्री-पुरुष प्रमाण संतुलित राखण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्यासोबतच महिला सक्षमीकरणाकरिता प्रभावी योजनांची आखणी करून अंमलबजावणी करण्याचे निर्देश दिले आहेत, अशी माहिती जिल्हा कार्यक्रम अधिकारी (महिला व बालविकास) आनंद खंडागळे यांनी दिली आहे.

## जमीन गुंतवणुकीच्या आमिषाने व्यावसायिकाची 2.40 कोटींची फसवणूक

पुणे (दैनिक संध्या) : जमीन खरेदीत गुंतवणुकीच्या आमिषाने एका व्यावसायिकाची दोन कोटी ४० लाख रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी एका सेवानिवृत्त सहाय्यक पोलिस आयुक्तासह पाच जणांवर चतुःश्रृंगी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी व्यावसायिक अभिजित विलास उंद्रे (वय ३५, रा. मांजरी खुर्द) यांनी फिर्याद दिली आहे. त्यावरून सेवानिवृत्त सहाय्यक आयुक्त सुशिल शंकरराव कदम, नंदा सुशिल कदम, अनिकेत कदम (तिघे रा. फर्ग्युसन रस्ता, पुणे), दत्ता केदारी (रा. बोरज, जि. पुणे) आणि बाळासाहेब आर. वाळुंज (रा. कामशेत, ता. मावळ) या संशयितांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी सहाय्यक आयुक्त कदम हे पुणे ग्रामीण आणि पुणे शहर पोलिस दलात कार्यरत होते.

# ‘लोककला दर्शन’ कार्यक्रमाने संयुक्त जयंती महोत्सवाचा समारोप

**महात्मा फुले आणि महामानव डॉ. आंबेडकर यांच्या प्रेरणेने हे वर्ष सामाजिक सुधारणांचे वर्ष ठरावे: परशुराम वाडेकर**

पुणे (दै. संध्या)

यंदाचे वर्ष क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जन्मद्वीशताब्दी आणि महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या चवदार तळ्याच्या सत्याग्रहाचे शताब्दी वर्ष आहे. त्यांच्या कार्यापासून प्रेरणा घेऊन हे वर्ष सामाजिक सुधारणांचे वर्ष ठरावे, अशी अपेक्षा उपमहापौर परशुराम वाडेकर यांनी व्यक्त केली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक महोत्सव समिती आणि रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने साजऱ्या करण्यात आलेल्या छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिबा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंती महोत्सवाच्या समारोप



प्रसंगी वाडेकर बोलत होते. औंध बोपोडी परिसरातील महापालिकेच्या खेडेकर रुग्णालयात डायलिसिस, फिजिओथेरपी, मुलांसाठी आयसीयू अशा अत्याधुनिक सुविधांनी सुसज्ज झाले असून आगामी काळात शेवाळे रुग्णालयात कर्करोग आणि दंत रोगावर उपचारांच्या अत्याधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्यात येतील. त्याचप्रमाणे संजय गांधी रुग्णालयाच्या खाजगीकरणाचा डाव उधळून लावला गेला असून कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी निधीच्या माध्यमातून या रुग्णालयाचे देखील आधुनिकीकरण केले जाणार आहे, अशी घोषणा आहे वाडेकर यांनी यावेळी केली.

या कार्यक्रमात डॉ. झिब्रा इस्रायल यांचा त्यांच्या सामाजिक कार्यासाठी डॉ बाबासाहेब आंबेडकर जीवनगौरव पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. औंध बोपोडी परिसरातील महापालिका रुग्णालयांमध्ये आधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्यात डॉ. इस्रायल यांचे मोलाचे योगदान आहे. रोटरी क्लब ऑफ पुणे डाऊन टाउनच्या त्या असिस्टंट गव्हर्नर असून या माध्यमातून देखील त्यांनी केवळ औंध बोपोडी परिसरातच नव्हे तर संपूर्ण पुणे शहरात वैद्यकीय, शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले आहे. या कार्याची दखल घेऊन त्यांना हा पुरस्कार देण्यात आला. आपल्या कार्यामध्ये माजी उपमहापौर सुनीता वाडेकर व विद्यमान उपमहापौर परशुराम वाडेकर यांचे मोलाचे सहकार्य असून या पुढील काळातही समाजासाठी योगदान देण्याचा आपला प्रयत्न राहील, असे डॉ. इस्राएल यांनी यावेळी नमूद केले.

महोत्सवाच्या समारोपानिमित्त "लोककला दर्शन" या कार्यक्रमाचे विशेष आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात भाकरी गीत, पोतराज, शेतकरी गीत, भारुड, लावणी, शाहिरी, भीम किर्तीचा पोवाडा, जागरण गोंधळ अशा विविध लोककलांचे दर्शन कलाकारांनी प्रभावीरीत्या घडवले. रसिकांनी या कलांचा मोठ्या उत्साहाने आस्वाद घेतला.

## सर्व विभागांनी समन्वयाने काम करा - व्ही. राधा

पुणे (दै. संध्या)

नीती आयोग, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण आणि महाराष्ट्र शासनाची महत्त्वाकांक्षी योजना असलेल्या पुणे ग्रोथ हब आराखड्याचा सामान्य प्रशासन विभागाच्या अपर मुख्य सचिव व्ही. राधा यांनी दूरदृश्यप्रणालीद्वारे गुरुवारी आढावा घेतला. संबंधित विभागांनी वारंवार बैठका घेऊन समन्वयाने अंतिम आराखडा सादर करण्याच्या प्रक्रियेला गती द्यावी अशा सूचना त्यांनी यावेळी दिल्या. यावेळी विभागीय आयुक्त कार्यालयातून राज्य वित्त आयोगाचे अध्यक्ष डॉ. नितीन करीर, विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर, पिंपरी चिंचवड महानगरपालिका आयुक्त डॉ. विजय सुर्यवंशी, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या अतिरिक्त आयुक्त के. मंजुलक्ष्मी, पीएमपीएलचे व्यवस्थापकीय संचालक महेश आव्हाड, पुणे महानगरपालिकेच्या अतिरिक्त आयुक्त पवनीत कौर,जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील तसेच विविध विभागांचे अधिकारी, सल्लाकार कंपन्यांचे प्रमुख उपस्थित होते. पुणे ग्रोथ हबमुळे स्टार्टअप, आयटी आणि उत्पादन क्षेत्रात मोठी गुंतवणूक होणार आहे. त्यामुळे ग्रोथ हब प्रकल्पांचे पुणे आर्थिक क्षेत्रासाठी दीर्घकालीन दृष्टीकोन लक्षात घेऊन सर्वसमावेशक नियोजन करावे. प्रकल्पांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सर्व संबंधित विभागांशी विभागनिहाय सविस्तर बैठका आयोजित करून प्रत्येक विभागाचा भविष्यातील दृष्टीकोन, गरजा व प्राधान्यक्रम समजून घेऊन या कामाला प्राधान्य द्यावे, अशा सूचना श्री. करीर यांनी दिल्या.

## Wobble One चे पुणे पदार्पण : ग्राहक आणि इन्फ्लुएंसर्समध्ये अभूतपूर्व उत्साह

*केंशा मोबाईल्स, धनोरी येथे Wobble One च्या शहरातील पहिल्या अनावरण सोहळ्यात उसळली गर्दी*

पुणे (दै. संध्या)

Wobble — भारतीय ग्राहक तंत्रज्ञान ब्रँड जो आपल्या धाडसी डिझाईन तत्त्वज्ञान आणि कामगिरी-केंद्रित अभियांत्रिकीसाठी ओळखला जातो — आज आपला प्रमुख स्मार्टफोन Wobble One पुण्यात घेऊन आला. केंशा मोबाईल्स, धनोरी येथे शहरातील पहिले लाइव्ह अनावरण झाले, ज्यात ग्राहक, कंटेंट क्रिएटर्स आणि स्थानिक इन्फ्लुएंसर्सचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. उपस्थितांनी Wobble One चा सेगमेंट-डिफायनिंग कॅमेरा सिस्टम, AI-पॉवर्ड फोटोग्राफी, Dolby Vision डिस्प्ले आणि फ्लॅगशिप-दर्जाची कामगिरी प्रत्यक्ष अनुभवली. पुण्याच्या अनावरण सोहळ्याला शहराच्या कानाकोपऱ्यातून मोठी आणि उत्साही गर्दी जमली. पहिल्यांदाच स्मार्टफोन अपग्रेड करू पाहणाऱ्यांपासून ते अनुभवी कंटेंट




क्रिएटर्स आणि डिजिटल-फर्स्ट तरुणांपर्यंत — केंशा मोबाईल्स, धनोरी दिवसभर शोध आणि उत्साहाचं केंद्र बनलं. सोहळ्यात सहभागी झालेले इन्फ्लुएंसर्स पुण्यात Wobble One प्रत्यक्ष हातात घेऊन अनुभवणारे पहिले ठरले — 50MP Creator's Eye फ्रंट कॅमेऱ्याची 4K HDR इमेजिंग तपासली आणि या फोनची ताकद थेट जाणून घेतली. स्टोअरमधील वातावरण या प्रॉडक्टच्या स्वभावाचं थेट प्रतिबिंब होतं — एक असा फोन जो ग्राहकांना कामगिरी, डिझाईन आणि किमतीमध्ये तडजोड करायला भाग पाडत नाही. आलेले सर्वजण हे ठामपणे जाणून गेले की Wobble One हा या सेगमेंटमधील सर्वाधिक क्रिएटर-फर्स्ट पर्याय का आहे. Wobble One चा आधार एक ट्रिपल रियर कॅमेरा सिस्टम आहे. त्याचं नेतृत्व Sony LYTIA 600 सेन्सर, Optical Image Stabilisation (OIS) आणि 4K HDR व्हिडिओ व इमेज क्षमता असलेला 50MP मेन कॅमेरा करतो — एक असं स्मार्ट इमेजिंग इंजिन जे शूटिंगच्या प्रत्येक परिस्थितीशी जुळवून घेतं आणि कोणत्याही वातावरणात स्पष्ट, स्थिर व वास्तवदर्शी छायाचित्रे देतं. 8MP Ultra-Wide Bokeh लेन्स विस्तृत दृश्ये टिपतो, तर 2MP Macro लेन्स सूक्ष्म तपशीलांना जवळून टिपतो. समोरील कॅमेऱ्यात 4K HDR इमेजिंग आणि व्हिडिओसह 50MP Creator's Eye कॅमेरा या सेगमेंटमध्ये पहिल्यांदाच या पातळीची फ्रंट-कॅमेरा कामगिरी देतो — भारतातील रीलर्स, व्लॉगर्स आणि कंटेंट-फर्स्ट ग्राहकांसाठी विशेषतः घडवलेला.

## ‘दिल चीज क्या है...’च्या सुरांनी भारावले श्रोते

**आशा भोसले यांना समधुर सुरांतून आदरांजली : सुवर्णकाळातील शलाकातून अजरामर गीतांची रंगली अविस्मरणीय मैफिल**

पुणे (दै. संध्या)

पुणे : संगीतप्रेमींसाठी ‘दिशा’ यांच्या वतीने “सुवर्णकाळातील शलाका” हा विशेष संगीत कार्यक्रम बालशिक्षण भवन येथील सभागृहात मोठ्या उत्साहात पार पडला. जुन्या हिंदी चित्रपटसृष्टीतील सुवर्णकाळ गाजवणाऱ्या अभिनेत्री आणि त्यांच्या अजरामर गीतांवर आधारित या मैफलीने उपस्थित रसिकांना सुरेल आठवणींच्या दुनियेत नेले. या कार्यक्रमाचे खास आकर्षण म्हणजे ज्येष्ठ गायिका आशा भोसले यांना अर्पण करण्यात आलेली स्वरमयी आदरांजली. त्यांच्या अजरामर गाण्यांमधून सादर झालेली ही श्रद्धांजली रसिकांच्या मनाला भिडणारी ठरली.




दुनिया मे लोगों को, जाने जा, जीवन पे हर मोड पर, निगाहे मिलाने को, ‘ये रात भीगी भीगी’, ‘इस मोड़ से जाते हैं’, ‘रुक जा रात ठहर जा रे चंदा’, ‘आप के हसीन रुख पे’, ‘पिया तोसे नैना लागे रे’ तसेच ‘कौन है जो सपनों में आया’ अशी अनेक अजरामर गीते सादर करण्यात आली.

गझल, ठुमरी, प्रेमगीते आणि विरह गीते अशा विविध प्रकारांनी कार्यक्रमाला बहार आली आणि श्रोत्यांनी टाळ्यांच्या कडकडाटात कलाकारांना दाद दिली.

या मैफलीत सुप्रसिद्ध गायिका शलाका घैसास यांनी आपल्या सुरेल व भावपूर्ण आवाजाने रसिकांची मने जिंकली. तसेच गायक अजय राव, प्रसाद केळकर आणि अतुल किल्लेदार यांनीही आपल्या सादरीकरणातून कार्यक्रमात रंगत आणली.

प्रत्येक गाण्यातील भावनांची अचूक अभिव्यक्ती आणि सुरांची नेमकी मांडणी यामुळे कार्यक्रम अधिक उठावदार ठरला. कार्यक्रमाची संकल्पना व आयोजन शलाका घैसास यांनी केले होते, तर निवेदनाची धुरा मनीष गोखले यांनी समर्थपणे सांभाळली. त्यांच्या माहितीपूर्ण आणि बहारदार निवेदनामुळे प्रत्येक गाण्यामागील संदर्भ रसिकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचला.

वाद्यसंगतीसाठी अमन सय्यद, ओंकार पाटणकर, हार्दिक रावल, विशाल गंड्रतवार, संजय खाडये आणि चारू किंजवाडकर यांनी दिलेली साथही उल्लेखनीय ठरली. त्यांच्या सुरेल साथसंगतीमुळे कार्यक्रम अधिक समृद्ध झाला.

## वीज उपकेंद्राच्या जागेसाठी लोकप्रतिनिधींची मदत घ्या : मेघना साकोरे-बोर्डीकर

पुणे (दै. संध्या)

वेगाने वाढणाऱ्या पुणे व पिंपरी चिंचवड महानगरांची वाढती विजेची गरज विचारात घेऊन महावितरण व महापारेषण कंपनीने वीज विकासाचा बृहत आराखडा तयार करावा. तो करताना मनपा व महावितरणने एकमेकांशी समन्वय ठेवावा. जिथे नविन वीज उपकेंद्रे प्रस्तावित आहेत किंवा भविष्यात करणे गरजेचे आहे; त्या जागा मिळविण्यासाठी स्थानिक आमदारांची मदत घ्यावी जेणेकरुन जागेचे प्रश्न लवकर मार्गी लागून नागरिकांना सुरळीत वीजपुरवठा मिळेल असे मत ऊर्जा राज्यमंत्री मेघना सोकारे-बोर्डीकर यांनी व्यक्त केले. पुणे व पिंपरी चिंचवड महानगरातील वीज समस्यांचा आढावा घेण्यासाठी गणेशखिंड मधील प्रकाशभवन येथे राज्यमंत्री ना. बोर्डीकर यांनी बैठक घेतली. या बैठकीला महापौर मंजुषा नागपूरे, आ. बापूसाहेब पठारे, आ. शंकर जगताप, आ. योगेश टिळेकर, आ. अमित गोरखे यांचेसह महावितरणचे मुख्य अभियंता सुनिल काकडे (पुणे) व धर्मराज पेठकर (बारामती), महापारेषणचे मुख्य अभियंता अनिल कोलप यांचेसह पुणे व पिंपरी चिंचवड मनपाचे अधिकारी यांची उपस्थिती होती. बैठकीमध्ये भूमिगत वाहिन्यांचा प्रश्न स्थानिक आमदारांनी प्राधान्याने मांडला. मात्र भूमिगत वाहिन्यांसाठी खोदाई शूल्काचा मुद्दा ऐरणीवर आला. कारण भूमिगत वाहिन्यांच्या खर्चापेक्षा खोदाई शुल्काचा खर्च चौपट जात आहे. नवीन कामांसाठी मिळालेला बहुतांश निधी खोदाई शुल्कातच जात असल्याने कामे कमी प्रमाणात होत आहेत. पिंपरी चिंचवड मध्ये 100 रुपये मीटर प्रमाणे शुल्क आकारुन महावितरणकडून रस्ते पूर्ववत करण्याच्या अटीवर परवानगी मिळते. त्या धर्तीवर पुणे महानगरात खोदाई शुल्क आकारण्याची मागणी महावितरणच्या अधिकाऱ्यांनी केली. याबाबतीत राज्यमंत्री बोर्डीकर यांनी पुणे मनपानेही पिंपरीप्रमाणे शुल्क आकारण्याची सूचना केली.

# बालविवाह रोखूया, भविष्य घडवूया

**बालविवाह ही मुलींच्या सर्वांगीण विकासाला अडथळा निर्माण करणारी आहे. शिक्षण,आरोग्य आणि स्वावलंबनाच्या संधी हिरावून घेणाऱ्या या प्रथेमुळे अनेक मुलींचे बालपण हरवते आणि त्यांचे आयुष्य अडचणीत येते. समाजातील रुढी, परंपरा, अज्ञान आणि आर्थिक कारणांमुळे आजही काही ठिकाणी बालविवाह होत असल्याचे दिसून येते. या गंभीर समस्येवर प्रभावी नियंत्रण ठेवण्यासाठी आणि मुलांच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी भारत सरकारने बालविवाह प्रतिबंधक कायदा, २००६ लागू केला आहे. हा कायदा बालविवाह रोखण्यासाठी, संबंधितांना शिक्षा करण्यासाठी तसेच पीडितांना न्याय व संरक्षण देण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरतो.**

**संकलन : जिल्हा माहिती कार्यलय, पुणे**



भारतात मुलीच्या विवाहाचे वय १८ निश्चित करण्यात आले आहे, हे आपल्याला माहिती आहेच. मात्र, भारतात मोठ्या प्रमाणात बालविवाह केले जातात. भारतीय पुरुषप्रधान संस्कृती आणि जुन्या रुढी-परंपरांचा पगडा यामुळे भारतात, विशेषतः ग्रामीण भागात आजही मुलगी वयात आली, की तिचे लग्न लावून दिले जाते. लहान वयात लग्न केल्यामुळे त्या मुलीच्या शारीरिक व मानसिक आरोग्यावर विपरीत परिणाम होतो. भारतात मोठ्या प्रमाणावर मुलींचे बालविवाह केले जात असल्यामुळे ते रोखणे अवघड आहे. त्यासाठी २००६ मध्ये बाल विवाह प्रतिबंधक कायदा करण्यात आला. हा कायदा २००७ मध्ये अमलात आला.

या कायद्यानुसार, मुलीचे वय १८ पूर्ण आणि मुलाचे वय २१ पूर्ण नसेल, तर तो कायद्याने गुन्हा मानला गेला आहे. अशा विवाहास बालविवाह मानले जाते आणि तो बेकायदेशीर ठरतो. मुलीचे वय १८ पूर्ण आणि मुलाचे वय २१ पूर्ण नसताना त्यांचा विवाह केल्यास त्यांचे कायदेशीर पालक शिक्षेला पात्र ठरतात. भारतात बालविवाह प्रतिबंधक कायदा एक नोव्हेंबर २००७ रोजी अस्तित्वात आला. भारतीय सर्वोच्च न्यायालयाने ऑक्टोबर २००७ मध्ये एक ऐतिहासिक निवाडा दिला. त्यानुसार अल्पवयीन पत्नीशी शरीरसंबंध हा गुन्हा ठरविण्यात आला. तोपर्यंत पुरुषांना लग्नबंधनामुळे अल्पवयीन वधूशीही शरीरसंबंध ठेवता येणे हा गुन्हा नव्हता. कायद्याचे स्वरुप: या कायद्याचे २१ विभाग आहेत. केंद्रशासित प्रदेश पॉंडिचेरीतील फ्रेंच नागरिकत्व असलेले लोक वगळता तो सर्वत्र लागू आहे. दुसऱ्या विभागात काही व्याख्या दिल्या आहेत.

या कायद्याअंतर्गत २१ वर्षे पूर्ण न केलेला पुरुष व १८ वर्षे पूर्ण न केलेली स्त्री, विवाहेच्छू कुटुंब म्हणून लग्न ज्याचे किंवा जिचे आहे, त्याचे किंवा तिथे अशी दोन्ही कुटुंबे तसेच बालविवाह वर व वधू यापैकी कुणीही बाल असेल, तर तो बालविवाह, सज्ञान कायद्यान्वये जो सज्ञान नाही, अशी कुठलीही व्यक्ती अल्पवयीन मानली जाते.

विवाहविच्छेद (कलम ३) नुसार प्रत्येक बालविवाह विवाहेच्छूक कुटुंबांच्या मर्जीने रद्द करता येतो. सज्ञान झाल्यानंतर दोन वर्षांच्या आत वर किंवा वधू जिल्हा न्यायालयात याचिका दाखल करून विवाहविच्छेद करू शकतात. यासंबंधात जिल्हा न्यायाधीश संबंधित कुटुंबांना विवाहाचा खर्च, पैसे, दागिने, भेटवस्तू व इतर किमती वस्तू दुसऱ्या कुटुंबास परत देण्याचा आदेश देऊ शकतात.

बालविवाह रद्द करताना जिल्हा न्यायाधीश वधुपक्षाला पोटगीरूपी भरपाई देण्याचा आदेश वरपक्षाला देऊ शकतात. बालविवाहातील पुरुषही अल्पवयीन असेल तर त्याच्या पालकांना ही भरपाई द्यावी लागेल. वधूचा दुसरा विवाह होईपर्यंत तिला ही भरपाई घेता येते. ही भरपाई एकदा किंवा दरमहा देता येते. यासोबत वधूच्या राहण्याची व्यवस्था करण्याबाबतचा आदेशही न्यायालय देऊ शकते. वधूची सांपत्तिक स्थिती बघून न्यायालय हा आदेश देऊ शकते.

बाल विवाह केल्यास शिक्षेची तरतूद: बालविवाह करणारा पुरुष १८ वर्षांहून अधिक वयाचा असेल तर त्याला दोन वर्षे सक्तमजुरीची शिक्षा होऊ शकते किंवा एक लाख रुपयापर्यंत दंड किंवा दोन्ही शिक्षा होऊ शकतात, लग्न लावल्याबद्दल शिक्षा बाल विवाह लावणारा, ठरवणारा, पार पाडणारा, सूचना देणारा अशा कुठल्याही पद्धतीने या विवाहाला प्रोत्साहन देणारा माणूस शिक्षेस पात्र आहे. अशा व्यक्तीला दोन वर्षे सक्तमजुरीची किंवा एक लाख रुपये दंडाची किंवा दोन्ही शिक्षा होऊ शकतात.

बालविवाहास परवानगी देणारे माता पिता, अन्य पालक किंवा अशी एखादी संस्था, कळत नकळत या विवाहाला मान्यता देणारे, या विवाहास उपस्थित राहणारे अशा कुणालाही दोषी आढळल्यास दोन वर्षे सक्तमजुरी किंवा एक लाखापर्यंत दंड किंवा दोन्ही शिक्षा होऊ शकतात.

श्रीमती रोहणी ढवळे, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी:

प्रशासनाच्यावतीने एप्रिल २०२५ ते मार्च २०२६ अखेर ५४ बालविवाह रोखले असून १३ गुन्हे दाखल करण्यात आले आहे. बालविवाह करणे, त्याचे आयोजन करणे हे कायद्याने गुन्हा असून बालविवाहाचे आयोजन करणाऱ्या सर्व सहभागी यांना शिक्षा होऊ शकते. बालविवाह होत असल्याचे आढळल्यास चाईल्ड लाईन १०९८ या हेल्पलाइन क्रमांकावर तात्काळ संपर्क साधावा.

## थोडक्यात पण महत्वाचे...



## शिवराज काळभोर यांना अमेरिका अंतराष्ट्रीय विद्यापीठाची मानद डॉक्टरेट उपाधी

लोणी काळभोर (दैनिक संध्या) : लहान वयापासून समाजसेवेत उल्लेखनीय कार्य करत युवकांमध्ये भक्कम ओळख निर्माण करणारे युवा समाजसेवक शिवराज मनोज काळभोर यांना "अमेरिका इंटरनॅशनल युनिव्हर्सिटी"तर्फे समाजसेवा क्षेत्रातील मानद उपाधी प्रदान करण्यात आली. हा सन्मान काल एका विशेष समारंभात हॉटेल रेडिसण मुंबई येथे प्रदान करण्यात आला. काळभोर यांनी सामाजिक उपक्रम, युवक सक्षमीकरण आणि समाजविकासासाठी सातत्याने केलेल्या कामगिरीमुळे अनेक पुरस्कारही मिळवले आहेत. त्यांच्या नेतृत्वाखाली विविध सामाजिक उपक्रम राबवले जात असून युवकांमध्ये त्यांची चांगली पकड निर्माण झाली आहे. या गौरवपूर्ण प्रसंगी भारतीय पोलीस सेवेतील आय पी एस मोहन राठोड (आय जी महाराष्ट्र पोलीस), एसीपी संजय पाटील (मुंबई पोलीस) तसेच प्रसिद्ध चित्रपट निर्माते मिहूल कुमार आणि विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी काळभोर यांच्या कार्याचे कौतुक करत त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. या सन्मानामुळे काळभोर यांच्या सामाजिक कार्याला नवसंजीवनी मिळणार असून, भविष्यातही समाजसेवेच्या माध्यमातून युवकांना प्रेरणा देण्याचा त्यांचा निर्धार अधिक दृढ झाला आहे.

## अक्षयतृतीया निमित्त श्री ज्ञानदेवांच्या संजीवन समाधीवर पांडुरंग अवतार साकार



आळंदी (दैनिक संध्या) : अक्षयतृतीया निमित्त आळंदी येथे श्री ज्ञानदेवांच्या संजीवन समाधीवर भगवान पांडुरंगाचा देखणा अवतार साकारण्यात आला. भाविकांसाठी ही आकर्षणाची केंद्रबिंदू ठरलेली चंदन ऊटी पाहण्यासाठी दिवसभर मोठी गर्दी उसळली होती. पुणे येथील मूर्तिकार अभिजित ढोंडफळे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी अत्यंत कौशल्यपूर्ण पद्धतीने भगवान पांडुरंगाचा हा मनोहारी अवतार साकारला. सूक्ष्म बारकावे, आकर्षक रचना आणि भावपूर्ण साकारामुळे या मूर्तीने भाविकांचे मन वेधून घेतले. श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमिटी आणि स्वकाम सेवा मंडळ, आळंदी यांच्या संयुक्त विद्यमाने ही चंदन ऊटी साकारण्यात आली. या उपक्रमामुळे धार्मिक वातावरण अधिक प्रसन्न झाले असून, भाविकांनी समाधान व्यक्त केले.अक्षयतृतीयेच्या पावन मुहूर्तावर साकारलेला हा पांडुरंग अवतार भक्तांसाठी विशेष आध्यात्मिक अनुभूती देणारा ठरला.



## आळंदीत पत्रकारांचा गौरव; तक्षशिला बुद्ध विहार समितीचा उपक्रम

आळंदी (दैनिक संध्या) : समाजातील घडामोडींचे वस्तुनिष्ठ चित्रण करून लोकशाहीची चौथी बाजू मजबूत करणाऱ्या पत्रकारांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी तक्षशिला बुद्ध विहार समितीच्या वतीने विशेष सन्मान सोहळा उत्साहात पार पडला. पोलीस स्टेशन समोरील तक्षशिला बुद्ध विहार येथे रविवारी सकाळी ११ वाजता हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या प्रसंगी विविध वृत्तपत्रांतील पत्रकारांचा शाल, श्रीफळ व लेखणी देऊन सत्कार करण्यात आला. दै. पुढारीचे पत्रकार तथा हुतात्मा राजगुरू पत्रकार संघ, खेड तालुक्याचे नवनियुक्त अध्यक्ष श्रीकांत बोरावके, दै.सामनाचे पत्रकार व नवनियुक्त कार्याध्यक्ष अर्जुन मेदनकर, दै.राष्ट्रसह्याद्रीचे पत्रकार तथा महाराष्ट्र राज्य पत्रकार महासंघ, पुणे जिल्ह्याचे नवनियुक्त कार्याध्यक्ष दिनेश कुऱ्हाडे, दै.प्रभातचे पत्रकार महादेव पाखरे तसेच पत्रकार ज्ञानेश्वर कुऱ्हाडे यांचा विशेष गौरव करण्यात आला. कार्यक्रमाचे आयोजन तक्षशिला बुद्ध विहार समितीच्या वतीने करण्यात आले होते. यावेळी ज्ञानेश्वर रंधवे, विश्वनाथ थोरात, प्रवीण रंधवे, आनंद रणदिवे, सुभाष भोसले, विनायक गायकवाड, नामदेव सुरपल्लीकर, बाळासाहेब भोसले, भिमराव थोरात, नितीन थोरात, अशोक थोरात, संजय रंधवे, प्रशांत रंधवे, प्रभानंद शेलार, प्रमोद भालेराव, चारूदत्त रंधवे आदींसह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी आयु.आनंद रणदिवे म्हणाले, “पत्रकार हा समाजाचा आरसा असून त्यांच्या कार्याचा सन्मान करणे ही समाजाची जबाबदारी आहे.” सन्मानाला उत्तर देताना सत्कारमूर्तींनी समितीचे आभार मानत सामाजिक बांधिलकी जपत जबाबदारीने कार्य करण्याचा निर्धार व्यक्त केला.

# शिवसेना सर्वसामान्य लोकांच्या सेवेसाठी सदैव तत्पर

## उद्योगमंत्री उदय सामंत यांचे प्रतिपादन; धर्मवीर आनंद दिघे नागरी सहाय्यता कक्षाचे उद्घाटन

पुणे (दै. संध्या) :

"सर्वसामान्य माणसाच्या अडीअडचणी सोडवण्यासाठी वेळोवेळी त्यांना मदतीचा हात देण्याचा धर्म शिवसेना पक्षाने पाळलेला आहे. धर्मवीर आनंद दिघे अखेरच्या श्वासापर्यंत सामान्यांसाठी कार्यरत होते. त्यांच्याच नावाने शिवसेना नेते व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या संकल्पनेतून 'धर्मवीर आनंद दिघे नागरी सहाय्यता कक्ष' ही लोकचळवळ सुरु झाली आहे. पुण्यातील नागरिकांना या कक्षाचा चांगला लाभ होईल व शिवसेनेची सामान्य लोकांप्रती असलेली बांधिलकी अधिक घट्ट होईल," असे प्रतिपादन उद्योग तथा मराठी भाषामंत्री उदय सामंत यांनी केले. अक्षय तृतीयेच्या शुभमुहूर्तवर धर्मवीर आनंद दिघे नागरी सहाय्यता कक्षाचे राज्य प्रमुख व शिवसेनेचे राज्य निवडणूक समन्वयक वैभव वाघ यांच्या पुढाकाराने धर्मवीर आनंद दिघे नागरी सहाय्यता कक्षाचे उद्घाटन सामंत यांच्या हस्ते झाले. सारसबागे जवळील शिवसेना भवनात आयोजित या कार्यक्रमावेळी




विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, शहरप्रमुख प्रमोद उर्फ नाना भानगिरे, सहसंपर्क प्रमुख अजय भोसले, रमेश कोंडे, सुधीर कुरूमकर, आबा बागुल यांच्यासह शिवसेनेचे पदाधिकारी व शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शिवसैनिकांचा गौरव करण्यात आला. तसेच ठाण्यातील टेम्भीनाक्यावरील देवीचे पूजन व शासकीय योजनांची दहीहंडी फोडण्यात आली.

उदय सामंत म्हणाले, "शासकीय योजनांचा लाभ तळागाळातील लोकांना मिळावा, यासाठी प्रत्येक शिवसैनिकाने पुढे यावे. सहायता कक्षाची चळवळ गावागावात पोहोचावी, यासाठी आपण प्रयत्न करायला हवेत. अशा उपक्रमांतून समाज तर घडतोच, पण तुमच्यातील नेतृत्वही विकसित होते. चांगले काम करणाऱ्या लोकांच्या पाठीशी शिवसेना नेहमीच उभी राहते. वैभव वाघ यांच्यासारख्या उमद्या तरुणाच्या पुढाकारातून पुण्यासह पश्चिम महाराष्ट्रात हा उपक्रम प्रभावीपणे राबविला जाईल, असा विश्वास आहे."

डॉ. नीलम गोऱ्हे म्हणाल्या, "शासनामार्फत विविध योजना, आरोग्यसुविधांसाठी सहायता निधी उपलब्ध असतो. मात्र, माहितीच्या अभावाने अशा योजना सामान्यांपर्यंत पोहोचत नाहीत. या योजना गरजूंपर्यंत पोहोचवण्यासाठी आज सुरु होत असलेल्या या धर्मवीर आनंद दिघे नागरी सहायता कक्षाची मोठी मदत होईल. अडचणीच्या काळात मदतीचा हात मागण्यासाठी येणाऱ्या लोकांना शिवसेना भवन हे दिघे साहेबांच्या आनंदाश्रमाप्रमाणे वाटावे, असे कार्य आपण सर्वांनी येथून करायला हवे."

प्रास्ताविकात वैभव वाघ यांनी सांगितले की, शासकीय योजनांचा अक्षय्य ठेवा जनसामान्यांपर्यंत पोहचवत, तसेच लोकहिताचे काम करत पुणे शहरातील शिवसेना भवनाला आनंद दिघे यांच्या विचारांचा ‘आनंदाश्रम’ बनवायचा आहे. मागेल त्याला मदत आणि प्रत्येकाच्या समस्यांचे निराकरण या दिघे साहेबांच्या संस्काराला अनुसरून अखंड काम सुरु राहील. गोरगरीब जनतेच्या हितासाठी हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आणि धर्मवीर आनंद दिघे यांच्या विचारांचा वारसा घेऊन एकनाथ शिंदे व सर्व सहकारी मोठ्या तळमळीने काम करीत असून, त्यांचे हे कार्य अधिकाधिक लोकांपर्यंत घेऊन जायचे आहे."

### महिला आरक्षण विधेयक नामंजूर होणे दुर्दैवी

माध्यमांशी बोलताना उदय सामंत म्हणाले, "कॅप्टन अशोक खरात याच्यावर कठोर कारवाई करण्याची मागणी एकनाथ शिंदे यांनी केली आहे. त्यामुळे विरोधकांच्या आरोपांकडे लक्ष देण्याची गरज नाही. अशा नीच प्रवृत्ती ठेचून काढण्याची शिवसेनेची भूमिका आहे. या प्रकरणाचा एसआयटी तपास सुरु असून, त्यातील सत्य लवकरच बाहेर येईल. दोषींना सोडले जाणार नाही. तपास यंत्रणेच्या कामात मला हस्तक्षेप व त्यावर भाष्य करता येणार नाही. खरातसोबत कोणाचे फोटो आले म्हणजे तेही तितकेच दोषी आहेत, असे मानने योग्य नाही. महिलांसाठी आणलेले विधेयक लोकसभेत नामंजूर होणे दुर्दैवी होते. हा दिवस खऱ्या अर्थाने काळा दिवस होता. देशातील महिलांना सन्मान व न्याय देण्यासाठी आणलेले हे विधेयक नाकारून विरोधकांनी महिलांचा अपमान केला आहे. त्यामुळे त्यांना महिलांसमोर जाऊन आता मते मागण्याचा अधिकार नाही. महाविकास आघाडी आणि काँग्रेस यांना महिलांना आरक्षण मिळू द्यायचे नाही, हेच यातून स्पष्ट झाले आहे. उबाठा गटाच्या माजी खासदारांनी या विधेयकाला पाठिंबा दिला असेल, तर त्यांचे अभिनंदन करायला हवे, असे उदय सामंत म्हणाले. असेल तर त्यांचा अभिनंदन केलच पाहिजे, असे उदय सामंत यांनी नमूद केले. विधानपरिषदेच्या संदर्भात निर्णय घेण्याचे सर्व अधिकार एकनाथ शिंदे यांना आहेत. १२ तारखेपूर्वी याबाबत निर्णय होईल. नवीन चेहरा द्यायचा की जुना चेहरा द्यायचा, याचे अधिकार शिंदे यांनाच आहेत. त्यामुळे योग्यवेळी निर्णय जाहीर केला जाईल, असेही त्यांनी सांगितले.



## जेजुरीत खंडोबा देवाला चंदन उटी

जेजुरी (दै. संध्या) :

उन्हाळ्याची दाहकता वाढल्याने प्रचंड उष्णता वाढली आहे. जेजुरीच्या खंडोबा मंदिरात देवाला थंडावा निर्माण व्हावा यासाठी जेजुरी येथील खंडोबा देवाच्या पुजारी वर्गाच्या वतीने देवाला चंदन उटीचा लेप लावण्यात आला. चंदनात शीतलता आहे. दरवर्षी उन्हाळ्यात खंडोबा देवाला चंदन उटी लावले जाते. रविवार दिनांक 19 रोजी पुजारी सेवक वर्गाच्या वतीने चंदन उटी तयार करून त्याचा लेप देवाला लावण्यात आला व फुलांची सजावट करण्यात आली. यावेळी पुजारी वर्ग, देवसंस्थान विश्वस्त मंडळ, नित्य वारकरी सेवेकरी व कर्मचारी वर्ग उपस्थित होते.

## अजिंक्य योद्धा बाजीराव पेशव्यांचे कर्तृत्व आजही प्रेरणादायी

पुणे (दै. संध्या) :

■ इतिहास अभ्यासक जगन्नाथ लडकत

अजिंक्य योद्धा बाजीराव पेशवे यांनी आपल्या केवळ ४० वर्षांच्या आयुष्यात ४० पेक्षा अधिक लढाया लढल्या. आणि आपल्या कारकिर्दीत एकही लढाई हरली नाही. छत्रपती शिवाजी महाराजांनी निर्माण केलेल्या स्वराज्याचे साम्राज्यामध्ये रूपांतर केले. परंतु दुर्दैवाने त्यांच्या वीरतेपेक्षा त्यांचे नाव केवळ ‘बाजीराव-मस्तानी’ यासाठीच घेतले जाते आणि याचे मनस्वी दुःख होते. हा केवळ त्यांचाच नव्हे, तर इतिहासाचाही अपमान आहे. बाजीराव पेशव्यांचे कर्तृत्व आजही तरुण पिढीसाठी प्रेरणादायी आहे, असे मत इतिहास अभ्यासक जगन्नाथ लडकत यांनी व्यक्त केले. योगी अरविंद सांस्कृतिक मंच आणि भारत विकास परिषद, दक्षिण पुणे शाखेतर्फे आयोजित व्याख्यानमालेचे प्रथम पुष्प गुंफताना जगन्नाथ लडकत यांनी ‘अजिंक्य योद्धा बाजीराव आणि पालखेडची लढाई ' या विषयावर उपस्थितांना मार्गदर्शन केले. यावेळी श्री योगी अरविंद सांस्कृतिक मंचाचे अध्यक्ष शिरीष सुमंत तसेच भारत विकास परिषदेचे पश्चिम प्रांत अध्यक्ष शशिकांत पदमवार, ॲड.चंद्रशेखर कुलकर्णी, प्रशांत गोऱ्हे, रमेश भागवत, कमांडर श्रीकांत देशमुख, विजय पानवलकर यांची प्रमुख



उपस्थिती होती. जगन्नाथ लडकत म्हणाले, बाजीराव पेशव्यांनी पुण्यात शनिवारवाड्याचे बांधकाम केले. या शनिवारवाड्यातूनच एकेकाळी संपूर्ण हिंदुस्तानचे सूत्र हलविण्यात येत होते. इतकी जरब आणि ताकद बाजीराव पेशव्यांच्या कर्तृत्वात होती. पालखेडची लढाई ही केवळ त्यांच्या नव्हे, तर हिंदुस्थानच्या इतिहासाला कलाटणी देणारी ठरली.

अजिंक्य योद्धा बाजीराव पेशव्यांचे कर्तृत्व विविध माध्यमांतून समाजासमोर आणण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत. विविध संस्थांनी व्याख्यानमाला आणि इतर उपक्रमांच्या माध्यमातून बाजीराव पेशव्यांचे कर्तृत्व समाजासमोर आणले पाहिजे. आज मात्र त्यांचे पूर्णाकृती पुतळे सर्वत्र उभे राहताना आनंद होत आहे.

## अनंतराव कणसे होमिओपॅथीक महाविद्यालयात कायदेविषयक शिबिर उत्साहात संपन्न

जुन्नर (दै. संध्या) :

महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, पुणे यांच्या वार्षिक कार्यक्रमपत्रिकेनुसार तालुका विधी सेवा समिती, जुन्नर यांच्या वतीने अनंतराव कणसे होमिओपॅथीक महाविद्यालय व रुग्णालय, आळे (जुन्नर) येथे कायदेविषयक शिबिर मोठ्या उत्साहात पार पडले.

मा. श्री. एस. बी. शेलार (जिल्हा न्यायाधीश-१ तथा अध्यक्ष, तालुका विधी सेवा समिती, जुन्नर) यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या शिबिराचे अध्यक्षस्थान मा. श्री. ए. एम. हुसेन (दिवाणी वरिष्ठ न्यायाधीश, जुन्नर) यांनी भूषविले. सकाळी ९.३० ते १०.३० या वेळेत शिबिराचे आयोजन करण्यात आले.

या शिबिराला जुन्नर तालुका वकील बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. हेमंत हाडवळे, उपाध्यक्ष ॲड. निलीमा शेरकर, ॲड. वैशाली




देवकर, ॲड. वर्षा टिंगरे, ॲड. कौशल पादीर, ॲड. आदेश घाटपांडे, ॲड. सौरव सोनवणे, तसेच तालुका विधी सेवा समितीचे समन्वयक प्रशांत मोरतळे उपस्थित होते. याशिवाय महाविद्यालयाचे चेअरमन डॉ. कमलेश घोलप, डॉ. राशी मोरडिया, प्राध्यापक, डॉक्टर, विद्यार्थी व विद्यार्थीनी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. शिबिरात मार्गदर्शन करताना मा. श्री. ए. एम. हुसेन यांनी महाविद्यालयांमध्ये होणाऱ्या रॅगिंगविरोधात कडक भूमिका मांडली. रॅगिंग हा दंडनीय गुन्हा असून अशा प्रकारांना आळा घालणे आवश्यक आहे, असे त्यांनी स्पष्ट केले. तसेच महिला सुरक्षिततेसाठी विशाखा समितीसारख्या समित्या स्थापन करण्याचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले. कायद्याचे पालन केल्यास समाजात सुरक्षितता व स्वातंत्र्य अबाधित राहते, असेही त्यांनी नमूद केले. यावेळी विविध कायद्यांबाबत जनजागृतीपर मार्गदर्शन करण्यात आले. पीसीपीएनडीटी कायद्याविषयी ॲड. वर्षा टिंगरे, पॉक्सो कायद्याविषयी ॲड. कौशल पादीर, समाजातील महिलांची सुरक्षितता व गोपनीयता या विषयावर ॲड. आदेश घाटपांडे, तसेच पीडित भरपाई योजना याबाबत ॲड. वैशाली देवकर यांनी सविस्तर माहिती दिली.

कार्यक्रमाची प्रस्तावना ॲड. हेमंत हाडवळे यांनी केली, तर सूत्रसंचालन डॉ. राशी मोरडिया यांनी केले. आभार प्रदर्शन तालुका विधी सेवा समितीचे समन्वयक प्रशांत मोरतळे यांनी केले. सदर कायदेविषयक शिबिर मोठ्या उत्साहात व यशस्वीरित्या पार पडले.

## अग्निसुरक्षा व आय ओ टी विषयावर श्री. विनोद कापसे यांचे प्रभावी मार्गदर्शन

नवी दिल्ली (दै. संध्या) :

फायर अँड सिक्युरिटी असोसिएशन ऑफ इंडिया (एफएसएआय) पुणे चॅप्टरच्या वतीने स्पार्क्ड सिरीज सत्र ३ अंतर्गत "भविष्यातील अति उंच इमारतींची अग्निसुरक्षा आणि आयओटीची (इंटरनेट ऑफ थिंग्ज) उभारणी या विषयावर यशस्वी प्रशिक्षण सत्राचे आयोजन सीओईपीचे भाऊ इन्स्टिट्यूट ऑफ इनोव्हेशन आंत्रप्रेन्योरशिप, सीओईपी, पुणे येथे करण्यात आले.

या सत्राचे मार्गदर्शन कापसे कन्सल्टंटचे मुख्य सल्लागार श्री विनोद कापसे यांनी प्रभावीपणे केले. यावेळी फायर अँड सिक्युरिटी असोसिएशन ऑफ इंडिया (एफएसएआय) पुणे चॅप्टरच्या अध्यक्षा श्रीमती सुजल शहा, श्रीमती सिंपल जैन (अध्यक्ष-निर्वाचित) श्री सागर मुनीश्वर (सचिव). श्री प्रसाद एन (प्रायोजक), श्री विनोद कापसे (कापसे कन्सल्टंटचे मुख्य सल्लागार), श्री बी. एस. कापसे (विभागीय अग्निशमन अधिकारी, एमआयडीसी हिंजवडी), श्री समीर शेख (पुणे अग्निशमन दल),. विनायक जोगळेकर. सरिता मोरे श्री उमेश संधानशिव (अग्निशमन अधिकारी, एमआयडीसी हिंजवडी), कार्यक्रमाचे संयोजक केदार देशमुख ,सभासद आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सुजल शहा यांनी सर्वांचे स्वागत केले व समाजामध्ये अग्नी सुरक्षा विषयी जागृती निर्माण करण्याचे कार्य संस्था करत असल्याचे सांगितले. भारतील सर्व केंद्रामध्ये पुणे केंद्राला प्रथम पुरस्कार मिळाल्याबद्दल सर्व सहकाऱ्यांचे आभार मानले.”

# दमदार नवीन कथानकासह हृदयविकाराच्या झटक्याबाबतचे सामान्य गैरसमज दूर करण्याचे ध्येय

नवी दिल्ली (दै. संध्या) :

■ ही मालिका ही गोष्ट अधोरेखित करते की हृदयविकाराचा झटका म्हणजे शेवट नव्हे तर तो जागरूकता, काळजी आणि वेळेवर उपाय करण्यासाठीचा इशारा आहे



मूळ प्राइम टाइममध्ये बाजारपेठेमध्ये अग्रगण्य असलेल्या झी टीव्हीने भारतीय टेलिव्हिजनवर अर्थपूर्ण आणि प्रगत विचारांची कथानके सादर करण्यामध्ये सातत्याने आघाडी घेतली आहे. गेल्या अनेक वर्षांत, या वाहिनीवरील व्यक्तिरेखा केवळ कथा सांगण्यापुरत्या मर्यादित न राहता स्वतःच्या जोरावर प्रभाव पाडणाऱ्या ठरल्या आहेत आणि प्रेक्षकांना मनापासून जोडून ठेवणाऱ्या कथांमधून दररोज दृष्टीकोन निर्माण करत आल्या आहेत. हीच बांधिलकी पुढे नेत झी टीव्ही वाहिनी आपली लोकप्रिय मालिका ‘तुम से तुम तक’च्या माध्यमातून हृदयविकाराच्या झटक्याभोवती असलेले अनेक गैरसमज हे एक खोल रुजलेले, पण अनेकदा दुर्लक्षित राहणारे वास्तव समोर आणत आहे. आगामी ट्रॅकमध्ये आर्यवर्धनला (शरद केळकर) हृदयविकाराचा झटका येतो आणि कथानकात मोठे वळण येते. अशा प्रसंगांचे चित्रण अनेकदा भीती आणि ‘सगळे संपले’ अशा भावनेने केले जाते, मात्र ही मालिका या परिस्थितीकडे दैनंदिन आयुष्यात लोक ज्या पद्धतीने पाहतात आणि बोलतात, त्याच्याशी मिळतीजुळती दृष्टी समोर ठेवते. ‘आता व्यक्तीला पूर्वीसारखे सामान्य आयुष्य जगता येणार नाही’ अशा समजुतींपासून ते ‘आयुष्य किती टिकेल?’ किंवा ‘शक्ती राहील का?’ या भीतीपर्यंत हृदयविकाराच्या झटक्याभोवती अनेक गैरसमज असतात आणि त्यामुळे विनाकारण भीती पसरते आणि त्याबद्दल तो एखादा कलंक असल्यासारखी भावना निर्माण होते.

या कथानकाद्वारे ‘तुम से तुम तक’ हृदयविकाराच्या झटक्याबाबत समाजात असलेल्या या समजांबद्दल प्रेक्षकांना पुन्हा विचार करायला आणि प्रश्न विचारायला प्रवृत्त करते. ही कथा एक साधा पण महत्त्वाचा संदेश ठामपणे देते की हृदयविकाराचा झटका म्हणजे शेवट नाही, तर इशारा आहे. योग्य जागरूकता, काळजी आणि जीवनशैलीत बदल केल्यास व्यक्ती पुन्हा आनंदी आणि सक्रिय आयुष्य जगू शकते. ही वाटचाल संवेदनशीलतेने दाखवत, झी टीव्ही प्रेक्षकांना भीतीवर आधारित विचारसरणीपासून दूर जाऊन अधिक माहितीपूर्ण आणि संतुलित दृष्टिकोन स्वीकारण्याचा संदेश देते.

या ट्रॅकमागचा विचार सांगताना झी टीव्हीचे चीफ चॅनेल ऑफिसर मंगेश कुलकर्णी म्हणाले, “झी टीव्हीमध्ये आम्ही हे मानतो की कथांमध्ये दैनंदिन विचारांवर प्रभाव टाकण्याची ताकद असते. आमच्या आयकॉनिक व्यक्तिरेखा सर्वांत मोठे इनफ्लूएन्सर्स आहेत, ज्यांच्यासोबत प्रेक्षक रोज संवाद साधतात, जोडले जातात, आणि त्यांचा प्रवास रोज जवळून पाहतात. ‘तुम से तुम तक’ मधील या ट्रॅकसह हृदयविकाराच्या झटक्यासोबत असलेल्या अनेक गैरसमजांबद्दल आम्हांला बोलायचे होते. अनेकदा याबाबत भीती आणि ‘सगळे संपले’ अशीच भावना असते; पण ते नेहमीच वास्तव नसते. या कथेमधून आम्हांला सांगायचे आहे की हृदयविकाराचा झटका हा एक ‘वेक-अप कॉल’ आहे—ही जीवनाला मर्यादा घालणारी किंवा आयुष्य ठरवणारी गोष्ट नसून, अधिक जागरूक होण्याची आणि आरोग्याची अधिक काळजी घेण्याची संधी आहे. आणि प्रेक्षकांना मनापासून आवडणाऱ्या आणि ते भावनिकरित्या ज्यांचा प्रवास सतत पाहतात आशा व्यक्तिरेखांच्या आयुष्यातून हा संदेश देण्यासाठी देणे हा आमच्यासाठी सर्वांत प्रभावी मार्ग आहे.”

याबाबत पुढे बोलताना ZEEL चे चीफ कंटेंट ऑफिसर राघवेंद्र हुंसूर म्हणाले, “झीमध्ये आम्ही नेहमीच मानत आलो आहोत की कथाकथन हे फक्त मनोरंजनापुरते मर्यादित नसन त्यातून मोठ्या प्रमाणावर चर्चा घडू शकतात आणि विचारसरणीवर प्रभाव पडू शकतो. ‘तुम से तुम तक’ मधील या ट्रॅकमागचा उद्देश हा हृदयविकाराच्या झटक्याबाबत लोकांमध्ये असलेली एक सर्वसाधारण धारणा समोर आणणे आणि अधिक माहितीपूर्ण व दिलासा देणाऱ्या दृष्टिकोनातून ती नव्याने मांडणे हा होता. अशा प्रसंगांसोबत अनेकदा लगेचच भीतीचे सावट असते; पण जागरूकता, वेळेवर पावले उचलणे आणि योग्य उपचार व काळजी यांमुळे मोठा फरक पडू शकतो हे समजून घेणे महत्त्वाचे आहे. अशा कथांमधून संतुलित संदेश देण्याचा आमचा उद्देश्य आहे, जिथे प्रेक्षक केवळ कथांमध्ये गुंतत नाहीत, तर त्यांच्या रोजच्या आयुष्यासाठीही काही अर्थपूर्ण गोष्टी शिकतात.” आर्यवर्धनची भूमिका साकारणारा शरद केळकर म्हणाला, “या ट्रॅकमधील सर्वात अर्थपूर्ण गोष्ट मला ही वाटली की तो आपल्या आयुष्यासोबत अतिशय सहजपणे जोडला जातो. लहानपणापासूनच हृदयविकाराच्या झटक्याबद्दल आपण अशा काही गोष्टी ऐकत आलो आहोत की त्यातून लगेच भीती निर्माण होते. ही दृश्ये चित्रीत करताना मला हे जाणवले की हे समजून घेणे किती महत्त्वाचे आहे. हा क्षण गंभीर आहे, पण तो शेवट नाही. मला आशा आहे की प्रेक्षक ह्या ट्रॅकसोबत जोडले जातील आणि आपल्या आरोग्याबाबत अधिक सकारात्मक आणि जागरूक बनतील.” अशा महत्त्वाच्या आणि समाजाशी संबंधित विषयांना समोर आणत झी टीव्ही ही फक्त मनोरंजनच नाही, तर अर्थपूर्ण चर्चा घडवणारी वाहिनी म्हणून आपली ओळख अधिक ठाम बनवत आहे. ‘तुम से तुम तक’च्या माध्यमातूनही वाहिनीने पुन्हा एकदा दाखवून दिले आहे की कथा सांगण्याची ताकद ही जुन्या ठाम समजांनाही आव्हान देऊ शकते आणि अधिक जागरूक, माहितीपूर्ण समाज घडवण्यास प्रेरणा देऊ शकते.

पहा ‘तुम से तुम तक’ दररोज रात्री 8.30 वाजता फक्त झी टीव्हीवर.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### महापालिकेच्या वतीने क्रांतीवीर दामोदर हरी चापेकर यांच्या स्मृतिदिनानिमित्त अभिवादन

पिंपरी (दैनिक संध्या) : थोर क्रांतिकारक तसेच हुतात्मांच्या कार्यातून देशभक्तीची प्रेरणा मिळत असते, चिंचवड गावातील चापेकर बंधु अशाच थोर हुतात्मांपैकी होते. क्रांतिवीर दामोदर हरी चापेकर आणि त्यांचे बंधू वासुदेव व बाळकृष्ण यांच्या बलिदानामुळे स्वातंत्र्यपूर्व काळात स्वातंत्र्यलढ्याला नवी दिशा मिळाली आणि देशभक्तीची ज्योत अधिक प्रखर झाली. भारतीय स्वातंत्र्य लढ्याच्या धगधगत्या इतिहासात चापेकर बंधूनी देशासाठी दिलेले योगदान देशवासियांना सतत प्रखर देशभक्तीची प्रेरणा देत राहील असे प्रतिपादन महापौर रवि लांडगे यांनी केले. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने क्रांतीवीर दामोदर हरी चापेकर यांच्या स्मृतिदिनानिमित्त चिंचवड येथील क्रांतीवीर चापेकर बंधुंच्या समूह शिल्पास महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले, त्यावेळी ते बोलत होते. या अभिवादन प्रसंगी उपमहापौर शर्मिला बाबर, विरोधी पक्षेनेते भाऊसाहेब भोईर, माजी महापौर अपर्णा डोके, नगरसदस्य सुरेश भोईर, अनंत कोन्हाळे यांच्यासह महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे, उप आयुक्त अण्णा बोदडे, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक आणि कर्मचारी उपस्थित होते.




### रोटरीच्या 'अभिप्राय 2026' या जिल्हास्तरीय वाद विवाद स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद

पिंपरी (दैनिक संध्या) : रोटरॅक्ट क्लब ऑफ पिंपरी व रोटरी क्लब ऑफ पिंपरी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या 'अभिप्राय 2026' या जिल्हास्तरीय वाद विवाद स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या स्पर्धेत 28 संघांनी सहभाग नोंदवला असून प्रत्येक संघात एक रोटेरियन व दोन रोटरॅक्टर्स सभासदांचा सहभाग होता . आयक्यू स्प्रिंट, पिक्चर परफेक्ट ॲनालिसिस व वादविवाद अशा तीन फेऱ्यांमधून स्पर्धा घेतली . 200 हून अधिक उपस्थितांच्या साक्षीने कार्यक्रम उत्साहात पार पडला. पुणे, पनवेल, खोपोली व रायगड येथून स्पर्धकांनी सहभाग घेतला. जिल्हा रोटरॅक्ट प्रतिनिधी रोटरॅक्टर द्विजेश नाशिक्कर, जिल्हा महासचिव रोटरॅक्टर अथर्व पाटील तसेच माजी जिल्हा रोटरॅक्ट प्रतिनिधी रोटरॅक्टर अक्षय मोरे आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे नेतृत्व इव्हेंट चेअरपर्सन शुभम राऊत यांनी केले. अध्यक्ष वंश चावला व सचिव स्वस्ती राय यांनी नियोजन केले. रोटरी क्लब ऑफ पिंपरी क्लबचे अध्यक्ष आनंद संपत व सचिव रोहन रोकडे यांचे मार्गदर्शन लाभले.नियोजित अध्यक्ष बाबा भापकर यांनी आभार मानले कार्यक्रमास फिनोव्हेटर्स सर्व्हिसेस . व सीएसजे व्हेंचर्स यांचे विशेष सहकार्य लाभले. एकूणच 'अभिप्राय 2026' हा कार्यक्रम ज्ञान, विश्लेषण व विचारमंथन यांचा प्रभावी संगम ठरून रोटरी-रोटरॅक्ट बंध अधिक दृढ करणारा ठरला.

### पिंपरीत थरारक घटना; प्रियकरासोबत आईकडून सहा वर्षीय मुलाची हत्या

पिंपरी (दैनिक संध्या) : प्रेमसंबंधात अडसर ठरणाऱ्या पोटच्या सहा वर्षीय मुलाला आईने तिच्या प्रियकरासोबत कट रचून ठार केले. या गुन्ह्यात आरोपी असलेला फरार प्रियकर राम विनायक कजेवाडी (रा. कुरुळी जि. बीड) याला दक्षिण महाळुंगे पोलिसांनी आंध प्रदेश आणि अंबाजोगाई येथे पाठलाग करून अटक केली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार आई आणि तिच्या प्रियकराने संगनमत करून शनिवारी (दि. 4) रात्री साडेअकराच्या सुमारास चाकण औद्योगिक वसाहतीतील कुरुळी (ता. खेड) येथे सहा वर्षांच्या बालकाची निर्घृण हत्या केली होती. मुलाचा खून केल्यानंतर त्याचा मृत्यू हृदयविकाराच्या धक्क्याने झाला असल्याचा बनाव करण्यात आला होता. आवेज मेहबूब शेख (वय 6) असे खून झालेल्या मुलाचे नाव आहे. या प्रकरणात इसाक शेख यांनी फिर्याद दिली होती. पोलिसांनी बसरिन मेहबूब शेख हिला अटक केली असून, तिचा प्रियकर राम विनायक कजेवाड याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्यानंतर तो फरार होता.

# अनधिकृत बांधकामांविरोधात महापालिकेची कारवाई सुरूच

**पिंपरी (दै. संध्या) :**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या ब, क, इ, ग, व फ क्षेत्रीय कार्यालयांतर्गत १५ ते १७ एप्रिल २०२६ रोजी अनधिकृत बांधकामे व अतिक्रमणांविरोधात धडक निष्कासन कारवाई करण्यात आली. या कारवाईत एकूण ४६ अनधिकृत बांधकामे व पत्राशेड निष्कासित करण्यात आले असून सुमारे ४५ हजार २८९ चौरस फूट क्षेत्रफळावरील अनधिकृत बांधकामे व अतिक्रमणे हटविण्यात आली. नागरिकांच्या सुरक्षेच्या तसेच शहराच्या नियोजनबद्ध विकासाच्या दृष्टीने ही कारवाई प्रभावीपणे राबविण्यात आली.

'ब' क्षेत्रीय कार्यालयामार्फत दि. १७ एप्रिल २०२६ रोजी प्रभाग क्र. १८ चिंचवड येथे एकूण ९ अनधिकृत पत्राशेड व बांधकामांवर निष्कासन कारवाई करण्यात आली. या कारवाईत सुमारे २१,७९८ चौरस फूट क्षेत्रफळावरील अतिक्रमण हटविण्यात आले.

'क' क्षेत्रीय कार्यालयामार्फत दि. १६ एप्रिल रोजी प्रभाग क्र. ६ भोसरी, सद्गुरूनगर परिसरात ३ अनधिकृत पत्राशेड (१६२ चौरस फूट) तसेच प्रभाग क्र. २ पुणे-नाशिक महामार्ग, बोऱ्हाडेवाडी परिसरात ४ पत्राशेड (१,५५० चौरस फूट) यावर निष्कासन कारवाई करण्यात आली. तसेच दि. १७ एप्रिल रोजी प्रभाग क्र. ६ भोसरी, सद्गुरूनगर परिसरातील ३ अनधिकृत आरसीसी बांधकामांवर कारवाई करून सुमारे २,०९९ चौरस फूट क्षेत्रफळ मोकळे करण्यात आले.

'ई' क्षेत्रीय कार्यालयांतर्गत दि. १७ एप्रिल रोजी प्रभाग क्र. ०३ मौजे मोशी/डूडूळगाव येथे धडक कारवाई पथकाद्वारे १ अनधिकृत पत्राशेड बांधकामावर कारवाई करण्यात आली. या कारवाईत अंदाजे ६५० चौरस फूट क्षेत्रफळावरील अतिक्रमण हटविण्यात आले.



'फ' क्षेत्रीय कार्यालयामार्फत दि. १६ एप्रिल रोजी चिखली येथील प्राईम पार्क, शेलार वस्ती परिसरात नियमबाह्य व्यावसायिक बांधकामे व अतिक्रमणांविरोधात कारवाई करण्यात आली. या कारवाईत सुमारे ३,६६० चौरस फूट क्षेत्रफळावरील ८ अनधिकृत बांधकामे निष्कासित करण्यात आली. 'ग' क्षेत्रीय कार्यालयामार्फत दि. १५ एप्रिल रोजी प्रभाग क्र. २७ मधील सिंहगड कॉलनी, सज्जनगड कॉलनी, ज्ञानदीप कॉलनी, न्यू डी.पी. रस्ता, शिवालय कॉलनी, रहाटणी येथे सुमारे ४,११२ चौरस फूट क्षेत्रफळावरील ७ अनधिकृत पत्राशेड व बांधकामांवर तसेच नाल्यावरील अतिक्रमणांवर कारवाई करण्यात आली. त्यानंतर दि. १६ एप्रिल रोजी प्रभाग क्र. २४ व २७ मधील विविध ठिकाणी करण्यात आलेल्या कारवाईत सुमारे ५,४११ चौरस फूट क्षेत्रफळावरील ४ अतिक्रमणे हटविण्यात आली. तसेच दि. १७ एप्रिल रोजी प्रभाग क्र. २३ व २१ मधील विविध ठिकाणी करण्यात आलेल्या कारवाईत सुमारे ५,८४६ चौरस फूट क्षेत्रफळावरील ७ अनधिकृत बांधकामे व पत्राशेड निष्कासित करण्यात आली.

आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या आदेशान्वये तसेच अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई पार पडली. तर क्षेत्रीय अधिकारी राजाराम सरगर, अजिंक्य येळे, तानाजी नरळे, अतुल पाटील, किशोर ननवरे यांच्या अधिपत्याखाली उपअभियंते, धडक कारवाई पथक, बीट निरीक्षक, एम. एस. एफ जवान, पोलीस कर्मचारी, महापालिका मजूर, ठेकेदार यांच्या सहाय्याने ही कारवाई करण्यात आली. तसेच अतिक्रमण हटविण्यासाठी जेसीबी ब्रेकर, ट्रॅक्टर ब्रेकर आदी उपकरणांचा वापर करण्यात आला.

दरम्यान, महापालिकेकडून अशा प्रकारच्या अतिक्रमणांविरोधातील कारवाई सातत्याने सुरू राहणार असून अनधिकृत बांधकाम करणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचा इशारा प्रशासनाकडून देण्यात आला आहे.

## पिंपरी-चिंचवडमध्ये आरएमसी प्लांटचा कहर

### सिमेंटच्या धुळीमुळे नागरिकांच्या आरोग्याला धोका

**पिंपरी (दै. संध्या) :**

पिंपरी-चिंचवड शहरातील मोकळ्या जागा, शेतजमिनी, जुनी बैठी घरे व इमारती तोडून टोलेजंग इमारती उभ्या राहत आहेत. त्यासाठी शहरात भर लोकवस्तीत रेडिमिक्स कॉंक्रीट (आरएमसी) प्लान्ट उभे राहत आहेत. त्यामुळे आजूबाजूच्या रहिवाशांना सिमेंटच्या धुळीचा तसेच, अवजड वाहनांचा मोठा त्रास होत आहे. परिसरातील हवेत प्रदूषण वाढत आहे. परिणामी, नागरिकांचा आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

**सिमेंटमिश्रित धूळ आरोग्यास घातक**

आरएमसी प्लांटमधून निघणारी सिमेंटची सूक्ष्म धूळ फुफ्फुसासाठी अत्यंत घातक आहे. यामुळे दमा, त्वचेचे व श्वसनाचे आजार वाढत आहेत. विशेषत वृद्ध व बालकांना त्याचा अधिक त्रास होत आहे. ती धूळ थेट घरात पसरते. त्यामुळे घरात धूळीचा थर साचत आहे. तसेच, रस्त्यावर व झाडांवर धुळीचे थर निर्माण होत आहेत. परिणामी, प्लांटच्या आजूबाजूला राहत असलेल्या नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे.

पिंपरी-चिंचवड शहरात राहण्यास मोठी पसंती दिली जात आहे. त्यामुळे मोकळी जागा दिसेल, तेथे उंचच उंच इमारती उभ्या केल्या जात आहेत. औद्योगिक कंपन्या व उद्योग बंद करून तेथे गृहप्रकल्प निर्माण होत आहे. जुनी बैठी घरे, चाळी व जुन्या इमारती पाडून नवनवे गृहप्रकल्प तयार केले जात आहेत. त्या बांधकामासाठी आरएसमी प्लान्ट भर लोकवस्तीजवळ उभे केले जात आहेत. तेथून बांधकाम प्रकल्पापर्यंत तयार कॉंक्रीट पुरवठा केला जातो. मात्र, कॉंक्रीट तयार करताना वाळू, खड्डी, सिमेंट व पाणी मिक्स केले जाते. त्यामुळे प्लान्टमधून मोठ्या प्रमाणात सिमेंट मिश्रित धूळ हवेत परसरत असून परिसरातील हवेत प्रदूषण वाढत आहे.

सतत अजवड वाहनांची ये-जा होत असल्याने पक्के रस्ते खराब होतात. वाहनांमुळे मोठ्या प्रमाणात धूळ उडते. प्लांट व वाहनांच्या वर्दळीमुळे आजूबाजूच्या रहिवाशांसह वाहनचालकांना श्वसनाचे त्रास होत आहेत. त्याबाबत रहिवाशांकडून प्रदूषण मंडळ व महापालिका प्रशासनाकडे मोठ्या संख्येने तक्रारी करण्यात आल्या आहेत. आंदोलनेही झाली आहेत. काही तक्रारींची दखल घेऊन महापालिकेच्या पर्यावरण विभागाकडून कारवाई केली आहे. मात्र, काही दिवसांनंतर ते प्लांट पुन्हा सुरू होतात.

## आकुर्डीतील संत ज्ञानेश्वर चौकात सिग्नल बंद; वाहतूक कोंडीने नागरिक हैराण

**आकुर्डी (दै. संध्या) :**

पिंपरी-चिंचवड महापालिका अ प्रभाग कार्यालयाजवळील संत ज्ञानेश्वर चौकामध्ये स्वयंचलित वाहतूक नियंत्रण करणारी सिग्नल यंत्रणा बंद पडल्यामुळे वाहतूक कोंडीबरोबरच वाहनचालकांना विस्कळीत वाहतुकीचा सामना करावा लागत आहे.

संत ज्ञानेश्वर चौकातील स्वयंचलित सिग्नल यंत्रणा बंद असल्यामुळे यावरती कोणतीही पर्याय व्यवस्था वाहतूक नियंत्रण अधिकारी यांनी केली नसल्यामुळे या चौकात विस्कळीत व वाहतूक कोंडीबरोबरच वाहनचालकांना जीव मुठीत धरून चौक पार करावा लागत आहे. संत ज्ञानेश्वर चौकातील सिग्नल व्यवस्था सातत्याने बंद पडत असल्याने स्थानिकांमध्ये वाहतूक नियंत्रण अधिकारी यांच्याविषयी संतापाची भावना निर्माण झाली आहे. संत ज्ञानेश्वर चौक हा आकुर्डी, निगडी, चिंचवड या भागांना जोडणारा मध्यवर्ती ठिकाण आहे. या चौकात दिवसभर सातत्याने चारही बाजूने वाहनांची वर्दळ असते. जवळच अ क्षेत्रीय कार्यालय, लोकमान्य हॉस्पिटल, भक्ती-शक्तीकडे जाणारा रस्ता, तसेच म्हाळसाकांत विद्यालय, सीएमएस विद्यालय, सरस्वती विद्यालय, गुरुगणेश विद्यालय असे अनेक शाळा, महाविद्यालये असून, या चौकातून परिसरातील शालेय विद्यार्थ्यांची व पालकांची ये-जा सुरू असते.

सायंकाळी विविध कंपन्यांच्या बसेस कर्मचाऱ्यांना सोडण्यासाठी या चौकातून जाताना दिसतात. त्याचबरोबर खासगी वाहने, बस, रिक्षा दुचाकी यांची वर्दळ असते. या चौकातील वाहतूक सिग्नल व्यवस्था पूर्णपणे बंद असल्याने मोठ्या प्रमाणात वाहतूककोंडी होऊन छोटे-मोठे अपघात या ठिकाणी घडतात. स्वयंचलित वाहतूक यंत्रणा बंद पडल्यानंतर महापालिका प्रशासन व वाहतूक विभागाकडून वाहनचालकांची कुठलीही दक्षता घेतली जात नाही. त्यामुळे बेशिस्त वाहनचालकांना संधी मिळत आहे.

या विस्कळीत वाहतूक व्यवस्थेमुळे वाहनांची कोंडी झाली होती. मात्र, याच परिस्थितीमुळे एखादी दुर्घटना घडू शकते. यासाठी वेळीच उपाययोजना करून वाहतूक विभाग व महापालिका प्रशासनाने कार्यवाही करून स्वयंचलित वाहतूक यंत्रणा सुरळीत करावी, अशी मागणी वाहनचालकांकडून होत आहे.

## 'समग्र महात्मा फुले' परिसंवादातून घेण्यात आला सामाजिक परिवर्तनाचा वैचारिक मागोवा

**पिंपरी (दै. संध्या) :**

क्रांतीसूर्य महात्मा जोतीराव फुले आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक समतेच्या विचारांचा सखोल वेध घेत शिक्षण, स्त्री-पुरुष समानता, जातीभेद निर्मूलन आणि वैज्ञानिक दृष्टिकोन या मूल्यांवर आधारित समाजरचनेची आवश्यकता अधोरेखित करताना, या महापुरूषांच्या विचारांची आजच्या काळातील उपयुक्तता 'समग्र महात्मा फुले' या परिसंवादातून स्पष्ट करण्यात आली. तसेच त्यांचे साहित्य, कार्य आणि चळवळींमधून उभ्या राहिलेल्या मानवतावादी दृष्टिकोनाचा स्वीकार करून सामाजिक न्यायाची वाट अधिक बळकट करण्याचा संदेश परिसंवादातून देण्यात आला.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने क्रांतिसूर्य महात्मा जोतीराव फुले यांच्या द्विशताब्दी जयंती वर्षानिमित्त तसेच भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त आयोजित सामाजिक समता सप्ताह व 'विचार प्रबोधन पर्व २०२६' मध्ये समारोपीय कार्यक्रमात 'समग्र महात्मा फुले' या विषयावरील परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. या परिसंवादामध्ये विविध मान्यवर वक्त्यांनी महात्मा फुले यांच्या कार्याचा, साहित्याचा आणि त्यांच्या सामाजिक विचारांचा सखोल आढावा घेत समाजपरिवर्तनातील त्यांच्या योगदानाचे महत्त्व अधोरेखित केले.

या परिसंवादात साहित्यिक प्रभाकर ओव्हाळ, ज्येष्ठ पत्रकार अरूण खोरे, माजी आमदार ॲड. जयदेव गायकवाड, फर्ग्युसन महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. डॉ. प्रकाश पवार सहभागी झाले होते. यावेळी उप आयुक्त अण्णा बोदडे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, ज्येष्ठ वैद्यकीय अधिकारी डॉ संध्या हरिभक्त, डॉ सुजाता नांगरे, ग्रंथपाल प्रवीण




चाबुकस्वार, राजू मोहन, कामगार नेते निवृत्ती आरवडे, तुकाराम गायकवाड, गणेश भोसले यांच्यासह सामाजिक कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

साहित्यिक प्रभाकर ओव्हाळ यांनी महापुरुषांनी संत साहित्य आत्मसात करून समाजपरिवर्तनासाठी कसे प्रयत्न केले, यावर प्रकाश टाकला. महात्मा फुले हे त्यापैकी एक प्रभावी व्यक्तिमत्त्व असून त्यांनी आपल्या साहित्याच्या माध्यमातून समाजप्रबोधन घडवले, असे त्यांनी नमूद केले. मराठी भाषेच्या जतनात फुले यांच्या साहित्याचा मोठा वाटा असल्याचे सांगत त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पोवाड्यांमधून प्रेरणा घेतल्याचेही स्पष्ट केले. फुले यांच्या लिखाणातूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी त्यांना 'तिसरे गुरू' का मानले, याची जाणीव होते, असे ते म्हणाले. आजच्या पिढीने त्यांच्या साहित्याचे वाचन करून त्यातील विचार आत्मसात करणे आवश्यक असल्याचे त्यांनी ठामपणे सांगितले.

फर्ग्युसन महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. डॉ. प्रकाश पवार यांनी महात्मा फुले यांच्या विचारांचे व्यापक आणि वैश्विक स्वरूप स्पष्ट केले. 'गुलामगिरी' या ग्रंथाने भारतीय समाजातील क्रांतीचे बीज रोवले, असे सांगत त्यांनी फुले यांच्या कार्याचा इतिहास अधिक व्यापकपणे मांडण्याची गरज व्यक्त केली. सत्यशोधक समाजाच्या स्थापनेमुळे समाजात जागृतीची चळवळ निर्माण झाली आणि सामाजिक क्रांतीची ज्योत पेटली, असे ते म्हणाले. फुले यांची भाषाशैली प्रभावी आणि विचारप्रवर्तक असून त्यांनी 'विज्ञानाची कास धरा' असा दिलेला संदेश आजही तितकाच महत्त्वाचा असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच, त्यांच्या कार्याचे लाभधारक मोठ्या प्रमाणावर स्त्रिया असूनही आज अनेक ठिकाणी सावित्रीबाई फुले यांच्या कार्याचा विसर पडल्याचे मत त्यांनी व्यक्त केले.

एकूणच या परिसंवादातून महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा परस्पर संबंध, त्यांची सामाजिक समतेसाठीची लढाई आणि आजच्या काळातील त्यांची उपयुक्तता यावर सखोल चर्चा झाली.

# शहरातील नागरिकांना क्रीडा सुविधा अधिक आधुनिक व दर्जेदार देण्यासाठी प्रयत्नशील - महापौर लांडगे

**पिंपरी (दै. संध्या) :**

पिंपरी चिंचवड शहरातील नागरिकांसाठी जास्तीत जास्त क्रीडा सुविधा देण्याचा त्याचबरोबर क्रीडा साधने आधुनिक व दर्जेदार करण्याचा आमचा सातत्यपूर्ण प्रयत्न आहे,मोहननगर येथील जलतरण तलावाचे नूतनीकरण हे त्याच दिशेने उचललेले महत्त्वाचे पाऊल असून, यामुळे नागरिकांना आणि खेळाडूंना उत्कृष्ट सुविधा उपलब्ध होतील, असे प्रतिपादन महापौर रवि लांडगे यांनी केले.

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या मोहननगर येथील श्री छत्रपती राजर्षी शाहू महाराज जलतरण तलावाचे नूतनीकरण नुकतेच करण्यात आले,या कामाचा लोकार्पण सोहळा महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते उत्साहात पार पडला,त्यावेळी ते बोलत होते.

या प्रसंगी विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, आमदार उमा खापरे,शंकर जगताप यांच्यासह उपमहापौर शर्मिला बाबर, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर तसेच कला, क्रीडा, साहित्य व सांस्कृतिक समिती सभापती कैलास कुटे, नगरसदस्य प्रमोद कुटे, धर्मपाल तंतरपाळे,नगरसदस्या वैशाली काळभोर, अरुणा लंगोटे यांच्यासह उपायुक्त पंकज पाटील, अण्णा बोदडे, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक आणि सामाजिक क्षेत्रातील कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते. महापौर रवि लांडगे म्हणाले, पिंपरी चिंचवड शहरात क्रीडा सुविधा अधिक सक्षम आणि जागतिक दर्जाच्या करण्यासाठी महानगरपालिका प्रयत्नशील आहे. मोहननगर येथील



जलतरण तलावाचे नूतनीकरण हे केवळ दुरुस्तीचे काम नसून, खेळाडूंना अत्याधुनिक सुविधा देण्याच्या व्यापक धोरणाचा भाग आहे. या सुधारित सुविधांमुळे स्थानिक खेळाडूंना दर्जेदार सरावाची संधी मिळेल, स्पर्धात्मक क्षमताही वाढेल आणि भविष्यात राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर शहराचे प्रतिनिधित्व करणारे खेळाडू घडण्यास मदत होईल.

महानगरपालिकेकडून क्रीडा क्षेत्रासाठी उभारण्यात येणाऱ्या अशा सुविधा या केवळ पायाभूत कामे नसून, त्या शहराच्या उज्ज्वल क्रीडा भविष्यासाठीची गुंतवणूक आहेत. मोहननगर जलतरण तलावाचे नूतनीकरण ही त्याचीच प्रचिती असून, या सुविधांचा जास्तीत जास्त उपयोग करून स्थानिक खेळाडूंनी आपली गुणवत्ता सिद्ध करावी असे विधानसभेचे उपाध्यक्ष अण्णा बनसोडे म्हणाले.

आमदार उमा खापरे म्हणाल्या, शहरात दर्जेदार क्रीडा सुविधा निर्माण करणे ही काळाची गरज आहे. मोहननगर जलतरण तलावाच्या नूतनीकरणामुळे नागरिकांना आणि विशेषतः महिलांना सुरक्षित व आधुनिक वातावरणात सराव करण्याची संधी मिळणार आहे. या सुविधांचा लाभ शहरातील जास्तीत जास्त नागरिकांनी घ्यावा. आमदार शंकर जगताप यांनीही या विकासकामासाठी शुभेच्छा दिल्या तसेच मोहननगर येथील जलतरण तलावाचे नूतनीकरण हे शहराच्या विकासातील महत्त्वाचे पाऊल आहे. अशा प्रकारच्या सुविधा उभारल्यामुळे स्थानिक पातळीवर खेळाडूंना देखील चालना मिळते आणि खेळाडूंना आवश्यक असलेले दर्जेदार व्यासपीठ उपलब्ध होते. भविष्यातही अशा विकासकामांना प्राधान्य देऊन शहरातील क्रीडा संस्कृती अधिक बळकट करणे गरजेचे असल्याचे नमूद केले.

महापालिकेतील सत्ताधारी पक्षाने शहराच्या विकासासाठी केलेल्या चांगल्या कामाचे आम्ही विरोधी पक्षात असून देखील स्वागत करतो तथापि नागरिकांच्या हिताच्या दृष्टीने सुविधा उभारताना त्यांची गुणवत्ता, देखभाल व उपयुक्तता याबाबत आम्ही जागरूकही असतो असे मत विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर यांनी व्यक्त केले आणि जलतरण तलावाच्या नूतनीकरणाचे योग्य पध्दतीने केले असल्याने त्याबद्दल समाधानही व्यक्त केले.

छत्रपती राजर्षी शाहू महाराज जलतरण तलावाच्या नूतनीकरणाचे काम २० जून २०२४ पासून सुरू झाले होते त्यामध्ये जलतरण तलावाची खोली कमी करणे, तलाव आच्छादित करणे, वॉटरप्रूफिंग, नवीन फ्लोरिंग, नागरिकांसाठी बसण्याची व्यवस्था, स्वच्छतागृहाचे नूतनीकरण, अंतर्गत सुशोभीकरण, विद्युत विषयक कामे, आधुनिक फिल्टरेशन प्लँट बसविणे, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था तसेच रंगरंगोटी अशी विविध कामे करण्यात आली आहेत,यासाठी सुमारे र.रू.३ कोटी ९१ लाख इतका खर्च आलेला आहे. या सर्व कामांमुळे जलतरण तलाव अधिक सुरक्षित, स्वच्छ आणि आकर्षक बनला असून, नागरिकांना आणि खेळाडूंना उच्च दर्जाच्या सुविधा उपलब्ध होणार आहेत, अशी माहिती उप आयुक्त पंकज पाटील यांनी यावेळी दिली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक पंकज पाटील यांनी सूत्रसंचालन प्रफुल्ल पुराणिक यांनी केले तर आभार वैशाली काळभोर यांनी मानले.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### चिंबळी सोसायटीचे सभासदांना 1 कोटी 61 लाख 97 हजार 750 रुपयांचे कर्ज वाटप

आळंदी (दैनिक संध्या) : चिंबळी (ता.खेड) येथील विविध कार्यकारी सहकारी सोसायटीने २३० सभासद शेतकऱ्यांना पहिल्या टप्प्यातील रुपये १ कोटी ६१ लाख ९७ हजार ७५० रुपयांचे कर्ज वाटप केले असल्याची माहिती चेअरमन पंडित कड यांनी दिली आहे.बाजार समितीचे माजी सभापती व सोसायटीचे संचालक विलास कातोरे यांच्या मार्गदर्शनाखाली सोसायटीचे उपाध्यक्ष प्रवीण चव्हाण, संचालक, माजी सरपंच अर्जुन अवघडे, माजी ग्रामपंचायत सदस्य आप्पासाहेब बटवाल, माजी अध्यक्ष जीवन जैद, सत्यवान जैद, कुंडलिक बनकर, मारुती पाटारे, ज्ञानेश्वर जैद, अमृता जाधव, सुमन बनकर, सोसायटीचे संचालक हिरामण बहिरट, सचिन जाधव, दीपक बटवाल, खंडेराव होळकर, सचिव निलेश देशमुख यांच्या उपस्थितीत शेतकऱ्यांना पहिल्या टप्प्यातील कर्ज वाटप करण्यात आले.

### पुणे जिल्हा परिषद अर्थसमिती सदस्यपदी नेहाताई पाटे यांची निवड

नारायणगाव (दैनिक संध्या) : नुकत्याच झालेल्या जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत सौ. नेहाताई योगेश उर्फ बाबू भाऊ पाटे यांची जिल्हा परिषद सदस्या म्हणून नियुक्ती झाली होती. त्यानंतर त्यांची पुणे जिल्हा परिषद अर्थ समिती सदस्यपदी निवड करण्यात आली आहे. नक्कीच ही निवड अत्यंत योग्य असून जुन्नर तालुक्यातील जनतेला न्याय देणारी ठरेल. अर्थ समितीच्या माध्यमातून तालुक्यात मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून गती मिळेल. त्यामुळे जुन्नर तालुक्याच्या सर्वांगीण विकासाला निश्चितच नवी चालना मिळेल.त्यामुळे नेहाताई पाटे यांचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.



### इंदापूरमध्ये 35 लाखांचा गुटखा जप्त; पोलिसांची मोठी कारवाई

इंदापूर (दैनिक संध्या) : इंदापूर पोलिस आणि स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेने कारवाई करीत 35 लाख 51 हजार 416 रुपये किमतीचा विक्रीस बंदी असलेला गुटखा पकडला आहे. गलांडवाडी नंबर 1 गावच्या हद्दीत एका बंद टाटा गॅरेजमधून कारवाई करत पोलिसांनी हा गुटखा जप्त केला आहे. याप्रकरणी पोलिस हवालदार अभिजित दत्तात्रय एकशिंगे यांनी फिर्याद दाखल केली. त्यानुसार इंदापूर शहरातील व्यंकटेशनगर येथील शकील इमायतुला काझी याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस निरीक्षक विलास नाळे यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. पोलिस निरीक्षक नाळे यांच्या माहितीनुसार, पुणे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर गलांडवाडी 1 गावच्या हद्दीत आरोपीच्या मालकीच्या बंद गॅरेजच्या गोडाऊनमध्ये सुगंधी सुपारी गुटखा ठेवल्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा आणि इंदापूर पोलिसांनी मिळून एकत्रित कारवाई केली. या ठिकाणी गोडाऊन मधून तब्बल 35 लाख 51 हजार 416 रुपये किमतीचा गुटखा मिळून आला. याप्रकरणी पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक दत्तात्रय लेंडवे करीत आहेत. छापा टाकला ते बंद गॅरेज भाडे तत्त्वावर अन्य व्यक्तीस दिले होते. त्यामुळे या ठिकाणी काही अवैध गुटखा सद्दशसाठा सापडला असला तरी त्याचा मूळ मालक कोण? हा प्रश्न अनुत्तरीत आहे. त्यामुळे भाडेकरू किंवा त्याचे साथीदार अवैध धंदे करत होते का, या बाजूनेही तपास होणे गरजेचे आहे. या कारवाईत पोलिसांकडून गॅरेज मालकालाच आरोपी केले आहे. त्यामुळे मुख्य आरोपींना अभय दिले जात आहे का? असा संशय व्यक्त करत चोर सोडून संन्याशाला फाशी दिल्याच्या चर्चेने जोर धरला आहे.

### नारायणगाव बाह्यवळणावर ट्रकची धडक; 7 मेंढ्या ठार, शेतकऱ्याचे मोठे नुकसान

नारायणगाव (दैनिक संध्या) : पुणे–नाशिक महामार्गावरील बाह्यवळण रस्त्यावर ट्रकच्या धडकेत सात मेंढ्या व काही कोकरे ठार झाल्याची दुर्दैवी घटना शुक्रवारी सायंकाळी घडली. या अपघातात दोन शेळ्या गंभीर जखमी झाल्या असून मेंढपाळ तुकाराम निंबारकर यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, निंबारकर यांची शेती बाह्यवळण रस्त्याच्या पश्चिम बाजूस असून सध्या त्यांच्या शेतात कांदा काढणीचे काम सुरू आहे. कांदा काढणीनंतर उरलेल्या कांद्याच्या पातीवर चरण्यासाठी ते दुपारी मेंढ्या व शेळ्या घेऊन शेतात गेले होते. सायंकाळी साडेसात ते पावणेआठच्या सुमारास परतत असताना भटक्या कुत्र्यांनी अचानक हल्ला केल्याने मेंढ्या व शेळ्या घाबरून रस्त्याकडे पळाल्या. दरम्यान, आळेफाटा बाजूकडून भरधाव वेगाने येणाऱ्या ट्रक चालकाला अंधारामुळे कळपाचा अंदाज आला नाही आणि ट्रकची जोरदार धडक बसली. या धडकेत सात मेंढ्या व काही कोकरे जागीच ठार झाली, यामुळे तुकाराम निंबाळकर यांना मोठा आर्थिक फटका बसला आहे. पोलिसांनी ट्रक चालकावर गुन्हा दाखल करावा अशी मागणी या शेतकऱ्याची आहे. एवढे मोठे नुकसान झाल्यामुळे तुकाराम निंबारकर यांना मानसिक धक्का बसला आहे. या रस्त्यावर असलेले पथदिवे बंद असल्याचे समोर आले आहे. विशेष म्हणजे या बाह्यवळण रस्त्यावरील पथदिवे बंद असल्याबाबत आठ दिवसांपूर्वीच बाजार समितीचे माजी संचालक विपुल फुलसुंदर यांनी दुरुस्तीची मागणी केली होती. मात्र, संबंधित अधिकाऱ्यांनी याकडे दुर्लक्ष केल्याने हा अपघात घडल्याची खंत स्थानिकांनी व्यक्त केली आहे. वेळीच पथदिवे सुरू केले असते तर ही दुर्घटना टळली असती, अशी भावना निंबारकर यांनी व्यक्त केली असून प्रशासनाने तातडीने याकडे लक्ष देण्याची मागणी होत आहे.





# चाकण बाजारात कांदा, बटाटा, कैरी व लसणाची विक्रमी आवक

चाकण (दै. संध्या)

खेड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या चाकण येथील महात्मा फुले मार्केटयार्ड मध्ये कांदा, बटाटा, कैरी, लसूण व हिरव्या मिरचीची विक्रमी आवक झाली. फळभाज्यांसह पालेभाज्यांची भरपूर आवक होऊनही भाव कडाडले. एकूण उलाढाल ५ कोटी ९५ लाख रुपये झाली.

चाकण येथील बाजारात कांद्याची एकूण आवक ९ हजार क्विंटल झाली. कांद्याला कमाल भाव ५०० ते १,२०० रुपये मिळाला. बटाट्याची एकूण आवक १,५०० क्विंटल झाली. बटाट्याचा कमाल भाव १,३०० रुपयांवर स्थिरावला. लसणाची व कैरीची एकूण आवक ३५ क्विंटल झाली. त्यांना १० हजार रुपये कमाल भाव मिळाला.

हिरव्या मिरचीची एकूण आवक ३७० क्विंटल झाली. हिरव्या मिरचीला ३ हजार रुपयांपासून ४ हजार रुपयांपर्यंत भाव मिळाला.



शेतीमालाची आवक व बाजारभाव पुढीलप्रमाणे - कांदा - एकूण आवक - ९,००० क्विंटल. भाव क्रमांक - १.१,२०० रुपये, भाव क्रमांक २.८०० रुपये, भाव क्रमांक ३. ५००., बटाटा - एकूण आवक - १,५०० क्विंटल. भाव क्रमांक १.१,३०० रुपये, भाव क्रमांक २.८०० रुपये, भाव क्रमांक ३.५०० रुपये.

फळभाज्या - फळभाज्यांच्या बाजारात एकूण आवक क्विंटलमध्ये व प्रतीदहा किलोंसाठी मालाला मिळालेले भाव कंसात पुढील प्रमाणे - टोमॅटो - २९३ क्विंटल (१,००० ते १,६०० रू.), कोबी - १९५ क्विंटल (४०० ते ६०० रू.), फ्लॉवर - २२५ क्विंटल (६०० ते ८०० रु.), वांगी - ८२ क्विंटल (१,००० ते १,५०० रु.), भेंडी - ८४ क्विंटल (१,००० ते २,५०० रु.), दोडका - ५२ क्विंटल (२,००० ते ४,००० रु.), कारली - ५६ क्विंटल ( २,००० ते ३,००० रु.), दुधीभोपळा - ४२ क्विंटल (१,००० ते २,००० रु.), काकडी - ११५ क्विंटल (१,००० ते २,००० रु.), फरशी - २७ क्विंटल (४,००० ते ५,००० रु.), वालवड - ४२ क्विंटल (३,००० ते ५,००० रुपये), ढोबळी मिरची - १५२ क्विंटल (३,००० ते ४,००० रु.), चवळी - ३४ क्विंटल (१,५०० ते २,५०० रु.), वाटाणा - २१ क्विंटल (७,००० ते ९,००० रू.), शेवगा - ३८ क्विंटल (१,५०० ते ३,००० रु.), गाजर - १०८ क्विंटल (१,००० ते १,५०० रु.), गवार - ४२ क्विंटल (२,००० ते ३,५०० रु. ), आले - १५५ क्विंटल ( ३,००० ते ४,००० रु. ), ओली भुईमूग शेंग - ७० पोती (४,००० ते ५,००० रूपये,.

## रुग्णांना लाखोंचा आर्थिक फटका माहिती सेवा समितीचा आंदोलनाचा इशारा

कोरेगावमुळ (दै. संध्या)

वाघोली येथे काही खासगी रुग्णालये व मेडीक्लेम कंपन्यांच्या मनमानी कारभारामुळे सर्वसामान्य रुग्णांना मोठ्या प्रमाणात आर्थिक फटका बसत असल्याचे गंभीर चित्र समोर येत आहे. रुग्णालयांमध्ये रुग्ण दाखल करताना संबंधित व्यक्तीकडे मेडीक्लेम पॉलिसी आहे का, याची प्रथम चौकशी केली जाते. पॉलिसी असल्याचे समजताच रुग्णाला तातडीने भरती करून स्पेशल रूम, विविध चाचण्या व उपचारांची प्रक्रिया सुरू केली जाते.

मात्र, उपचार पूर्ण झाल्यानंतर संबंधित रुग्णालयाकडून तयार करण्यात आलेले बिल व वैद्यकीय अहवाल विमा कंपनीकडे सादर केल्यानंतर, विमा कंपन्यांकडून अनेक वेळा “रुग्णाची स्थिती सामान्य होती” किंवा “उपचार आवश्यक नव्हते” अशा कारणांवर आधारित मेडीक्लेम मंजूर करण्यास नकार दिला जातो. परिणामी, रुग्ण व त्यांच्या कुटुंबीयांवर हजारो ते लाखो रुपयांचा आर्थिक बोजा अचानक पडतो. रुग्णालयांनी उपचार देताना पारदर्शकता राखणे, तसेच विमा कंपन्यांनी वैद्यकीय निकषांनुसार योग्य कारणांसह निर्णय देणे ही त्यांची कायदेशीर व नैतिक जबाबदारी आहे. अन्यथा, अशा प्रकारची फसवणूक व दिशाभूल ही अन्यायकारक व्यापार पद्धती ठरू शकते. यासंदर्भात सामाजिक कार्यकर्ते चंद्रकांत गोविंद वारघडे (अध्यक्ष, माहिती सेवा समिती, महाराष्ट्र राज्य) यांनी तीव्र नाराजी व्यक्त करत सांगितले की, “रुग्णांना आकर्षित करण्यासाठी रुग्णालयांकडून प्रथम मेडीक्लेमचा आधार घेतला जातो, परंतु नंतर विमा कंपनीकडून क्लेम नाकारला जातो. या साखळीमुळे रुग्णांची आर्थिक व मानसिक पिळवणूक होत आहे. हा प्रकार तात्काळ थांबविणे आवश्यक आहे.” तसेच त्यांनी पुढे इशारा दिला की, “जर संबंधित रुग्णालये व विमा कंपन्यांनी हा भोंगळ व अन्यायकारक कारभार तात्काळ बंद केला नाही, तर माहिती सेवा समितीच्या माध्यमातून संबंधित रुग्णालयांविरोधात कायदेशीर लढा उभारण्यात येईल. गरज पडल्यास ग्राहक न्यायालय, जिल्हाधिकारी कार्यालय तसेच आरोग्य विभागाकडे तक्रारी दाखल करून आंदोलनाचा मार्ग अवलंबण्यात येईल.”

# महाराष्ट्र केसरी सिकंदर शेख ठरला नारायणगाव केसरीचा मानकरी

नारायणगाव (दै. संध्या)

मुक्ताबाई व काळोबा देवस्थानच्या यात्रेनिमित्त भरविण्यात आलेल्या कुस्ती आखाड्यात महाराष्ट्र केसरी सिकंदर शेख यांनी भारत केसरी निरु गुजर याचा पराभव करत नारायणगाव केसरी किताब पटकावत तीन लाख रुपयांचे इनाम मिळविले. अशी माहिती यात्रा कमिटीचे प्रमुख दादाभाऊ खैरे,विकास तोडकरी यांनी दिली.

उत्तर पुणे जिल्ह्यातील सर्वात मोठी समजली जाणारी नारायणगाव येथील श्री मुक्ताबाई व काळोबा देवस्थानच्या यात्रेनिमित्त भव्य कुस्ती आखाड्याचे नियोजन करण्यात आले होते.

या आखाड्यासाठी जुन्नरचे आमदार शरद सोनवणे यांच्या वतीने तीन लाख रुपयांचे इनाम जाहीर केले होते. हा आखाडा गुरुवार दि.16 रोजी सायंकाळी सहा वाजता पार पडला. या आखाड्यात राज्यभरातील नामांकित पहिलवानांनी सहभाग घेऊन रात्री साडेअकरापर्यंत 100 हून अधिक कुस्त्या रंगल्या. या कुस्त्यांमध्ये 25 हजार,15 हजार, 11 हजार रुपयांच्या प्रत्येकी 10 कुस्त्या तसेच तीन लाख,दीड



लाख,एक लाख आणि 51 हजार रुपयांच्या प्रमुख कुस्त्या पार पडल्या. विजेत्या पहिलवानांना एकूण सुमारे 15 लाख रुपयांची बक्षीसे देण्यात आली. महत्त्वाच्या लढतीमध्ये सुनील कोटगोंड याने बालाजी खरात याचा पराभव करत 1 लाख 51 हजार रुपयांची कुस्ती जिंकली. सागर देवकाते व शाहरुख खान यांच्यातील एक लाख रुपयांच्या कुस्तीत Aren't खान विजयी ठरला.तसेच ओंकार येलभर व अमोल दिंडे यांच्यातील 51 हजार रुपयांच्या कुस्तीत अमोल दिंडे याने बाजी मारली.

यावेळी माजी आमदार अतुल बेनके, माजी जिल्हा परिषद सदस्या आशाताई बुचके, कुलस्वामी सोसायटीचे अध्यक्ष शंकर पिंगळे, कृषीभूषण अनिलतात्या मेहेर आदी मान्यवर उपस्थित होते. आखाड्याचे नियोजन दादाभाऊ खैरे,एकनाथ शेटे,संतोष खैरे, राजाराम पाटे, संतोष वाजगे, एम. डी. भुजबळ, आशिष फुलसुंदर, मुरलीधर फुलसुंदर,विकास तोडकरी, अशोक पाटे बाळा वाव्हळ, विराज फुलसुंदर, तेजस वाजगे,विलास पाटे आदींनी केले. स्पर्धेचे परीक्षक म्हणून उपमहाराष्ट्र केसरी अनिल गुंजाळ, अनिल मेहेत्रे, एच. पी. नरसुडे, अजय कानडे आदींनी काम पाहिले. सूत्रसंचालन हंगेश्वर धायगुडे यांनी केले.

## राजगुरुनगरमध्ये अतिक्रमणधारकांवर प्रशासनाचा हातोडा; पुरावे न दिल्यास बुलडोझर कारवाई

राजगुरुनगर (दै. संध्या)

तालुक्यातील सरकारी आणि गायरान जमिनींवर बेकायदेशीर अतिक्रमण करून वैयक्तिक बेसुमार फायदा लाटणाऱ्या भूमाफियांवर महसूल प्रशासनाने हातोडा उगारला आहे. उच्च न्यायालयाच्या जनहित याचिकाच्या कडक आदेशानंतर प्रांताधिकारी अनिल दौंडे यांच्या मार्गदर्शनाखाली तहसीलदार प्रशांत बेडसे आणि पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांच्या नेतृत्वाखाली संयुक्त सर्वेक्षण पूर्ण झाले आहे. संपादकीय लेख

या मोहिमेच्या पहिल्या टप्प्यात व्यावसायिक अतिक्रमणधारकांना तहसीलदार प्रशांत बेडसे यांच्या सहीने निष्कासनाच्या (कारणे दाखवा) नोटिसा नुकत्याच बजाविण्यात आल्या आहेत. दरम्यान, येत्या 24 एप्रिलला सुनावणी ठेवण्यात आली असून, पुरावे न दिल्यास या मिळकतीवर थेट बुलडोझर फिरवला जाणार आहे. या आक्रमक कारवाईमुळे तालुक्यातील भूमाफियांमध्ये दहशत पसरली आहे. खेड महसूल आणि ग्रामविकास विभागाने गोलेगाव, पिंपळगावतर्फे चाकण आणि परिसरातील गायरान जमिनींची बारकाईने पाहणी केली. यात निवासी तसेच व्यावसायिक अतिक्रमणे उघडकीस आली. प्रशासनाने पारदर्शक पद्धतीने हे सर्वेक्षण पूर्ण केले असून, कायदेशीर रणनीतीनुसार कारवाईचा रोडमॅप तयार केला आहे. प्रशासनाने पहिल्या टप्प्यात फक्त व्यावसायिक गाळे, दुकाने आणि शेड्स यांना लक्ष्य केले आहे.

कारण सर्वोच्च न्यायालय, मुंबई उच्च न्यायालय आणि शासनाच्या स्पष्ट आदेशानुसार, सार्वजनिक जमिनीवरील व्यावसायिक अतिक्रमणे कधीही नियमित करता येत नाहीत. निवासी अतिक्रमणांमध्ये काही अपवादात्मक तरतुदी असू शकतात; पण व्यावसायिक बांधकामांना कोणतेही कायदेशीर संरक्षण नाही. त्यामुळे प्रशासनाने प्रथम व्यावसायिक अतिक्रमण जमीनदोस्त करावीत, असा धोरणात्मक निर्णय घेतला आहे.


## राजगड तालुक्यात पाणीटंचाई तीव्र

### ४० गावांसाठी साडेपाच कोटींचा आराखडा

वेल्हे (दै. संध्या)

जिल्ह्यात सर्वाधिक पाऊस पडणाऱ्या अतिवृष्टीच्या राजगड तालुक्यात उन्हाच्या वाढत्या तीव्रतेबरोबर पाणीटंचाईच्या झळा वाढल्या आहेत. वाजेघर, वांगणीवाडी, मेटपिलावरेसह पानशेत, राजगड, तोरणा भागातील 12 वाड्या-वस्त्या आणि गावात पाणीटंचाई निर्माण झाली आहे.

या पाणीटंचाईवर मात करण्यासाठी विहिरी, पाणी योजना, नवीन पाणी योजना राबविण्यासाठी पाणीपुरवठा विभागाने साडेपाच कोटी रुपये खर्चाचा टंचाई आराखडा (प्रस्ताव) तयार केला



आहे. प्रशासनाने पाणीटंचाईग्रस्त वाड्या-वस्त्या तसेच गावांतील पाणीसाठे ताब्यात घेऊन ते पाणी टंचाईग्रस्त रहिवाशांना देण्याचे नियोजन केले आहे.

तोरणा गडाच्या पायथ्याच्या अतिदुर्गम मेटपिलावरे येथे गुंजवणी धरणावरून थेट पाणीपुरवठा सुरू आहे. मात्र, पाणी जुन्या टाकीत टाकले जात आहे. टाकी गळत असल्याने रहिवाशांना पुरेशा प्रमाणात पाणी मिळत नसल्याची नागरिकांची तक्रार आहे. स्थानिक रहिवासी विशाल पिलावरे म्हणाले, दोन दिवसांतून एकदा रात्री टाकीत पाणी सोडले जाते. टाकी गळत असल्याने सकाळी अर्धीच टाकी असते, त्यामुळे रहिवाशांना अपुरे पाणी मिळत आहे. पाण्यासाठी जनावरे माणसांना वणवण भटकावे लागत आहे.

वाजेघर खुर्द येथील बाळासाहेब भरम म्हणाले, नळाला दिवसाआड पाणी येत आहे. कडक उन्हामुळे जनावरे तसेच माणसांची तहान भागत नाही. त्यामुळे मिळेल तेथून डोक्यावर वाहून महिला आणि मुली पाणी आणतात.

# चाकणला पी १ व पी २ पार्किंग कारवाईला प्रायोगिक तत्त्वावर पंधरा दिवसांची स्थगिती

चाकण (दै. संध्या)

चाकण शहरातील पी १, व पी २ पार्किंग व्यवस्था व त्यानुसार सुरू असलेल्या टोईंग व्हॅनची कारवाई बंद करणेबाबत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सदस्य व शिवसेना गटनेते नितीन गोरे यांचा मागील काही दिवसांपासून पाठपुरावा सुरू होता. तसेच याबाबत चाकण नगरपरिषदेच्या सर्वसाधारण सभेत कारवाई स्थगित करणे बाबत ठराव करून पिंपरी चिंचवड पोलिस आयुक्तालयात पाठवण्यात आला होता. त्या अनुषंगाने चाकण दक्षिण पोलीस स्टेशन येथे डीसीपी विवेक पाटील यांच्या अध्यक्षतेखाली महत्त्वपूर्ण बैठक उत्साहात संपन्न झाली..

बैठकी दरम्यान नितीन गोरे यांनी डीपीआर नुसार योग्य पार्किंग व्यवस्था उपलब्ध होईपर्यंत पी १ व पी २ टोईंग व्हॅनची कारवाई तात्पुरती स्थगित ठेवावी, अशी मागणी केली. त्यानुसार पोलीस



अधिकाऱ्यांनी प्रायोगिक तत्त्वावर पंधरा दिवसांसाठी सदर कारवाई दिनांक २१/०४/२०२६ पासून पुढे स्थगित करण्याबाबत वरिष्ठांची चर्चा करून निर्णय घेण्याचे आश्वासन दिले आहे. स्थगिती प्रायोगिक तत्त्वावर देण्यात आलेली असल्याने नागरिकांनी वाहने योग्य व शिस्तबद्ध पद्धतीने पार्क करावीत, असे आवाहन करण्यात आले आहे. जर चुकीच्या पार्किंगमुळे वाहतुकीला अडचण निर्माण झाल्यास पी १ पी २ ही कारवाई पुन्हा सुरू करण्यात येईल, असे यावेळी स्पष्ट करण्यात आले.

तसेच तळेगाव चौक व आंबेठाण चौक येथे अवैध प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहनांमुळे प्रचंड वाहतूक कोंडी होत असते, अशा वाहनांवर कडक कारवाई करणार असल्याचे यावेळी डीसीपी विवेक पाटील यांनी स्पष्ट केले.

या बैठकीला विवेक पाटील, राम कदम, चाकण नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा मनिषा गोरे, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सदस्य व शिवसेना गटनेते नितीन गोरे, चाकण नगरपरिषदेचे मुख्याधिकारी डॉ.अंकुश जाधव, संजय सोळंकी, वाहतूक विभागाचे पोलीस निरीक्षक दिपक साळुंखे, पीएसआय महादेव गाडे, चाकण नगरपरिषदेचे विरोधी पक्षनेते साहेबराव कड, शिवसेना युवा नेते मृण्मय काळे, नगरसेवक धीरज मुटके, शशिकांत जाधव, कुणाल कड, शामभाऊ राक्षे, संतोष लेंडघर, सुनिल शेवकरी, किरण कौटकर, किरण पठारे आदी उपस्थित होते.

## सर्वसामान्य कुटुंबातील रूपेश कांबळेची मोठी झेप

नीरा (दै. संध्या)

पुरंदर तालुक्यातील नीरा येथील रूपेश सुर्यकांत कांबळे (वय २३) याने महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (MPSC) सहाय्यक नगररचनाकार पदाची परीक्षा उत्तीर्ण करत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. साध्या कुटुंबातून पुढे आलेल्या रूपेशच्या या यशामुळे संपूर्ण नीरा गावात आनंदाचे वातावरण पसरले असून, त्याच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे. रूपेशचे वडील सुर्यकांत कांबळे व आई सुवर्णा कांबळे हे अनेक वर्षांपासून नीरा बाजारपेठेत फुलांचे हार तयार करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. अत्यंत मर्यादित साधनसामग्री असतानाही त्यांनी मुलांच्या शिक्षणाला कधीच खंड पडू दिला नाही. रूपेशही सुट्टीच्या काळात आई-वडिलांना व्यवसायात मदत करत होता.

प्राथमिक शिक्षण नीरा येथे पूर्ण केल्यानंतर रूपेशने माध्यमिक शिक्षण नवोदय विद्यालयातून घेतले. पुढे पुण्यात उच्च शिक्षण



घेत असताना त्याने स्पर्धा परीक्षेची तयारी सुरू ठेवली. अभ्यासात सातत्य, मेहनत आणि कुटुंबियांचा भक्कम पाठिंबा यामुळे त्याने हे यश संपादन केले. तो शिक्षणात नेहमीच प्रथम श्रेणीत उत्तीर्ण होत राहिला असून, त्याची ओळख एक गुणवंत विद्यार्थी अशी होती.

शुक्रवारी (दि. १७) सायंकाळी निकाल जाहीर होताच रूपेश आणि त्याच्या कुटुंबियांचा आनंद गगनात मावेनासा झाला. गावकऱ्यांनी वाजत-गाजत मिरवणूक काढत त्याचे जल्लोषात स्वागत केले. या यशामुळे परिसरातील तरुणांना नवी प्रेरणा मिळाली आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### महात्मा बसवेश्वर यांची जयंती मंत्रालयात उत्साहात साजरी

मुंबई (दैनिक संध्या) : महात्मा बसवेश्वर यांची जयंती मंत्रालयात साजरा करण्यात आली. सामान्य प्रशासन विभागाचे सचिव पंकज कुमार (प्र.ना.उ.सु.) यांनी महात्मा बसवेश्वर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. यावेळी सामान्य प्रशासन विभागाचे अवर सचिव रामदास कोळेकर, सविता शानभाग, सहायक कक्ष अधिकारी राजेंद्र बच्छाव, विजय शिंदे, मंत्रालयातील इतर अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते. त्यांनीही महात्मा बसवेश्वर यांच्या प्रतिमेला पुष्प वाहून अभिवादन केले.



### पनवेलमध्ये जेडब्लूआर लॉजिस्टिक्सच्या केमिकल गोदामाला भीषण आग

उरण (दैनिक संध्या) : पनवेल तालुक्यातील पाडेघर जवळ जे डब्लू आर लॉजिस्टिक्स प्रा. लि. या हॅझर्डस कार्गो कंपनीच्या केमिकल गोदामाला शनिवारी दुपारी भीषण आग लागली. आगीचे लोळ व स्फोटाच्या आवाजाने परिसरात घबराट पसरली व वाहतूक काही काळ विस्कळीत झाली. जेएनपीटी पासून ११ किमीवर NH-4B महामार्ग लगत ९७ एकरात पसरलेल्या या कंपनीकडे कंटेनर फ्रेट स्टेशन व हॅझर्डस वेअरहाऊस आहे. आगीचे कारण अद्याप अस्पष्ट असून केमिकल रिऍक्शन , शॉर्ट सर्किट किंवा मानवी चूक याचा तपास सुरू आहे. सर्व कामगार वेळीच बाहेर पडल्याने मोठा अनर्थ टळला. पनवेल अग्निशमन दलाच्या ५-६ गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या. केमिकलमुळे पाणी व फोमचा वापर करून आग विझवण्याचे शर्थीचे प्रयत्न सुरू आहेत. पनवेल महापालिका, एमआयडीसी व प्रदूषण नियंत्रण मंडळाचे पथक घटनास्थळी दाखल असून फायर सेफ्टी व परवान्यांची चौकशी सुरू आहे. सध्या कूलिंग ऑपरेशन सुरू असून सुदैवाने जीवितहानी झाली नाही.

### उन्हाळी वाहतुकीसाठी रत्नागिरी विभागात 70 टक्के बुकिंग फुल्ल..!



रत्नागिरी (दैनिक संध्या) : रत्नागिरी विभागातर्फे उन्हाळी वाहतूक सुरू करण्यात आली आहे. १ हजारहून अधिक जादा बसेसचे नियोजन करण्यात आले आहे. नऊ आगारातून दररोज ३० बसेस विविध मार्गावर धावत आहेत. आतापर्यंत ७० टक्के ऑनलाईन बुकिंग झाली असून मे मध्ये शंभर टक्के बुकिंग होण्याची शक्यता आहे. त्यामुळे प्रवाशांनो आताच एसटी बसचे बुकिंग करा, असे आवाहन एसटी विभागाने केले आहे. काही शाळा-महाविद्यालयात परीक्षा सुरू आहे तर काहींचे परीक्षा संपलेल्या आहेत. त्यामुळे उन्ह्याळ्या सुट्टीत मूळ गावी जाण्यासाठी, पर्यटनासाठी नागरिक बाहेर पडू लागले आहेत. उन्हाळ्यात वाढती गर्दी लक्षात घेता रत्नागिरी विभागाच्या वतीने १ हजार जादा बसेसचे नियोजन करण्यात आले आहे. १५ एप्रिलपासून नऊ आगारातून १० बसेस पश्चिम महाराष्ट्रासह, मुंबई, मराठवाडा, विदर्भ याभागात बसेस धावत आहेत. दरवर्षाप्रमाणे यंदाही प्रवाशांनी प्रवासासाठी लालपरीला पसंती दिली असून ७० टक्केहून अधिक प्रवाशांनी ऑनलाईन तिकीट बुकिंग केले आहे. येत्या २५, २६ एप्रिलपासून एसटी बसेसना आणखी गर्दी वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे प्रवाशांनो आतापासून ऑनलाईन तिकीट काढा असे आवाहन एसटीने केले आहे. रत्नागिरीसह ८ आगारांतून मुंबई-पुणेसह कोल्हापूर, सांगली, सातारा, सोलापूर, अक्कलकोट, तुळजापूर, पंढरपूर, मिरज, लातूर, छत्रपती संभाजीनगर, धाराशिव, बीड, अकोला, नंदुरबार, परभणी, बुलडाणा यासह विविध मार्गावर बसेस धावत आहेत. रत्नागिरी विभागातून उन्हाळी वाहतूक सुरू झालेली आहे. प्रवाशांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. १ हजारहून अधिक जादा बसेसचे नियोजन करण्यात आले आहे. त्यामुळे प्रवाशांनी ऑनलाईन तिकीट काढून आपली जागा निश्चित करावी. जादा वाहतूक १५ एप्रिल ते १५ जूनपर्यंत असणार आहे.



### श्रीमंत भाऊसाहेब रंगारी गणपतीला 7 हजार आंब्यांचा महानैवेद्य

पुणे (दैनिक संध्या) : साडेतीन मुहूर्तापैकी एक असलेल्या अक्षय तृतीयेच्या शुभमुहूर्तावर हिंदुस्थानातील पहिला सार्वजनिक गणपती श्रीमंत भाऊसाहेब रंगारी गणपती ट्रस्टच्या वतीने पारंपरिक उत्साहात 'आंबा महोत्सव' साजरा करण्यात आला. यावेळी बाप्पाला ७ हजार आंब्यांची आकर्षक आरास करून महानैवेद्य दाखविण्यात आला. तसेच यानिमित्ताने मंदिरात आकर्षक सजावट करण्यात आली असून बाप्पांच्या दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी होत आहे. महोत्सवाच्या निमित्ताने सकाळची आरती बी. यू. भंडारी ग्रूपचे चंद्रवर्धन भंडारी व उल्हास घाटगे यांनी सपत्नीक तसेच चिवडेवाले रामचंद्र भगवानदास यांच्या हस्ते भक्तिभावाने पार पडली. यावेळी उपस्थित भाविकांनीही आरतीत सहभागी होत मंगलमय वातावरणाचा अनुभव घेतला. आंबा महोत्सवासाठी यंदा तब्बल ७ हजार आंब्यांचा वापर करून बाप्पांची आकर्षक सजावट करण्यात आली आहे. विविध प्रकारच्या आंब्यांनी सजवलेले गणरायाचे रूप भाविकांचे विशेष आकर्षण ठरत असून, दर्शनासाठी दिवसभर भाविकांची रांग लागलेली पाहायला मिळत आहे. बाप्पाच्या सजावटीसाठीचे आंबे शहरातील विविध अनाथ आश्रमात वाटप करण्यात येणार आहेत. दरम्यान ट्रस्टच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही हा महोत्सव उत्साहात साजरा केला जात असून, पुणेकर भक्तांमध्ये या सोहळ्याबद्दल मोठी उत्सुकता दिसून येत आहे. यावेळी ट्रस्टचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते.

## पुण्यात बालकल्याणासाठी 'हिमालया बेबीकेअर'तर्फे 'हेल्दी बेबी कॉन्टेस्ट'चे आयोजन

पुणे (दै. संध्या)



हिमालया बेबीकेअर या भारतातील आघाडीच्या व लोकप्रिय बेबीकेअर ब्रँडने स्माईल फाउंडेशनच्या सहकार्याने पुण्यात 'हेल्दी बेबी कॉन्टेस्ट' नुकतीच आयोजित केली. या उपक्रमात माता, त्यांची बाळे, समुदाय आरोग्य कर्मचारी आणि बालसंगोपन तज्ज्ञ एकत्र आले होते. बालकांचा सर्वांगीण विकास, मातांचे आरोग्य आणि बालसंगोपनाच्या सुरुवातीच्या पद्धती यांबाबत जनजागृती करण्याचा या उपक्रमाचा उद्देश होता. या स्पर्धेत १३०हून अधिक मातांनी आणि त्यांच्या बाळांनी उत्साहाने भाग घेतला. आरोग्य तज्ज्ञ आणि 'स्माईल फाउंडेशन'ची प्रोग्रॅम टीम यांनीही या उपक्रमाला पाठिंबा दिला. संपूर्ण वातावरण उत्साही आणि समाजाभिमुख होते. त्यातून मातांचे व बालकांचे आरोग्य सुधारण्याबाबत समाजात मोठी उत्सुकता असल्याचे दिसून आले. स्पर्धेदरम्यान बाळांच्या हालचालींची कौशल्ये, त्यांची उंची, वजन आणि सक्रियता अशा महत्त्वाच्या विकास घटकांवर मूल्यमापन करण्यात आले. हिमालया बेबीकेअर आणि स्माईल फाउंडेशन यांनी संयुक्तपणे या 'हेल्दी बेबी कॉन्टेस्ट'चे विजेते जाहीर केले. अंकित बराणे आणि कियारा गणेश बडगुजर यांना प्रथम क्रमांक देण्यात आला. वैष्णव एरंडे आणि शिव आकाश राठोड यांना दुसरा क्रमांक, तर स्वरा पाटील आणि संघमित्रा जगदीश खोब्रागडे यांना तिसरा क्रमांक देण्यात आला. सर्व विजेत्यांना विशेष प्रमाणपत्र आणि हिमालया बेबी गिफ्ट पॅक देण्यात आला. तसेच सर्व स्पर्धकांना सहभाग प्रमाणपत्र, माइलस्टोन बुकलेट आणि हिमालया बेबीकेअर सॅम्पल पॅक असलेली गूडी बॅग देण्यात आली. विकासाच्या मूल्यमापनासोबतच या प्रसंगी मातांना स्तनपान, बाळांचे पोषण, स्वच्छता, लसीकरणाचे

वेळापत्रक आणि शिशूसंगोपन यांबाबत मार्गदर्शन करण्यात आले. अशा प्रकारे माहितीपूर्ण आणि निरोगी पद्धतीने बाळांची काळजी घेण्याचे महत्त्व सर्वांच्या लक्षात आले. या उपक्रमाबाबत 'हिमालया वेलनेस कंपनी'चे बेबीकेअर विभागाचे संचालक चक्रवर्ती एन. व्ही. म्हणाले, "बाळाच्या वाढीसाठी आणि विकासासाठी सुरुवातीची वर्षे अत्यंत महत्त्वाची असतात. 'हेल्दी बेबी कॉन्टेस्ट'च्या माध्यमातून पालकांना वैद्यकीय मार्गदर्शन आणि उपलब्ध साधने देण्याचा आमचा उद्देश आहे; जेणेकरून बाळाच्या आरोग्याची मजबूत पायाभरणी ही सुरक्षितता आणि विश्वास यांच्या आधारे होईल. स्थानिक समुदाय संस्थांसोबत भागीदारी करून आम्ही तळागाळातील कुटुंबांपर्यंत पोहोचत आहोत. प्रत्येक बाळाची सौम्यपणे, सुरक्षितपणे आणि माहितीपूर्ण आधारावर काळजी घेण्याचा संदेश आम्ही देत आहोत."

> 'स्माईल फाउंडेशन'च्या 'स्वाभिमान' आणि 'एम्पॉवरिंग ग्रासरूट्स' या उपक्रमांच्या प्रमुख सरिता प्रधान म्हणाल्या, "स्माईल फाउंडेशनच्या 'स्वाभिमान' उपक्रमांतर्गत आम्ही सामुदायिक स्तरावर मातांचे आणि बालकांचे आरोग्य बळकट करण्यावर लक्ष देतो. बाळांचे लहान वयातील योग्य पोषण, त्यांची काळजी आणि त्यासंदर्भात पालकांची जागृती यांतून दोघांच्याही आयुष्यावर सकारात्मक परिणाम होत असतो.

## महिला आरक्षणाला पाठिंबा सांगत प्रत्यक्षात विरोध; 'इंडिया' आघाडीचा दुटप्पीपणा; डॉ. नीलम गोऱ्हे यांचा हल्लाबोल

मुंबई (दै. संध्या)



महिला आरक्षण विधेयक नामंजूर झाल्याच्या पार्श्वभूमीवर शिवसेनेच्या महिला आघाडीच्या कार्यकर्त्यांनी आज मुंबईत 'इंडिया' (INDIA) आघाडीविरोधात जोरदार निदर्शने केली. घोषणाबाजी करत या विधेयकाच्या निषेधार्थ महिला कार्यकर्त्या रस्त्यावर उतरल्या होत्या.

यावेळी डॉ. नीलम गोऱ्हे यांनी 'इंडिया' आघाडीवर तीव्र टीका करत म्हटले की, संपूर्ण देशाचे लक्ष लागलेल्या महिला आरक्षण विधेयकाबाबत काँग्रेस व सहयोगी पक्षांनी दुटप्पी भूमिका घेतली. "एकीकडे महिला आरक्षणाला पाठिंबा असल्याचे सांगितले जाते, तर दुसरीकडे प्रत्यक्षात लोकसभेत विधेयक नामंजूर करण्यासाठी विरोध केला जातो. हा महिलांच्या भावनांचा विश्वासघात आहे," असा आरोप त्यांनी केला.

डॉ. गोऱ्हे पुढे म्हणाल्या की, मतदारसंघ पुनर्रचनेच्या नावाखाली दिशाभूल केली जात असून, महिला सक्षमीकरणाच्या प्रश्नावर खोटा प्रचार करण्यात आला. "महिलांना न्याय देण्याऐवजी राजकीय स्वार्थासाठी या विधेयकाला अडथळे आणले गेले."

तसेच, "महिलांच्या मतांचा अधिकार मागणाऱ्यांनी आधी त्यांच्या हक्कांबाबत प्रामाणिक भूमिका घ्यावी. अन्यथा येणाऱ्या निवडणुकांमध्ये महिलाच योग्य तो निर्णय घेतील," असा इशाराही त्यांनी दिला.

यावेळी खासदार श्रीकांत शिंदे यांनी या विधेयकाला स्पष्ट पाठिंबा दिल्याचेही त्यांनी नमूद केले.शिवसेना मुख्य नेते व उपमुख्यमंत्री ना.एकनाथ शिंदे यांनी महिलांचा सन्मान म्हणजेच महिलांना अधिकार या भुमिकेतुन अनेक योजना आणल्या आहेत. महायुती व एन. डी.ए. ची भुमिका महिला सक्षमीकरणाचे आहे.

याऊलट युपीए आघाडीने पुतनेची भुमिका घेऊन महिलांना डावलण्याचे विषारी काम केले आहे. काँग्रेसने सत्ता असुनही आरक्षण देण्याची ईच्छाशक्ती दाखवली नाही . तंदुरमध्ये जाळलेली नैना ते लातुरची कल्पना गिरींचा खुन , मुस्लीम महिलांच्या अधिकारांचा गळा घोटण्यास शहाबानोच्या निमित्ताने पोटगी नाकारणारे विधेयक, समान नागरी कायद्यात विरोध असा काँग्रेसचा दुटप्पी ईतिहास पाहिला तर महिलांची फसवणूक एवढेच ते करत असतात*

या आंदोलनात आमदार मनीषा कायंदे, बेस्ट अध्यक्ष तृष्णा विश्वासराव, संजय निरुपम, शिवसेना उपनेत्या कला शिंदे यांच्यासह महिला पदाधिकारी व कार्यकर्त्या मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या.



## शास्त्रज्ञांनी शोधले सर्वात मोठ्या लोहखनिजाच्या साठ्याचे वय

कॅनबेरा (दै. संध्या)

भूगर्भशास्त्रज्ञांनी पृथ्वीवरील सर्वात मोठ्या लोहखनिजाच्या साठ्याच्या निर्मितीबाबत एक अत्यंत महत्त्वाचा शोध लावला आहे. शास्त्रज्ञांना असे दिसून आले आहे की, हा साठा पूर्वीच्या अंदाजापेक्षा तब्बल एक अब्ज वर्षांनंतर तयार झाला आहे. हा विशाल साठा ऑस्ट्रेलियाच्या हॅमर्सले प्रांतात स्थित आहे.

विविध अंदाजानुसार, जमिनीखालील या साठ्याचे प्रमाण सुमारे 55 अब्ज मेट्रिक टन इतके आहे. या लोहखनिजाची किंमत थक्क करणारी आहे. सध्याच्या बाजारभावावर आधारित याचे सैद्धांतिक मूल्य 5.7 ट्रिलियन डॉलर (सुमारे 518 लाख कोटी रुपये) पेक्षाही जास्त आहे. विशेष म्हणजे, ऑस्ट्रेलिया हा जगातील सर्वात मोठा लोहखनिज निर्यातदार देश असून, त्यांच्या एकूण निर्यातीपैकी 96 टक्के हिस्सा हा उच्च दर्जाचा 'हेमेटाइट' प्रकारचा असतो, जो प्रामुख्याने याच प्रदेशातून मिळवला जातो. 'प्रोसिडिंग्स ऑफ द नॅशनल अकादमी ऑफ सायन्सेस'मध्ये प्रसिद्ध झालेल्या या अभ्यासात शास्त्रज्ञांनी नवीन तंत्रज्ञानाचा वापर केला आहे.

## उत्कंठावर्धक 'पौर्णिमेचा फेरा' दोन सीझननंतर आता धमाकेदार तिसरा सीझन प्रेक्षकांच्या भेटीला!

मुंबई (दै. संध्या)

मराठी सिनेविश्वात आपल्या आगळ्यावेगळ्या कथानकाने आणि सस्पेन्स-थ्रिलरच्या जोरावर प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवणारी वेब सिरीज 'पौर्णिमेचा फेरा' आता एका नव्या वळणावर येऊन पोहोचली आहे. पहिल्या दोन सीझनला मिळालेल्या अभूतपूर्व प्रतिसादानंतर आणि प्रेक्षकांच्या आग्रहाखातर शुभम प्रोडक्शन फिल्म्स घेऊन येत आहे 'पौर्णिमेचा फेरा सीझन ३'. शुभम प्रोडक्शन फिल्म्स या यूट्यूब चॅनेलवर या वेबसिरीजचा तिसरा भाग नुकताच प्रदर्शित झाला आहे. या वेबसिरीजला सोशल मीडियावर प्रेक्षकांचा चांगलाच प्रतिसाद मिळत आहे.

थरार, उत्कंठा, शोध या नजरबंदीच्या खेळातून अनुत्तरीत प्रश्नांचा शोध घेणारी 'पौर्णिमेचा फेरा' ही मराठी वेब सिरीजचा तिसरा भाग 'शुभम प्रोडक्शन फिल्म्स' या चॅनेलवर प्रदर्शित करण्यात आला आहे. हास्यजत्रा कार्यक्रमातले विनोदवीर निखील बने आणि मंदार मांडवकर आपल्याला या वेब सिरीजमध्ये वेगळ्याच भूमिकेत पहायला मिळतात. त्यांना सिद्धेश नागवेकर या नव्या दमाच्या कलाकारासोबत, संदीप रेडकर, दीपा माळकर, प्राची केळुस्कर, निकिता बंदावणे, चंदन जमदाडे, संजय वैद्य, स्नेहल आयरे



या सगळ्यांची साथ लाभली आहे. सगळ्या कलाकारांनी त्यांच्या भूमिका चांगल्या केल्या आहेत. ही वेब सिरीज बघताना प्रत्येकजण त्या त्या भूमिकेत चपखल बसलेला असल्याचं जाणवतं.

या वेब सिरीजची निर्मिती पायल गणेश कदम यांनी केली असून, दिग्दर्शनाची धुरा सचिन गोताड यांनी सांभाळली आहे. कथेचे संवाद आणि पटकथा संदेश लोकेगावकर यांची असून, छायाचित्रण कुणाल महादेव परडकर यांनी केले आहे. कार्यकारी निर्माता म्हणून हेमंत दिनकर पांचाळ लाभले आहेत. या सीरीजचे संकलन शिलंत कदम यांनी केले आहे. अनिरुद्ध निमकर याने संगीत दिले आहे.

'पौर्णिमेचा फेरा' या वेब सिरीजची मांडणी इतर कथांपेक्षा वेगळी असल्यानेच ती अल्पावधीत लोकप्रिय झाली. पहिल्या सीझनमध्ये तीन मित्रांच्या गावी जाण्यापासून सुरू झालेला हा प्रवास एका खोल रहस्यात जाऊन अडकला. एका मित्राला वाचवण्याच्या प्रयत्नात सुरू झालेला हा खेळ दुसऱ्या सीझनमध्ये अधिक गडद आणि थरारक झाला. आता, जिथे दुसरा सीझन संपला, तिथूनच एका मोठ्या रहस्याचा उलगडा करण्यासाठी सीझन ३ सज्ज झाला आहे.

## सचिन आणि मधुराणी गोखले सोबत एका अनोख्या "हिरो"ची मराठी सिनेसृष्टीत दमदार एंट्री

मुंबई (दै. संध्या)

चंदेरी दुनियेत ब्रेक मिळायला अनेक ऑडिशन्स द्याव्या लागतात. पण हा असा पहिला कलाकार आहे ज्याला ऑडिशन्स न देता थेट सुप्रसिद्ध अभिनेते सचिन पिळगांवकर आणि सुप्रसिद्ध अभिनेत्री मधुराणी गोखले यांच्यासोबत चित्रपटात काम करण्याची लॉटरी लागली आहे ते पण हिरो म्हणून. कोण आहे हा हिरो ? या हिरोच नाव आहे "कापूसकोंडा". हा एक गोंडस भुभु - कुत्रा आहे. आणि हेच या चित्रपटाचे मुख्य आकर्षण आहे. आज अक्षय्य तृतीयेच्या शुभमुहूर्तावर "कापूसकोंडा' या चित्रपटाचे मोशन पोस्टर सोशल मीडियावर लॉंच करण्यात आले आहे. "नवरा माझा नवसाचा" या गाजलेल्या चित्रपटात अभिनेते सचिन पिळगांवकर आणि अभिनेत्री मधुराणी गोखले दिसले होते. आता तब्बल २२ वर्षांनंतर "कापूसकोंडा" या आगामी चित्रपटातून पुन्हा एकदा एकत्र आले असून, बऱ्याच काळानंतर या चित्रपटाच्या निमित्ताने अभिनेत्री मधुराणी गोखले चित्रपटात कमबॅक करत आहे.



जास्वंद एंटरटेन्मेंट्स प्रा. लि. निर्मित "कापूसकोंडा" चित्रपटाचे लेखन आणि दिग्दर्शन सचिन मोहिते यांचं आहे. सचिन मोहिते, गणेश पंडित, ऋषिकेश तुरई यांनी चित्रपटाची पटकथा, संवादलेखन केलं आहे. सचिन पाटेकर यांनी छायांकनाची जबाबदारी निभावली आहे. संगीतकार ए. व्ही. प्रफुल्लचंद्र यांचे सुमधुर संगीत या चित्रपटाला लाभले असून चित्रपटाच्या गाण्यांना गायक अवधूत गुप्ते, पद्मनाभ गायकवाड यांचा स्वरसाज लाभला आहे. सुहास राणे यांनी ध्वनी तंत्रज्ञ म्हणून काम पाहिले आहे. अभिनेते सचिन पिळगांवकर व अभिनेत्री मधुराणी गोखले यांच्यासह नवीन पिढीतील अभिनेत्री अक्षता पाडगांवकर, जान्हवी तांबट आणि अभिनेता भूषण पाटील अशी उत्तम स्टारकास्ट या चित्रपटात पहायला मिळणार आहे. चित्रपटाचे बरेचसे चित्रीकरण कथानकाची गरज समजून लातूर जिल्ह्यातील अंधोरी या गावी करण्यात आले आहे.

"कापूसकोंडा" चित्रपटाची कथा अत्यंत अनोखी आहे. विशेष म्हणजे चित्रपटाची कथा एका सत्य घटनेवर प्रेरित आहे. चित्रपटाचा खरा हिरो हा पोस्टरवर दिसत असलेला एक 'कुत्रा' असून चित्रपटाचे रंजक कथानक हे एका फॅमिली आणि त्या कुत्र्याच्या भोवती गुंफण्यात आले आहे. मानवी नाते संबंध, कुटुंब, भाव-भावनांवर आधारित ही हळवी गोष्ट प्रत्येकाला आपलीशी वाटणारी आहे. म्हणूनच या चित्रपटाला ए फॅमिली डॉग फिल्म अशी टॅग लाईन देण्यात आली आहे. लेखक, दिग्दर्शक सचिन मोहिते या पुढे मराठीत पहिल्यांदाच एक 'डॉगव्हर्स "करण्यास उत्सुक आहेत, कामही सुरु आहे.

या चित्रपटाचं कथानक हे अतिशय वेगळे आहे. इतक्या वर्षांच्या माझ्या कारकिर्दीत असे कथानक मी कधी केले नाही. माझ्या भावनानसोबत या चित्रपटाचे कथानक मिळते जुळते असल्याचे मला जाणवले. त्याचप्रमाणे या चित्रपटाचा लेखक, दिग्दर्शक सचिन मोहिते हा मला पहिल्या भेटीतच कमालीचा हुशार वाटला आणि त्याच्यावर विश्वास ठेऊन मी या चित्रपटात काम करण्यासाठी होकार दिला असे सुप्रसिद्ध अभिनेते सचिन पिळगांवकर यांनी सांगितले.

चित्रपटाचे लेखक, दिग्दर्शक सचिन मोहिते सरांनी चित्रपटाची कथा जेव्हा मला ऐकवली तेव्हाच मी या कथेच्या प्रेमात पडली. इतकी गोड, निरागस अशी ही कथा ऐकताना माझ्या मनाला भिडली सोबत वेगळी भूमिका करण्याची संधी मला मिळाली यासाठी मी या चित्रपटात काम करण्याचा निर्णय घेतला. कथानक खुपच वेगळ्या धाटणीचं असुनही अगदी सहजपणे मांडलं आहे. सोबत सचिन पिळगांवकर सरांसोबत काम करण्याची मला संधी २२ वर्षांनी मिळणार होती.सचिन सरांसोबत काम करताना अनेक गोष्टी मला शिकायला मिळाल्या असे अभिनेत्री मधुराणी गोखले यांनी सांगितले.

## डॉमिनोज पिझ्झा सेंटरमध्ये अवैध एलपीजी गॅस वापर उघड

मुंबई (दै. संध्या)

शहरातील एलपीजी गॅसच्या काळ्याबाजारावर आळा घालण्यासाठी नागरी पुरवठा विभागाने १८ एप्रिल रोजी राबविलेल्या विशेष धाड मोहिमेत डॉमिनोज पिझ्झा सेंटरमध्ये अवैधरित्या एलपीजी गॅसचा वापर होत असल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या कारवाईत चेंबुर आणि अनुशक्तीनगर परिसरात दोन गुन्हे नोंद करण्यात आले आहेत. नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई चंद्रकांत डांगे यांच्या निर्देशानुसार, उपनियंत्रक शिधावाटप 'ई' परिमंडळ श्रीमती रिना बसैय्ये यांच्या मार्गदर्शनाखाली आणि सहाय्यक नियंत्रक शिधावाटप रामकृष्ण कांबळे यांच्या अधिपत्याखालील पथकाने ही कारवाई केली. एलपीजी गॅसचा काळाबाजार व अनियमितता रोखण्यासाठी ही विशेष मोहीम हाती घेण्यात आली होती.

चेंबुर परिसरातील पेस्तमसागर रोडवरील विश्वसंगम टॉवरमधील डॉमिनोज पिझ्झा सेंटरवर धाड टाकण्यात आली. शिधावाटप कार्यालय क्र. ३३ 'ई' चेंबुर येथील सहाय्यक शिधावाटप अधिकारी जितेंद्र देशमुख, अमर सकपाळ तसेच निरीक्षक भगवान वांडेकर, निलकंठ येसने आणि प्रकाश पराते यांच्या पथकाने ही कारवाई केली. तपासादरम्यान एकूण ८ एलपीजी सिलेंडर्स विनाबिल अवैधरित्या प्राप्त करून वापरत असल्याचे आढळले. या प्रकरणी सुमारे २५,९७० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून टिळकनगर पोलीस ठाण्यात दोन आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

देवनार परिसरातील अर्जुन सेंटर येथील डॉमिनोज पिझ्झा सेंटरवरही धाड टाकण्यात आली. शिधावाटप कार्यालय क्र. ४९ 'ई' अनुशक्तीनगर येथील शिधावाटप अधिकारी जगन्नाथ सानप, सहाय्यक अधिकारी श्रीमती सोनाली धांदरणेकर तसेच निरीक्षक देवयानी पवार, नंदिनी इंगोले, राकेश पाटील आणि सुनील आढाऊकर यांच्या पथकाने कारवाई केली. येथे एकूण १९ एलपीजी सिलेंडर्स विनाबिल वापरात असल्याचे आढळून आले. ४९,११७ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून गोवंडी पोलीस ठाण्यात दोन आरोपींविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला आहे. नागरी पुरवठा विभागाकडून एलपीजी गॅसच्या बेकायदेशीर साठवणूक व वापराविरोधात कारवाई अधिक तीव्र करण्यात आली आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### जेजुरीगडावर आंब्याच्या फळांचा नैवेद्य अर्पण; भाविकांना आमरस प्रसादाचे वाटप

पुरंदर (दैनिक संध्या) : साडेतीन मुहूर्तांपैकी एक मानल्या जाणाऱ्या अक्षय तृतीया निमित्ताने जेजुरी गडावर भक्तिमय वातावरणात विशेष पूजा व नैवेद्य कार्यक्रम पार पडला. सालाबादप्रमाणे श्री खंडोबा देवता व लिंग कडेपठार ट्रस्ट (११ डझन) तसेच श्री मार्तंड देवस्थान जेजुरी (५१ डझन) यांच्या वतीने श्रींना आंब्याचा महानैवेद्य अर्पण करण्यात आला. या उपक्रमाचे आयोजन श्रीश व दर्श खेडेकर यांच्या पुढाकाराने झाले. श्रीहरिद्रामार्चन पूजा कार्यक्रमाच्या मुख्य आयोजिका सौ. मनीषा खेडेकर यांनी स्व. सुगंधा बाबूराव शेळके व स्व. नामदेव निर्मला पावले यांच्या स्मरणार्थ हा धार्मिक सोहळा आयोजित केला. यावेळी सौ. पूनम सुधाकर शेळके, सौ. सारिका संतोष काळे, अभिजीत धामणे, प्रदीप देविदास पांडुळे, तुषार राजेंद्र गाढवे आदींच्या वतीने भाविकांसाठी आमरस व महाप्रसाद सेवा देण्यात आली. गाभाऱ्यात आंब्यांची आकर्षक रांगोळी साकारण्यात आली तसेच मार्तंड भैरव यांना आंब्याचा हार अर्पण करून सुंदर आरास करण्यात आली. या कार्यक्रमाला डॉ. राजेंद्र खेडेकर, मनीषा खेडेकर, सिने कलाकार श्री व दर्श, पूनम शेळके, संगीता कोंडिलकर, अजिंक्य सूर्यवंशी, सुरेखा भेलके, राजेशभाई शाह, अशोक कोल्हे, डॉ. बिरेंद्र यादव तसेच पुजारी व सेवेकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### 251 वर्षी तप करणाऱ्या तपस्वीचा रथयात्रेद्वारे भव्य शोभायात्रा संपन्न

पुणे (दैनिक संध्या) : "वर्षीतप शाही,पारणा महोत्सव" निमित्त २५१ वर्षितप तपस्वींची भव्य शोभायात्रा गुरुवार पेठ येथील श्री आदिश्वर महाराज मंदिर येथून रामोशी गेट, टिम्बर मार्केट द्वारे सेव्हन लव्हज चौक मार्गे गंगाधाम चौक पर्यंत काढण्यात आली. सुमारे १०० रथांचा व १० विन्तेज कार या शोभायात्रेत सहभागी झाले. बँड, ढोल, भांगडा व दक्षिण वाध्य पथक प्रत्येक रथा पुढे आपले वध वाजवत तर जैन बांधव भक्तिमय व नृत्य सादर करत "एक दोन तीन चार तपस्वी नो जय जय कार" च्या घोषणा देत होती. याप्रसंगी प.पू. आ. वि. श्री. राजरत्न सूरीश्वरजी महाराज व प.पू. पंन्यास श्री राजवल्लभ विजयजी गाणिवर्य आदी ठाणा यांच्या आशीर्वादाने शोभायात्रा आरंभ करण्यात आली. जागोजागी जैन बांधवांनी सर्व तपस्वियांच्या रथांवर फुलांची उधळन करत पुष्पवृष्टी करून त्यांचे चौकाचौकात स्वागत केले. महिलांनी लाल साडी तर पुरुषांनी पांढरे कपडे व रंगबिरंगी फेटे परिधान करत या भव्य शोभायात्रेत नाचण्याचा आनंद घेतला. प्रत्येक चौकात रस्त्यांवर उपस्थित जैन बांधवांनी तपस्वीचे स्वागत केले तर रथात बसलेल्या तपस्विना "साथा मा छो" म्हणत त्यांची विचारपूस केली. या भव्य शोभायात्रेचे श्री गोटीवाला ओसवाल जैन संघ व श्री आदिश्वर महाराज मंदिर ट्रस्ट तर्फे आयोजन करण्यात आले.

### ओझर येथे मोफत दिव्यांग शिबिराचे आयोजन

ओझर (दैनिक संध्या) : रोटरी क्लब ऑफ पुना वेस्ट यांच्या निधीतून भारत विकास परिषदेचे दिव्यांग केंद्र पुणे आयोजित श्री विघ्नहर गणपती देवस्थान ट्रस्ट, श्री क्षेत्र ओझर यांच्या सहयोगाने मोफत दिव्यांग शिबिर सोमवार दि 27 एप्रिल रोजी श्री क्षेत्र ओझर (गणपतीचे) भक्तनिवास क्र. 1 येथे सकाळी 9 ते दुपारी 2 वाजेपर्यंत आयोजित करण्यात आले आहे. या शिबिरात आधुनिक कृत्रिम मॉड्यूलर पाय ज्याची बाहेर कमर्शियल किंमत रु. 50 हजार रुपयांपेक्षा जास्त आहे असा पाय मोफत देणार आहे. या शिबिराला जाण्यासाठी दिव्यांग व्यक्तींसाठी नारायणगाव, आळेफाटा,ओतूर,जुन्नर बसस्थानकावर सकाळी 9 ते 12 या वेळेत पीकअपची सोय करण्यात आली आहे.ज्या कोणाचे परिचित दिव्यांग व्यक्ती असतील तर त्यांनी विनोद मो. नं. 8788616751 व जोशी मो. नं.9820599108 यांच्याशी फोनवर संपर्क साधून पूर्व नोंदणी करावी, अशी विनंती श्री विघ्नहर गणपती देवस्थान ट्रस्टने केली आहे.

### पुणे विद्यापीठाची SET परीक्षा वेळेतच; डॉ. प्रभाकर देसाई समन्वयकपदी

पुणे (दैनिक संध्या) : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या सेट परीक्षा विभागातर्फे घेण्यात येणारी यंदाची सेट परीक्षा नियोजित वेळेनुसारच घेण्यासाठी विद्यापीठाने पावले उचलली आहेत. एकीकडे परीक्षेची तयारी सुरू केली असताना दुसरीकडे सेट विभागाच्या समन्वयकपदी डॉ. प्रभाकर देसाई यांची नियुक्ती करण्यात आली असून, ते सोमवारी पदभार घेणार आहेत. त्यामुळे सेट परीक्षा नियोजित वेळेतच होणार असल्याची माहिती विद्यापीठातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिली आहे. राज्यात उच्च व तंत्रशिक्षण विभागामार्फत सुमारे पाच हजार 500 प्राध्यापक पदांची भरती प्रक्रिया सुरू असून, सेट परीक्षा उत्तीर्ण न झाल्यास पात्र उमेदवारांना या भरतीत सहभागी होता येणार नाही. त्यामुळे महाराष्ट्र आणि गोवा राज्यांसाठी नोडल एजन्सी असलेल्या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून परीक्षेचे वेळापत्रक तातडीने जाहीर करण्यात यावे, अशी मागणी सेट परीक्षेसाठी इच्छुक उमेदवारांनी केली आहे. सेट विभागात महिनाभरापूर्वीच विभागप्रमुख म्हणून पदभार स्वीकारलेल्या डॉ. अविनाश कुंभार यांनी नुकताच राजीनामा दिला. त्यामुळे विभागाला समन्वयकच नव्हते. परंतु आता परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक डॉ. प्रभाकर देसाई यांचा परीक्षा विभागाचा पदभार संपुष्टात आला आहे, तसेच त्यांची सेट विभागाच्या समन्वयकपदी नेमणूक करण्यात आली. सोमवारी डॉ. देसाई पदभार स्वीकारणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.



# सासवडमध्ये शिवजयंती उत्साहात साजरी

## शिवछत्रपती मंडळाचे अमृतमहोत्सवी वर्ष

सासवड (दै. संध्या)

'जय भवानी, जय शिवाजी'च्या जयघोषात, ढोल-ताशांच्या गजरात आणि पारंपरिक थाटात सासवडमध्ये श्री शिवछत्रपती शिवजयंती उत्साहात साजरी करण्यात आली. कोडीतनाका येथील श्री शिवछत्रपती शिवजयंती उत्सव मंडळाने यंदा अमृत महोत्सवी वर्षात पदार्पण केले आहे.

सकाळी पुरंदर किल्ल्यावरून आणलेल्या शिवज्योतीचे सासवडच्या शिवतीर्थावर नगराध्यक्षा आनंदीकाकी जगताप, उपनगराध्यक्ष मनोहर जगताप, गटनेते अजित जगताप, नगरसेवक ज्ञानेश्वर जगताप, राजन जगताप, प्रदीप राऊत, ज्ञानेश्वर गिरमे, स्मिता सुहास जगताप, अर्चना चंद्रशेखर जगताप, स्मिता उमेश जगताप, प्रियांका साकेत जगताप, मयूर चौखंडे यांच्यासह सर्व नगरसेवक, नगरसेविका आणि शिवभक्तांनी उत्साहात स्वागत केले.

सायंकाळी माजी आमदार संजय जगताप यांच्या हस्ते मिरवणुकीचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी माजी नगराध्यक्ष दत्तानाना जगताप, उपनगराध्यक्ष मनोहर जगताप, गटनेते अजित जगताप, नगरसेवक राजन जगताप, ज्ञानेश्वर गिरमे, ज्ञानेश्वर जगताप, माजी उपनगराध्यक्ष संजय ग. जगताप, विजय वढणे, मोहन चव्हाण, राजेंद्र जगताप, बंडूकाका जगताप, विलास जगताप, बाबासाहेब जगताप, दिलीपदादा जगताप, पै. मनोज जगताप, धनंजय जगताप, संतोष जगताप, सुरज जगताप, साकेत जगताप, सुहास जगताप यांसह पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते. दिवंगत नारायणआप्पा जगताप, शिवाजीराजे जगताप, चंदुकाका जगताप, राजेंद्र जगताप यांसारख्या



मंडळींनी सुरू केलेली व जपलेली ही परंपरा आज तिसरी पिढी तितक्याच जोमाने पुढे नेत असल्याचे नंदकुमार जगताप यांनी सांगितले.

मिरवणूकीतील पारंपरिक छबीना, दिवेतील जय मल्हार पुण्यातील श्री चिंतामणी ढोल-ताशा पथकांच्या कडकडाटाने परिसर दुमदुमून गेला होता. मिरवणूक गुलाल विरहित आणि शिस्तबद्ध पद्धतीने पार पडली. फटाक्यांची आतिषबाजी आणि डीजेच्या तालाने उत्सवात रंगत आणली. या सोहळ्यात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पोपटराव शिंदे, डॉक्टर दबडगावकर, विजय जगताप, जयेंद्र निकम, मंदार टिळेकर यांसह पदाधिकारी व स्वयंसेवक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. मिरवणूक मार्गावर महात्मा फुले गणेशोत्सव मंडळाच्या वतीने शिवभक्तांना थंड पाणी आणि सरबत वाटप करण्यात आले. अमृत महोत्सवी वर्षानिमित्त वर्षभर विविध सामाजिक व सांस्कृतिक उपक्रम राबविणार असल्याचे मंडळाच्या वतीने जाहीर करण्यात आले. हा सोहळा यशस्वी करण्यासाठी मंडळाचे कार्यकर्ते आकाश जगताप, तन्मय जगताप, अक्षय जगताप, अभिजित जगताप, चंद्रशेखर जगताप, विराज जगताप, अजय जगताप, सौरभ जगताप, विजय जगताप, तेजस शिवरकर यांसह सर्वच सहकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

## 'दिल चीज क्या है...'च्या सुरांनी भारावले श्रोते; आशा भोसले यांना समधुर सुरांतून आदरांजली

पुणे (दै. संध्या)



संगीतप्रेमींसाठी 'दिशा' यांच्या वतीने "सुवर्णकाळातील शलाका" हा विशेष संगीत कार्यक्रम बालशिक्षण भवन येथील सभागृहात मोठ्या उत्साहात पार पडला. जुन्या हिंदी चित्रपटसृष्टीतील सुवर्णकाळ गाजवणाऱ्या अभिनेत्री आणि त्यांच्या अजरामर गीतांवर आधारित या मैफलीने उपस्थित रसिकांना सुरेल आठवणींच्या दुनियेत नेले. या कार्यक्रमाचे खास आकर्षण म्हणजे ज्येष्ठ गायिका आशा भोसले यांना अर्पण करण्यात आलेली स्वरमयी आदरांजली. त्यांच्या अजरामर गाण्यांमधून सादर झालेली ही श्रद्धांजली रसिकांच्या मनाला भिडणारी ठरली.

मैफलीत 'दिल चीज क्या है', दुनिया मे लोगों को, जाने जा, जीवन पे हर मोड पर, निगाहे मिलाने को, 'ये रात भीगी भीगी', 'इस मोड़ से जाते हैं', 'रुक जा रात ठहर जा रे चंदा', 'आप के हसीन रुख पे', 'पिया तोसे नैना लागे रे' तसेच 'कौन है जो सपनों में आया' अशी अनेक अजरामर गीते सादर करण्यात आली. गझल, ठुमरी, प्रेमगीते आणि विरह गीते अशा विविध प्रकारांनी कार्यक्रमाला बहार आली आणि श्रोत्यांनी टाळ्यांच्या कडकडाटात कलाकारांना दाद दिली.

या मैफलीत सुप्रसिद्ध गायिका शलाका घैसास यांनी आपल्या सुरेल व भावपूर्ण आवाजाने रसिकांची मने जिंकली. तसेच गायक अजय राव, प्रसाद केळकर आणि अतुल किल्लेदार यांनीही आपल्या सादरीकरणातून कार्यक्रमात रंगत आणली. प्रत्येक गाण्यातील भावनांची अचूक अभिव्यक्ती आणि सुरांची नेमकी मांडणी यामुळे कार्यक्रम अधिक उठावदार ठरला. कार्यक्रमाची संकल्पना व आयोजन शलाका घैसास यांनी केले होते, तर निवेदनाची धुरा मनीष गोखले यांनी समर्थपणे सांभाळली. त्यांच्या माहितीपूर्ण आणि बहारदार निवेदनामुळे प्रत्येक गाण्यामागील संदर्भ रसिकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचला.

वाद्यसंगतीसाठी अमन सय्यद, ओंकार पाटणकर, हार्दिक रावल, विशाल गंड्रतवार, संजय खाडये आणि चारू किंजवाडकर यांनी दिलेली साथही उल्लेखनीय ठरली.

## बेल्हे येथील जि.प. शाळेने स्पर्धा परीक्षांमध्ये मिळवले यश

नारायणगाव (दै. संध्या)

जुन्नर तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा बेल्हे क्रमांक 1 येथील विद्यार्थ्यांनी मंथन, ऑलिंपीयाड,बी.टी.एस व एनएसएसई अशा विविध स्पर्धा परीक्षांमध्ये घवघवीत यश मिळवले आहे.

एनएसएसई परीक्षा (राज्य गुणवत्ता यादी ): आरोही अजिंक्य भालेराव (196/200), नित्या रमेश भालेराव (192/200), स्वराली राहुल कोकणे (190/200). जिल्हा गुणवत्ता यादी : आलिया अमीर सय्यद (180/200), ऋत्वी निवृत्ती बांगर (176/200), यशश्री सचिन बनकर (166/200).

मंथन परीक्षा यशस्वी विद्यार्थी : मनस्वी पंकजकुमार जैसवार (इ. 1 ली -114/150), क्षितिजा सुनील थोरात (इ. 2 री -110/150), आरोही अजिंक्य भालेराव 268/300), आलिया अमीर सय्यद (258/300), ऋत्वी निवृत्ती बांगर (246/300).

या यशस्वी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणाऱ्या नुरजहाँ पटेल,प्रविणा नाईकवाडी, मीरा बेलकर, अशोक बांगर,संतोष डुकरे,रोहिदास साळवे, हरिदास घोडे,सुषमा गाडेकर व अंजना चौरे, शालेय व्यवस्थापन समितीच्या सदस्या स्वाती कोकणे, नसरीन पठाण, प्रज्ञा शर्मा यांचा सन्मान जुन्नर पंचायत समितीचे सदस्य राजेंद्र पिंगट यांच्या हस्ते करण्यात आला. कार्यक्रमाला शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष प्रीतम मुंजाळ,उपाध्यक्ष वैशाली मटाले, ज्येष्ठ सदस्य ईश्वर पिंगट,शिक्षणतज्ञ विलास पिंगट,जादूगार प्रकाश शिरोळे उपस्थित होते.

## ईशरे पुणे चॅप्टरच्या अध्यक्षपदी खनाडे यांची नियुक्ती

पुणे (दै. संध्या)

इंडियन सोसायटी ऑफ हीटिंग, रेफ्रिजरेटिंग अँड एअर कंडिशनिंग इंजिनिअर्स (ISHRAE), ईशरे पुणे चॅप्टरच्या २०२६ -२७ या कालावधीसाठी श्री सुभाष खनाडे यांची अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे.श्री.सुभाष खनाडे आणि त्यांच्या कार्यकारिणीचा पदग्रहण व शपथविधी समारंभ श्री.ए.मधुकर(सोसायटी सचिव इशरे)यांच्या हस्ते झाला. पुणे चॅप्टरच्या ३४ व्या वर्धापन दिन सिद्धी साज बँक्वेट्स अँड लॉन, वकील नगर, एरंडवणे, पुणे. येथे संपन्न झाला.

या वेळी श्री.ए.मधुकर(सोसायटी सचिव इशरे),संस्थापक अध्यक्ष अरविंद सुरंगे, रमेश परांजपे, दिपक वाणी, वीरेंद्र बोराडे, आशुतोष जोशी, नंदकिशोर कोतकर, आर एस कुलकर्णी, धनंजय आपटे, कालिदास भांगरे, मोहन खोंड आणि इशरे पुणे चॅप्टरचे सर्व सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.



श्री सुभाष खनाडे यांनी या वर्षीच्या होणाऱ्या कार्यक्रमांचा आढावा सर्व सभासदांना दिला व ईशरे पुणे चॅप्टरची उद्दिष्टे पुढे नेण्यासाठी कटिबद्ध असल्याचे सांगितले.श्री नंदकिशोर कोतकर यांनी कार्यक्रमाचे यशस्वी संयोजन केले. इशरे पुणे चॅप्टरचे २०२६-२७ चे नवनिर्वाचित सभासदांमध्ये विविध क्षेत्रातील प्रतिष्ठित व्यावसायिकांनी पदभार स्वीकारला. श्री अमित गुलवाडे (नियोजित अध्यक्ष)श्री.विमल चावडा (कोषाध्यक्ष), श्री.विशाल पवार (सेक्रेटरी), श्री चेतन ठाकूर(माजी अध्यक्ष).या वेळी दिनांक १९ ते २१ नोव्हेंबर २६ रोजी जागतिक पातळीवर पुण्यात होणाऱ्या रेफकोल्ड २०२६या प्रीमिअर रेफ्रीजनरेशन ओंड कोल्ड चेन एक्स्पोचा शुभारंभ करण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्र संचालन प्रणव रिसवडकर व वैष्णवी मते तर अमित गुलवडे यांनी आभार प्रदर्शन केले.

## तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयामध्ये राज्य राखीव पोलीस बल गटातर्फे सशस्त्र पोलीस भरती लेखी परीक्षेचे आयोजन

पुणे (दै. संध्या)

तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय व अनेकांत इंग्लिश मिडीयम स्कुल, बारामती मध्ये दि. १९ एप्रिल २०२६ रोजी मा.समादेशक राज्य राखीव पोलीस बल गट क्रमांक १९ कुसडगाव या आस्थापनेवरील सशस्त्र पोलीस शिपाई भरती सन २०२४ २५ करिता लेखी परीक्षा आयोजित करण्यात आली आहे. या परिक्षेस ३००० परीक्षार्थी आहेत. परीक्षा शिस्तबद्ध रितीने पार पडाव्यात याकरिता नेमकेपणाने नियोजन, बैठक व्यवस्था करण्यात आली आहे.



मा.अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे निर्देशानुसार कनिष्ठ पर्यवेक्षक व संबंधित अधिकारी यांना दि. १८ एप्रिल २०२६ रोजी विमला एम. आयपीएस, कमांडंट एसआरपीएफ ग्रुप, कुसडगाव यांनी मार्गदर्शन केले असून परीक्षेसंदर्भात शिस्त राखली जाण्याच्या दृष्टीने सूचना दिल्या. या परीक्षांचे २ महिन्यांपासून नियोजन सुरु आहे. महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा.डॉ.अविनाश जगताप यांनी मा.समादेशक राज्य राखीव पोलीस बल गट क्रमांक १९ कुसडगाव यांनी कळविल्याप्रमाणे परीक्षार्थींची सर्व व्यवस्था केली आहे.

## चापेकरबंधूंच्या हौतात्म्यामुळे देशभक्तीचे स्फुलिंग प्रज्वलित! - योगेश सोमण

पुणे (दै. संध्या)

'क्रांतिवीर चापेकरबंधूंच्या हौतात्म्यामुळे स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्यासह असंख्य क्रांतिकारकांच्या मनात देशभक्तीचे स्फुलिंग प्रज्वलित झाले आणि त्याची परिणती स्वातंत्र्यप्राप्तीत झाली!' असे विचार महाराष्ट्र साहित्य परिषदेचे अध्यक्ष आणि ज्येष्ठ अभिनेते योगेश सोमण यांनी ग. दि. माडगूळकर नाट्यगृह, निगडी प्राधिकरण येथे शनिवार, दिनांक १८ एप्रिल २०२६ रोजी व्यक्त केले.



क्रांतिवीर दामोदर हरी चापेकर यांच्या १२८ व्या स्मृतिदिनानिमित्त क्रांतिवीर चापेकर स्मारक समिती आयोजित अभिवादन समारोहात प्रमुख वक्ते म्हणून योगेश सोमण बोलत होते. आमदार उमा खापरे, उपमहापौर शर्मिला बाबर, विश्व हिंदू परिषदेचे प्रांतमंत्री किशोर चव्हाण, समिती अध्यक्ष पद्मश्री गिरीश प्रभुणे, उपाध्यक्ष डॉ. अशोक नगरकर, कार्यवाह ॲड. सतीश गोरडे, विनोद बन्सल, डॉ. नीता मोहिते, डॉ. शकुंतला बन्सल, कांता जाधव, रवींद्र नामदे आदी मान्यवरांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी छत्रपती शिवाजीमहाराज यांच्या हेरखात्याचे प्रमुख बहिर्जी नाईक यांचे तेरावे वंशज दादाराव जाधव - नाईक यांचा विशेष सन्मान करण्यात आला; तसेच पद्मश्री रमेश पतंगे लिखित 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे संवैधानिक चिंतन' या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. ॲड. सतीश गोरडे यांनी पुस्तकाचे अंतरंग उलगडून सांगितले.

योगेश सोमण यांनी क्रांतिवीर चापेकरबंधूंचा रँडवधाचा इतिहास आणि स्वातंत्र्यासाठी प्रेरक ठरलेल्या बाबींचे ओघवत्या शैलीतून वर्णन करीत, 'पालकांनी विद्यार्थ्यांसमवेत ऐतिहासिक वास्तूंना आवर्जून भेटी देऊन इतिहास समजून घ्यावा!' असे आवाहन केले. किशोर चव्हाण यांनी, "गोद्या आला रे!' हे शब्द आजही वीरश्री निर्माण करतात. बहिर्जी नाईक हे छत्रपती शिवाजीमहाराज यांचा तिसरा डोळा होते. क्रांतिवीर चापेकर स्मारक समितीने ज्ञात - अज्ञात क्रांतिकारकांचे उभारलेले संग्रहालय ही अतिशय स्तुत्य बाब आहे!' असे गौरवोद्गार काढले. गिरीश प्रभुणे यांनी प्रास्ताविकातून चापेकर बंधूंच्या हौतात्म्यानंतर ७२ वर्षांनी पहिल्यांदा त्यांचा स्मृतिदिन साजरा करण्यात आला आणि आजतागायत ती परंपरा कायम आहे, अशी माहिती दिली. दीपप्रज्वलन, अखंड भारतमाता आणि क्रांतिवीर दामोदर हरी चापेकर यांच्या प्रतिमांचे पूजन तसेच गुरुकुलम् मधील विद्यार्थिनींनी सादर केलेल्या स्वागतगीताने कार्यक्रमाचा प्रारंभ करण्यात आला.

त्यापूर्वी, सकाळी भव्य अभिवादन फेरीचे आयोजन करण्यात आले होते. समारोहाआधी क्रांतिवीर चापेकर स्मारक समिती संचलित पुनरुत्थान समरसता गुरुकुलम्, क्रांतिवीर बाळकृष्ण चापेकर बालक मंदिर, क्रांतिवीर चापेकर विद्यामंदिर, क्रांतिवीर चापेकर विद्यालय, खिंवसरा पाटील विद्यामंदिर आणि लोकमान्य टिळक माध्यमिक विद्यालय या शाळांमधील विद्यार्थ्यांनी चापेकरबंधूंच्या जीवनातील विविध प्रसंगांचे नाट्य आणि गीतांच्या माध्यमातून सादरीकरण केले; तसेच मर्दानी खेळांची प्रात्यक्षिके सादर केलीत. मान्यवरांच्या हस्ते विशेष प्रावीण्य प्राप्त करणाऱ्या विद्यार्थी आणि शिक्षकांना सन्मानित करण्यात आले क्रांतिवीर चापेकर स्मारक समितीचे व्यवस्थापक अतुल आडे, समर्थ डोंगरे, सागर शेवाळे, विनोद डोरले, किरण गायकवाड आणि शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारीवर्ग यांनी संयोजनात परिश्रम घेतले. प्रा. दिगंबर ढोकले आणि स्मिता जोशी यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. अशोक नगरकर यांनी आभार मानले. संपूर्ण वंदे मातरम् ने समारोहाची सांगता करण्यात आली.